मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

युगवाणी

दिवाळी अंक- १९६०

अनुक्रमणिका

दि वा ळी अं क

★

[ऑक्]टोबर–नोव्हेंबर १९६०

युगवाणी

[पु.] य. दे श पां डे

विदर्भ साहित्य संघ

विदर्भ विषयः सारस्वती जन्मभूः

या अंकातील लेखक व क[वी]

पु. य. देशपांडे
नारायण शास्त्री द्रविड
वसंत वरखेडकर
डॉ. य. खु. देशपांडे
प्रा. सुरेश म. डोळके
प्रा. श्री. गो. काशीकर
कृष्णा चौधरी
आ. चि. भोयर
बाबा मोहोड
गुणाकर देशपांडे
यशवंत पारखी
रवींद्र बोरगावकर
श्रीपाद गंगाधर कावळे
श्याम सोनारे
रा. अ. काळेले

मूल्य ५० नये पैसे

सं

अनुक्रमणिका

दि वा ळी अं क १ ९ ६ ०
(मध्यप्रदेश शिक्षणविभागाकडून वाचनालयाकरिता मान्य झालेले)

यु ग वा णी

संपादक–मंडळ
संपादक : पु. य. देशपांडे
सदस्य : प्र. बा. ऊर्ध्वरेषे
पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

ऑक्टोबर–नोव्हेंबर १९६०

★ ★

याशिवाय संघवार्ता, वाङ्मयवार्ता, वगैरे

★ ★ ★

दिवाळी अंक

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

संपादक :
पुरुषोत्तम यशवंत देशपांडे

वर्ष १५] [अंक ६-७

कला : जीवन : समीक्षा : संस्कृति

ऑक्टोबर–नोव्हेंबर १९६०

एका दगडाची कथा

एक होता दगड. चांगला जाडजुड. एका बाजूला थोडा निमुळता. एका बाजूला रुंद. पालखट मांडून ताठ, ध्यानस्थ बसलेल्या धिप्पाड माणसाला ढकलून खाली पाडले, तर जसा आकार दिसेल तसा.

मोठ्या पहाटेस, पहाटेपूर्वीच्या किलकिल्या काळोखात फिरायला जाण्याचा माझा परिपाठ होता. जिकडे कोणीच सहसा फिरकत नसे, असा रस्ता, अशी एक 'वाट' मी निवडली होती. 'वाट' म्हटलं की, 'भाष्यकारातें वाट पुसत'– ही ज्ञानदेवाची ओळ चटकन माझ्या मनात तरंगते. पण मला कोणालाच 'वाट' पुसायची नव्हती. न पुसलेल्या वाटेवरून जायचे होते. म्हणून ज्या वाटेची क्वचितच कोणी पुसपास करी, ती वाट मी निवडली होती. तरीपण ती 'वाट' होती. किती तरी लोकांच्या, पूर्वकाळी झालेल्या पायपिटीमुळे तिला वाटेचा, वेडावाकडा का होईना, आकार आला होता. पण कालांतराने तिच्याकडे लोकांचे दुर्लक्ष झाले असावे. त्या वाटेने

लेखक :– पुरुषोत्तम यशवंत देशपांडे

जाऊन काहीच कार्यभाग होईनासा झाला असावा. निराळ्या वाटांनी, मऊ मातीची मळलेली ही वाट सोडून, टणकशा गिट्टीच्या रस्त्यांनी लोक जाऊ लागले असावे. म्हणून, लोकांनी सोडून दिलेली, आता पूर्ण उपेक्षित झालेली व म्हणून कुचकामाची पण शांत झालेली, ही वाट मी निवडली होती. गजबजलेल्या व सतत रहदारीने रुळलेल्या रस्त्यांचा मला कंटाळा आला होता. मला 'वाट' हवी होती; पण लोक व त्यांचा गजबजाट नकोसा झाला होता. म्हणून ही 'वाट' मी निवडली होती. निवडली म्हणण्यापेक्षा माझ्या दिशाशून्य भटकंतीत ती अनायासे, सहजासहजी मला गवसली होती.

त्याच वाटेवर, गावापासून बऱ्याच अंतरावर, वाटेच्या एका बाजूला, तो दगड पडला होता. तो कोणाच्याहि वाटेला जाणारा नव्हता. कोणाचीहि वाट अडवणारा नव्हता. पडला होता बिचारा एका बाजूला, ना कोणाच्या अध्यात, ना मध्यात.

रोज मला तो दिसायचा. ब्राह्ममुहूर्ताच्या त्या मंगल संधिकालात सारे, सारे शांत असे. वाट शांत, वातावरण शांत, काळोख– प्रकाश शांत; पण ही शांति विचलित करणारी गोष्ट म्हणजे त्याच वाटेने रोज पहाटेपूर्वीच्या, न काळोखाचा न प्रकाशाचा गजबजाट असलेल्या, संधिकालात होणारी माझी वाटचाल. कधी कधी वाटे, आपण कशाला ही शांतता आपल्या वाटचालीने विचलित करावी ? 'त्यांना' त्रास तर होणार नाही ना ? लोकांच्या पायपिटीखाली सतत रगडल्या गेलेल्या या वाटेला आता कोठे जो थोडासा विसावा मिळू लागला होता, तो मी हिरावून तर घेत नाही ना ? आणि तो दगड ! त्याच्या समाधीला मी विघ्न तर आणीत नाही ना ? आणि तो संधिकाल ! काळोखात विजेच्या दिव्यांचा लखलखाट आणि सूर्योदयानंतरचा प्रखर प्रकाश– या दोघांपासून थोडासा उसंत मिळायचा तो या संधिकाळात. आणि नेमक्या याच वेळी होणारी माझी वाटचाल! काय वाटत असेल त्या संधिकाळांतर्गत संध्येला ?– त्या दगडाचे आणि या संध्येचे काही तरी सूत जमले असावे, असे मला वाटे. आणि ती वाट, या दोघांचे संरक्षण करण्यासाठी, दारावरची रखवालदारीण झाली असावी, असेहि वाटे !

हे असे वाटे म्हणून मी निमुटपणे त्या वाटेवरून जात असे. वाट सोडून त्या दगडाला, त्याच्या समाधीला, कसलाहि उपसर्ग पोचू नये, याची दक्षता घेत असे. पण त्या दगडाकडे पाहण्याच्या इच्छेला मात्र मला आवर घालता येई ना. पूर्वी त्याचे डोके वर आकाशाकडे असावे आणि तो समाधीत बेभान झाला असता कोणी तरी त्याला खाली पालथे पाडले असावे, असे वारंवार मनात येई. पुढे पुढे तर हे मला इतके खरे वाटू लागले की, त्या दगडाजवळून जाऊ लागताच मनातल्या मनात अगदी सहजपणे, मी त्याला मोठ्या आदराने नमस्कारहि करू लागलो !

● ● ●

असे किती तरी दिवस निघून गेले. तो 'समाधिस्त दगड,' ती 'संध्या' आणि ती 'वाट,' यांच्या त्रिवेणी-संगमात, मनातल्या मनात स्नान करण्याचे माझे आन्हिक सतत चालू होते. आणि मग एके दिवशी या आन्हिकात व्यत्यय आणणारे, असे काही दिसू लागले. त्या दगडाच्या पलीकडे एक मोकळे माळरान होते. तिथे रातोरात काही झोपड्या बांधल्या गेल्या. काल तिथे काहीच नव्हते. पण आज पाहतो तो पाचपंचवीस झोपड्या तिथे दिसू लागल्या. मला मोठे वाईट वाटले. माझ्यासाठी नाही– त्या 'समाधिस्त दगडा'साठी, त्या 'संध्ये'साठी, आणि त्या विसावलेल्या तरीपण त्या दोघांची राखणदारी करणाऱ्या त्या 'वाटे'साठी. यांना असे तर वाटणार नाही ना की, माझ्या वाटचालीमुळेच लोकांना ते माळरान दिसले आणि त्यांनी तिथे झोपड्या उभारल्या? मला वाईट वाटले. पण मी काय करणार?–

आता तिथे, त्या वाटेवर, पूर्वीची निखळ शांतता राहिली नव्हती. झोपड्यांतील लोकांची वर्दळ सुरू झाली होती. मला तिचा फारसा उपद्रव होत नव्हता. कारण एवढ्या पहाटेला वर्दळ फारशी नसे. तरीपण रोजदारी करायला काही माणसे, काही बाया त्या झोपड्यांतून बाहेर पडत आणि त्याच वाटेने, माझ्या विरुद्ध दिशेला जात– गजबजलेल्या शहराकडे. तींहि बिचारी निमुटपणे जात, म्हणून मला त्यांचा उपद्रव भासत नसे. पण रोज गाठ पडायची म्हणून ती बाया– माणसे, मी दिसताच मला 'रामराम' करू लागली. पहिल्यापहिल्याने हा उपद्रव वाटे. पण मग तो अंगवळणी पडला.– अशा रीतीने तरी 'राम–नाम' माझ्या मुखांवाटे बाहेर पडू लागले. अगदी पहिल्यानेच; नव्हे, कित्येक वर्षांनंतर पहिल्यानेच. लहानपणी रामनाम घेतल्याची स्मृति त्यामुळे जागी झाली.

आणखी काही दिवस असेच निघून गेले.– एके दिवशी एक निराळाच प्रकार दृष्टीस पडला. मी स्तंभितच झालो. त्या समाधिस्त दगडावर चिखलाचे डाग दिसू लागले. लोकांनी त्या दगडाचा, आपले चिखलाने बरबटलेले पाय पुसून काढण्यासाठी उपयोग करणे आरंभिले होते. गरिब बिचारा दगड!

आता एक निराळेच सत्र सुरू झाले होते. त्या दगडाचा वाटेल तसा बरा–वाईट उपयोग करणे सुरू झाले होते. पावसाच्या पाण्याने तो जरा साफसूफ झालेला असला, तर त्यावर बसून डोक्यावरील जड ओझ्यामुळे शिणलेल्या बाया जरा विसावा घेऊ लागल्या. पण लगेच दुसऱ्या दिवशी पाहावे, तर तो दगड पुन्हा चिखलाने बरबटलेला. आणि कधीकधी तर पान–तंबाखूच्या पिचकाऱ्यांनी रंगलेला!

पण हे सारे प्रकार तो दगड शांतपणे सहन करीत होता. त्याची समाधि त्यामुळे यत्किंचित्‌हि भंगलेली दिसून आली नाही. हे सारे प्रकार पाहून मला

फार वाईट वाटे, राग येई, संताप येई. वाटे, लोकांना जरा दरडावून सांगावे की, ' त्या दगडापासून जरा दूर रहा. खबरदार, त्याला सतवाल तर ?'– पण हे सारे मनातल्या मनात. मला काय अधिकार होता, त्या लोकांना बोलण्याचा ? आणि मी त्यांना दटावले असते, तर मला ते म्हणाले असते, " साहेब, हा बिचारा दगड तर आम्हाला काहीच म्हणत नाही. मग तुम्हीच का उगीच वखवखता ?"– मी यावर काय उत्तर देऊ शकलो असतो ?

● ● ●

असेच किती तरी दिवस निघून गेले. मध्यंतरी मी काही दिवस परगावी गेलो होतो. परत आलो नि मोठ्या पहाटे त्या आपल्या वाटेकडेच फिरायला निघालो. सारे, सारे, पूर्वीसारखेच होते. पण त्या दगडापाशी येताच मला आश्चर्याचा धक्काच बसला. एका प्रशस्त चवुतऱ्यावर लोकांनी त्याला सरळ देवासारखा बसवून दिला होता. आणि जाणारे– येणारे लोक, त्याच्यासमोर येताच, त्याला वाकून नमस्कार करू लागले होते ! कित्येक तर चवुतऱ्यावर चढून त्याला साष्टांग दंडदत घालू लागले होते !

आणखी काही दिवस गेले. आता त्या दगडावर तेल– शेंदुराची चांगलीच पुटे जमली होती. तो आता मला ओळखू येईनासा झाला होता. तो आता दगडाच ' देव ' बनला होता.

आणखी काही दिवस गेले. त्या चवुतऱ्यावर आता एक कवलारू छत आले होते. एका सभामंडपाचे रूप त्या चवुतऱ्याला प्राप्त झाले होते.– आणखी काही दिवस गेले. आता त्या दगडाच्या भोवती चार भिंती बांधल्या गेल्या होत्या व माथ्यावर कळस चढविण्यात आला होता ! तरीपण वाटेवरून, तो शेंदूर व तेल यांनी चकाकणारा ' देव '– आता त्याला दगड कसे म्हणू– दिसत होता.

त्या दगडाला आता देवत्व प्राप्त झाले होते. त्याची समाधि सफलित झाली होती. आणि माझ्यात मात्र कसलेच परिवर्तन घडून आले नव्हते. दगडाच्या भाग्या-पेक्षाहि माणसाचे भाग्य या देशात अधिक खडतर आहे, असे मला वाटू लागले. त्या दगडोबाचा थोडासा हेवाहि वाटू लागला. दगडाचा हेवा !– आता हद्द झाली की नाही मानवी अध:पाताची ! पण हे मनात येताच वाटू लागे, " आता तो **' दगड '** राहिला नाही. तो **' देव '** झाला आहे. मला हेवा वाटतो तो दगडाचा नव्हे, देवाचा."– पण हे समर्थन किती अर्थशून्य आहे, हे ध्यानात येताच, माझी मलाच लाज वाटू लागे.

त्या दगडाविषयी, त्याच्या समाधिस्त अवस्थेविषयी माझ्या मनात पूर्वी-पासून निर्माण झालेल्या आदराच्या विनम्र भावामुळेच हे नवे हेव्यादाव्याचे भाव माझ्या मनात डोकावू लागले असावेत, हे मला कळत होते. आणि पूर्वीचे ते भाव

आठवल्यामुळेच मी आता बेचैन होऊ लागलो होतो. मला ते पूर्वीचे भाव आवडायचे. त्या दगडात आणि माझ्यात जे एक मूक, नाजुक नाते निर्माण झाले होते, ते आता लोकांनी भंगून टाकले, म्हणूनहि कदाचित् मी बेचैन झालो असेन. त्या दगडाला मी मनातल्या मनात म्हणे– "तू 'दगड' होतास तेव्हा मला किती आवडायचा ! पण आता तू 'देव' झाला आहेस आणि माझ्यापासून दूर दूर गेला आहेस. आता तू माझा राहिला नाहीस. आता तू लोकांचा झाला आहेस."

हा काय गाढवपणा आरंभिला आहे मी! – माझे मलाच कळेना. दगडाचा देव झाला त्यात माझे काय बिघडले ? तेव्हाहि तो दगड होता, आणि आताहि तो दगडच नव्हता का ?– हो, तो दगडच होता व आहे. पण– ज्याच्याविषयी आतल्या आत एक अति सूक्ष्म, अति नाजुक भाव निर्माण झाला होता, 'असा तो दगड आहे. लोकांना कल्पनाहि नव्हती, तेव्हापासून मी त्याला ओळखतो. त्याच्या समाधि– अवस्थेला मनातल्यामनात नमस्कार मीच पहिल्याने करू लागलो होतो.

● ● ●

या भावचक्रामुळे मी बराच अस्वस्थ झालो. हा सारा शुद्ध मूर्खपणा आहे, हे मला कळत होते. बुद्धीला स्पष्ट जाणवत होते. माझ्या मनात काही अस्वस्थता आहे, हे बाहेर कोणालाहि जाणवत नव्हते. माझे सारे वागणे अगदी थेट पूर्वीसारखेच होते. बाहेरून काडीइतकाहि फरक पडला नव्हता. पण आतून ?– कोणाला हे सांगितले तर ते मला वेड्यात काढतील. पण कोणालाही हे सांगण्याचा प्रश्नच नव्हता. प्रश्न होता माझ्या मनाचा, केवळ माझ्यापुरता. मी माझ्याशीच प्रतारणा कशी करणार ? हे सारे विसरून जाण्याचा आटोकाट प्रयत्न केल्यानंतरहि, ही 'दगडाची कथा' माझी एक व्यथा बनली. मला काही केल्या मनातून ती हद्दपार करताच येईना.

अशा बेचैनीत किती तरी दिवस निघून गेले. अखेरीस मी एक निर्णय घेतला. मला तो घ्यावाच लागला. माझ्या स्वतःच्या मनःस्वास्थ्यासाठी.

एके दिवशी मोठ्या पहाटेच्यापूर्वी मी जागा झालो. जागा झालो म्हणण्यापेक्षा झोप येईना म्हणून बिछान्यातून बाहेर पडलो. वाटले, जावे आपल्या वाटेला. निघालो. अंधार गडद होता. पण तो जमीनीवरच. वर आकाशात असंख्य तारकांचा लखलखाट होता. इतक्या पहाटेपूर्वीच्या पहाटेचे आकाश मी पूर्वी कधीच पाहिले नव्हते. तो तारकापुंजांचा लसलसणारा लखलखाट, ते आकाशगंगेचे अमर्याद, अनिर्वचनीय लावण्य, ती विलक्षण तेजोगर्भ नीलिमा आणि ते विलक्षण प्रकाश–दर्शन !–

या तारेतच मी त्या दगडापाशी केव्हा आलो, कसा आलो, हे कळले देखील नाही. आणि चबुतऱ्याच्या पायऱ्या चढून देव्हाऱ्यासमोर कसा उभा ठाकलो, तेहि कळले नाही. सारे कसे आपोआप घडत आहे, असा भास झाला. त्यात माझ्या सुजाण प्रयत्नांना यत्किंचित्‌हि स्थान नव्हते.

तसाच आपोआप मी देव्हाऱ्यात शिरलो. देवासमोर बसलो. एका दिवलाणी-तील एक वात अगदी मंदपणे जळत होती. त्या अंधुक प्रकाशात तो दगड, नव्हे तो देव, मला भव्यसा भासत होता. हा भव्यपणा त्या दगडाचा नसून त्याच्या सावलीचा होता. तरीपण तो दगड व त्याची ती, देव्हाऱ्याचा बहुतांश भाग व्यापणारी, भव्य सावली, यांच्यात कसलाच फरक भासत नव्हता. तो दगडच भव्य झाल्यासारखा दिसत होता.

त्या भव्यपणामुळे थोडे भेदरल्यासारखे वाटले म्हणून की काय मी डोळे मिटून घेतले. आणि मग जरा शांत वाटू लागल्यावर मी मनातल्या मनातच पुटपुटू लागलो.

"मी काही तुला 'देव' मानून भेटायला आलो नाही. तू माझा जुना मित्र, म्हणून मी तुझ्याकडे आलो आहे. तू 'देव' झालास, हे मला आवडलं नाही. तू दगडाचा 'देव' कसा झालास हे मला सांगशील का? मानवाच्याहि वाटचाला न येणारं देवत्व तुला कसं प्राप्त झालं?—"

मनातल्या मनात मी हे असे बोललो आणि स्वस्थ बसलो. माझे डोळे मिटलेलेच होते. काही क्षणच गेले असतील, तोंच मला स्पष्ट ऐकू आले, "मी देव कसा झालो, हे तुला खरोखरच समजून घ्यायचं आहे का?"

मी दचकलो! चटकन डोळे उघडले. तो दगड, तो देव, तसाच होता. त्याची ती सावलीहि तशीच होती. मग आवाज कुठून आला?—मी उठलो. त्या दगडाला एक प्रदक्षिणा घातली. देव्हाऱ्यात कुणीच नव्हते. बाहेर आलो. देवळाच्या सर्व बाजूंना हिंडून पाहिले. कोणी, कोणी नव्हते. सारे अगदी शांत, सुन्न, निर्मनुष्य, मग तो आवाज, ते शब्द कुठून आले?—काही कळेना. ही भुताटकी तर नाही ना, अशी शंकाहि मनाला चाटून गेली. जरा भीतीहि वाटू लागली. तरी पण माझे कुतूहल इतके जागृत झाले की, त्याने भीतीच्या भावनेवर अखेरीस मात केली.

मी पुन्हा देव्हाऱ्यात शिरलो. पुन्हा डोळे मिटून स्वस्थ बसलो. आणि लगेच मला ऐकू आले—"घाबरू नकोस. तू मला मित्र मानलं आहेस. तसंच मीहि तुला मित्र मानलं आहे. इथं घाबरण्याचं काय कारण?"

पुन्हा मी दचकलो. हा काय प्रकार आहे, काही कळेना. डोळे उघडले की

आवाज बंद होई. पण डोळे मिटले की, तो स्पष्टपणे ऐकू येई. पुन्हा मी डोळे मिटले. लगेच ऐकू आले – "घाबरू नकोस. नीट ऐक. साऱ्या शंकाकुशंका बाजूला सार. दगडाचा मी 'देव' कसा झालो, हे तुला समजून घ्यायचं आहे ना ?"

"होय" – मी डोळे मिटूनच उत्तर दिले. आता मी अगदी स्वस्थ झालो होतो. आता हे प्रकरण धसास न्यायचेच, असा निश्चय माझ्या मनात साकारला होता. लगेच ऐकू आले –

"ऐक तर मग. मी दगडच आहे, देव नाही. पण आता यावर, अश्रद्ध लोक बगळले, तर कोणाचाहि विश्वास बसणार नाही. तू मला 'मित्र' मानतोस म्हणून मी तुझा मित्र आहे. इतर लोक मला 'देव' मानतात, म्हणून मी त्यांचा 'देव' आहे. '**जसा भाव तसा देव**', हे अगदी अक्षरशः खरं आहे. दगड असूनहि मी बोलू शकतो, याचं तुला मोठं आश्चर्य वाटतं. पण यात आश्चर्य वाटण्यासारखं काय आहे ? तू मला मित्र मानलं आहेस. तुझा भाव अगदी सहजपणे तुझ्या अंतरात्म्यापर्यंत जाऊन भिडला आहे. हे असं घडलं की, भावालाच चैतन्य लाभतं. हे, माझ्या माध्यमातून, तुझंच चैतन्य बोलत आहे. चैतन्य सर्वत्र अगदी खच्चून भरलं आहे. पण लोकांना त्याची जाणीव नसते. जे जे दिसतं, भासतं, ते सारं चैतन्य असताहि, लोक निरनिराळ्या आकारांना निरनिराळी नावं देऊन बसले आहेत. त्यांनी केवळ आपल्या मनाने, त्यांना भासणाऱ्या त्या रूपांना जो जी नावं दिली आहेत आणि या नावांना जो जो अर्थ त्यांनी केवळ आपल्या मनानंच बहाल करून दिला आहे, तोच अर्थ त्यांना खरा वाटतो. वस्तुतः पिढीजात परंपरेने निर्माण केलेले आणि लहानपणापासून अंतःकरणावर जबरीने कोरले गेलेले हे भास केवळ कल्पित आहेत. दोरीच साप भासू लागते, थेट तसेच हे सर्व परंपरागत भास आहेत. चैतन्यानं घेतलेल्या चित्रविचित्र रूपांना मानवी मनानं वेगवेगळी नावं दिली व आपले कल्पित अर्थ त्यावर लादले, म्हणूनच चैतन्याऐवजी विविध नाम–रूपांनी नटलेली ही भेदात्मक सृष्टि मानवाला भासते. तू आता हे जे ऐकत आहेस, ते माझ्या माध्यमातून तुझंच चैतन्य बोलत आहे."

"माझंच चैतन्य ? हे कसं शक्य आहे ?"

"मला वाटलंच होतं, तुला हे पटणार नाही. कारण परंपरेच्या अनादि भ्रमातून तू अद्याप मुक्त झालेला नाहीस. तू मला मित्र मानलंस, अगदी अंतःकरणा-पासून मित्रभावानंच तू माझ्याकडे कित्येक महिने एकसारखा पाहत आलास आणि हा मित्रभाव तुला आतून अगदी खरा, खरा वाटू लागला, म्हणून मी तुझं 'मित्र–चैतन्य' झालो आहे. मित्र म्हणूनच मी हे बोलत आहे. मला मित्र

मानण्यापुरता तू अनादि अविद्येपासून, परंपरागत भ्रमापासून मुक्त झालास, म्हणूनच हा विलक्षण अनुभव तुला येत आहे. तुला आता तो खोटा मानता येणंच अशक्य झालं आहे. माझा आवाज ऐकताच तू प्रथम दचकलास. तुला हा आवाज म्हणजे भुताटकी वाटली. यांचं कारण तुझा पिंड, मला मित्र मानण्याचा भाव वगळून, पूर्वी सारखाच भ्रमात वावरत आहे."

"असं जर आहे, तर डोळे मिटले म्हणजेच मला तुझं बोलणं ऐकू येतं आणि डोळे उघडले तर ते बंद होतं, असं का ? "

"याचं कारणहि उघड आहे. डोळे मिटले म्हणजेच माझ्याविषयी जो मित्रभाव तुझ्या अंतःकरणांत रुजला आहे त्याच्याशी तुझं तादात्म्य होऊ शकतं. डोळे उघडले की, हे तादात्म्य इतर दृश्यामुळं भंग पावतं."

"तू दगडाचा देव कसा झालास, हे मला सांगणार होतास ना ?"

"हो, तर. सांगतो. नीट ऐक. तू माझ्या साऱ्या अवस्था पाहिल्या आहेस. लोकांनी माझ्या अंगावर आपल्या पायांचा चिखल फासळा; माझ्या अंगावर ते थुंकले. तरी मी दगडासारखा स्वस्थ बसून राहिलो. सारं, सारं निमुटपणे सहन केलं. कसलाहि प्रतिकार केला नाही. कसलीहि प्रतिक्रिया मनांत उठू दिली नाही. उठली तरी ती गिळून टाकली– "

मध्येच त्याला अडवून मी म्हणालो–"दगडाला याहून दुसरं काय करतां येणं शक्य होतं ? "

तो म्हणाला, "खरं आहे तुझं म्हणणं. पण हे वरवरचं सत्य आहे. स्थूल दृष्टीला दिसणारं सत्य आहे. सूक्ष्मदृष्टचा, म्हणजेच वस्तुतः, ही समग्र जडाजड सृष्टि चैतन्यमय आहे. आम्ही दगड झालो याचं कारण आमचं पूर्वजन्मजन्मांतरीचं पाप. दगड म्हणून आम्हाला, तुम्हा पुण्यवान् – भाग्यवान् मानवासारखी, संवेदना नाही. पण जेव्हा मानव आपली संवेदना आमच्यावर केंद्रित करतो, तेव्हा आमच्यातलंहि सुप्त-चैतन्य तेवढ्या प्रमाणात जागं होतं. तू माझ्याकडे ज्या नाजुक, हळुवार व सहज–शुद्ध मित्रभावानं पाहू लागलास, आणि पुढंपुढं, हा कोणी समाधिस्त योगीपुरुषच असला पाहिजे, असं मानून, मला मनातल्या मनात तू नमस्कारहि करू लागलास, त्यामुळंच माझा हा उद्धार घडून आला."

"उद्धार ?–" मी उद्गारलो.

"हो, उद्धार.– मध्यंतरी तू काही दिवस परगावी निघून गेलास तेव्हा तुझ्या मित्र–भावाच्या उत्कटतेमुळे माझ्यात संक्रमित झालेल्या संवेदनेमुळं मला

(पान २६६ वर)

अनुक्रमणिका

जी भाषा पामरापासून पंडितापर्यन्त सर्व प्रकारच्या लोकांच्या तोंडात रुळलेली असते तिच्यातील शब्दप्रयोगामागे फक्त विचारवंतानाच जाणवू शकणारा असा गंभीर अर्थ असू शकतो, ही कल्पना सहसा कोणालाही खरी वाटणार नाही. पण भाषा हे सर्व प्रकारच्या अनुभूतींचे वहन करणारे एकमेव असे माध्यम आहे, ही गोष्ट लक्षात घेतल्यास व ज्यांचा अर्थ बरोबर उमगत नाही अशा अनुभूति पामरासही होण्याची शक्यता मान्य केल्यास, भाषेतील विशिष्ट शब्द प्रयोगात त्या-अनुभूतीचे प्रतिबिंब उमटावे या गोष्टीचे विशेष आश्चर्य मानण्याचे कारण नाही. वास्तविक पाहता अनुभूतींचे पूर्णपणे व्यक्तिनिष्ठ (कोणतीही अनुभूति व्यक्तीच अनुभवू शकते) असे स्वरूप लक्षात घेतल्यास त्यांच्याबद्दलची महत्वाची व खरी माहिती सामान्य माणसापासूनच मिळू शकेल असे मानणे भाग आहे. पण सामान्य

सर्वनामांचे तत्त्वज्ञान

— लेखक —

नारायण शास्त्री द्रविड,

स्नातकोत्तर तत्त्वज्ञान विभाग, नागपूर विद्यापीठ

माणसाला स्वतःच्या अनुभवाचेच तात्विक विश्लेषण करता येत नसल्यामुळे, त्याच्या वापरात येणाऱ्या शब्दात त्याला नकळत प्रतिबिंबित झालेल्या या अनुभूतींचा विचार केल्याने तत्वज्ञानाला उपयुक्त अशी बरीच माहिती मिळविता येईल, असे मानण्यास हरकत असू नये. प्रस्तुत लेखांत, 'मी' 'तू' 'तो' 'ते' व 'हे' या सर्रास वापरल्या जाणाऱ्या सर्वनामांच्या मागे ज्या तात्विक कल्पना दडलेल्या आहेत त्यांची थोडी चर्चा करावयाची आहे. क्रियापदांचा विचार केल्यासही बरीच तात्विक स्वरूपाची माहिती मिळू शकते. पण ह्या विषयाचा विस्तार पाहिल्यास एकाच लेखात दोन्ही प्रकारच्या शब्दांची चर्चा शक्य नसल्यामुळे येथे येवढाच निर्देश करून प्रस्तुत विषयाकडे आपणास वळले पाहिजे की, सर्वनामाच्या अध्ययनामुळे आत्म्याचे, तर क्रियापदांच्या अध्ययनामुळे जगाचे स्वरूप ओळखण्यास मदत होते.

'मी'

उत्तमपुरुषी एकवचनी सर्वनाम 'मी' हे आत्मस्वरूपाच्या तात्विक विश्लेषणाच्या दृष्टीने फार महत्वाचे आहे. 'मी' 'तू' 'तो' इत्यादि सर्वनामे सामान्यपणे एकाच पातळीवरची समजली जातात. स्वतःबद्दल बोलताना 'मी'चा व इतरावद्दल बोलताना 'तू' 'तो' इत्यादींचा प्रयोग करावयाचा, इतकाच काय तो यामधील भेद सामान्य माणसाला जाणवतो. पण भारतीय वैयाकरणांची भाषाविषयक दृष्टि फार सूक्ष्म असल्यामुळे त्यांना 'मी' व इतर सर्वनामात केवळ अर्थकृत (Difference of referents) भेदच दिसलेला नसून, या अर्थांच्या पातळीचाहीभेद त्यांना जाणवला असल्यामुळे, त्यांनी 'उत्तम पुरुष' 'मध्यम पुरुष' व 'प्रथम पुरुष' अशी या सर्वनामाच्या वेगवेगळ्या पातळींची निदर्शक नावे ठरविली. येथे ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की ही नावे, 'मी' 'तू' वगैरे सर्वनामांच्या अभिधेय व्यक्तींची नसून ती या सर्वनामांचीच आहेत.

'मी' या शब्दाला खऱ्या अर्थाने अर्थ असतो काय व असला तर तो ऐकणाऱ्याला कळवता येऊ शकतो काय, या प्रश्नाचा आता विचार करावयास पाहिजे. कोणत्याही शब्दाचा काय अर्थ होतो, हे त्या शब्दाच्या प्रयोगाच्या संदर्भावरून ठरवण्यात येते. उदा० 'पुस्तक' या शब्दाचा अर्थ काय, असे कोणी विचारल्यास पुस्तकाकडे अंगुलिनिर्देश करून, 'हा या शब्दाचा अर्थ आहे' असे उत्तर देता येते. शब्दांचा अर्थ सांगण्याच्या या प्रक्रियेला इंग्रजीत (Ostensive definition) असे म्हणतात व ही प्रक्रिया खरा अर्थ (म्हणजे Verbal definition नसलेल्या) असलेल्या वहुतेक सर्वच शब्दांना लावली जाते. पण 'मी' या सर्वनामाच्या वावतीत या प्रक्रियेचा काहीही उपयोग होत नाही, असे विचारान्ती दिसून येते. उदा० समोर नसलेल्या एखाद्या माणसाचे काही शब्द ऐकून 'हा वोलणारा कोण' असे, ते शब्द ऐकणाऱ्याने विचारल्यास, 'तो' 'मी' आहे असे वोलणारा समोर येऊन म्हणतो. यावरून ऐकणारा असे समजतो की, समोर उभा असलेला वोलणारा माणूस 'मी' या शब्दाचा अर्थ आहे, पण हा समज चुकीचा आहे. ही गोष्ट सहज दिसून येईल. बोलणारा जसे स्वतःबद्दल 'वोलणारा मी आहे' असे म्हणू शकतो, तसेच त्यालाच उद्देशून ऐकणारा 'हा वोलणारा मी आहे' असे म्हणू शकत नाही. या वावतींत 'मी' सारखे व्यक्तिवाची सर्वनाम, जातिवाची इतर शब्दांपेक्षा अगदी वेगळे असलेले दिसून येते. ज्या वस्तूला एक माणूस 'पुस्तक' म्हणतो त्याच वस्तूला दुसरा कोणीही पुस्तक म्हणू शकतो. पण प्रत्येक माणसाचा 'मी' चा प्रयोग सारखाच असला, तरी त्याचे अर्थ (Referent) मात्र अगदी वेगवेगळेच असतात. व्यक्तिवाची नावे देखील (राम, कृष्ण यांसारखी) वेगवेगळीच असतात; पण त्यांना अर्थ असतो असे कोणी मानीत नाही.

पण ' मी ' व इतर शब्दांमधे येवढाच फरक आहे असे नाही. कोणत्याही ' मी ' चा खरा अर्थ त्याच्या उच्चारणकर्त्यालाच समजू शकतो, हाही एक विशेष-जो इतर शब्दात आढळत नाही, तो ' मी ' या शब्दात आढळून येतो. या मुद्याच्या स्पष्टीकरणासाठी पूर्वीचेच उदाहरण घेऊ. ' हा बोलणारा कोण ' या प्रश्नावर 'हा मी आहे' असे समोर येऊन उत्तर देणारी व्यक्ति, हा ' मी ' चा अर्थ आहे असे मानल्यास, 'तू म्हणजे तुझे शरीर काय?' असे फिरून त्यावर विचारल्यावर, नाही, असे उत्तर देणे वाजवी होणार नाही. शिवाय ' मी ' च्या अर्थाबद्दल पृच्छा करीत असताना ' तू ' म्हणजे तुझे शरीर काय ? असे विचारण्याऐवजी ' मी ' म्हणजे तुझे शरीर काय ? असे विचारणेच योग्य असून देखील तशाप्रकारचा शब्दप्रयोग उचित समजला जात नाही. याचे कारण असे की ' मी ' चा अर्थ विचारण्यासाठी, प्रस्तुत संदर्भात ' मी ' ने निर्दिष्ट नसलेला माणूस जेव्हा ' मी ' च्या प्रयोगकर्त्या-कडे वळतो तेव्हा त्याच्या त्या वळण्यामुळेच (Shift of attention) ' मी ' चा ' तू ' होऊन जातो व ' मी ' चा अर्थही ' तू ' च्या द्वारेच विचारण्याची त्याच्यावर पाळी येते. पण येथे खरा महत्वाचा जो मुद्दा वरील शब्दप्रयोगाच्या विश्ले-षणाने उघडकीस येतो तो हा की ' बोलणारा मी माझे शरीर ' असे उत्तरादाखल केलेले विधान वरवर बरोबर वाटत असले तरी ते व्याघाती आहे. कारण 'बोलणारे शरीर जर मी आहे ' तर ते माझे (म्हणजे ' मी ' हून वेगळे पण ' मी ' शी संबं-धित असलेले) होऊ शकत नाही व ते माझे असले तर ते ' मी ' होऊ शकत नाही. पण अशा प्रकारचे व्याघाती शब्दप्रयोग बिनदिक्कत जे आपण करीत असतो त्यावरून आपल्या चेतनेत मी पणाचे ' मी ' वरून ' माझ्या 'वर व ' माझ्या'वरून ' मी ' वर सतत परावर्तन (Alternation) चालू असते असे दिसून येते. विशेष बारकाईने पाहिल्यास असेही दिसून येते की, ' बोलणारा मी माझे शरीर आहे' या विधानात, ' मी ' वर या प्रयोगातील इतर शब्दांच्यापेक्षा जास्त जोर दिलेला असतो. त्यामुळे हा ' मी ' (शब्द नव्हे) ' माझ्या'शी स्वतःचे ऐक्य सांगत असताना देखील ' सांगणारा ' या नात्याने स्वतःचे वेगळेपण अभिव्यक्त केल्या-शिवाय रहात नाही. म्हणजे ' मी ' वर जोर देऊन वरील विधान करणाऱ्या माण-साला एकाच वेळी ' मी ' चे वेगळेपण व मीचे शरीराशी ऐक्य, या दोन्ही परस्पर विरुद्ध अशा गोष्टी सांगावयाच्या असतात. हा विरोध पदोपदी आपल्या शब्द-प्रयोगातून व्यक्त होत असला तरी त्याकडे आपले जे लक्ष जात नाही ते, शंकरा-चार्यांच्या म्हणण्याप्रमाणे, 'सत्यानृताच्या मिथुनीभावाला कारण असलेल्या अज्ञाना-मुळेच होय. आचार्यांच्या भाष्यात ' मिथुनीकृत्य ' असा जो शब्दप्रयोग आहे त्याचा ' अभूतद्भावेच्विः' या व्याकरण नियमाप्रमाणे, जे मिथुनात्मक असू शकत नाही त्याचे (अज्ञानामुळे) मिथुन घडवणे असा अर्थ होत असल्यामुळे आत्म्याचे देहाशी मिथुन होणे, आत्म्याच्या आत्मत्वाची थोडीशीही जाणीव असताना अशक्य

असले, तरी अनिर्वचनीय अज्ञानाच्या प्रभावामुळे असे मिथुन प्रत्येक माणूस सतत घडवीत असतो व स्वतः निर्माण केलेल्या या मिथुनात तो सापडतो, असा आचार्यांचा आशय दिसून येतो.

या विवेचनावरून असे दिसून येईल की, व्यवहारात 'मी' चा अर्थ अस्थिर असल्यामुळे व त्या अर्थाच्या बाबतीत बराच गोंधळ असूनही त्याची फारशी कोणासही जाणीव नसल्यामुळे, 'मी' हा शब्द इतर शब्दासारखा नाहीं. व त्याला असामाजिक आणि पूर्णपणे व्यक्तिकेन्द्रित असा अर्थ आहे, ह्या सत्याची कल्पना सहसा कोणालाही येत नाही. साधारणपणे 'मी कोण' असे दुसऱ्याने विचारल्यावर 'जो समोर आहे तो' हे उत्तर समर्पक वाटते. पण त्यावर जर कोणी फिरून विचारले की, मी म्हणजे तुमचा देह काय ?' तर प्रश्नकर्त्याला लगेच निषेधात्मक असे उत्तर मिळते की, 'अहो देह नव्हे, मी म्हणजे मी स्वतः !' म्हणजे देहाशी एकरूप झालेला 'मी' मी स्वतः या रूपाने फिरून देहाहून वेगळा पडतोच. पण यापुढेही प्रश्नकर्त्याने प्रश्न विचारायचे चालूच ठेवले, तर 'मी मन नाही, बुद्धि नाही, कोणतीही मनोवृत्ति नाही, असे म्हणता म्हणता शेवटी, 'मी म्हणजे मी' असेच उत्तर देण्याची पाळी येते. याचा असा अर्थ होतो की, 'मी' चीं जितकी दृश्य व बाह्य रूपे आहेत व ज्यांच्याशी वेळोवेळी 'मी' चे एकीकरण प्रत्येक माणूस करीत असतो, ती सर्व रूपे सामान्य अवस्थेत खऱ्या 'मी' ला झाकून ठेवतात. जेव्हा या सर्व आवरणातून खऱ्या 'मी' ची सुटका होते तेव्हा तो 'मी' फक्त 'मीच राहतो, म्हणजे त्याचें अस्वयंवेद्य असे कोणतेही स्वरूप शिल्लक रहात नाही. हा प्रत्येकाचा 'मी' ज्याचा त्यालाच कळू शकतो. 'मी' शब्दाचा हा खरा अर्थ आहे.

'मी' ची सत्ता

ह्या 'मी' ची सत्ता (अस्तित्व) जगातली सर्वश्रेष्ठ सत्ता आहे. ह्याच्याइतके 'सत्' दुसरे कांहीही असू शकत नाही. याच कारणामुळे 'मी' ला उत्तम पुरुष असे सार्थ नाव व्याकरणाने दिले आहे. यावर कोणी असे विचारू शकतो की, जगात ज्या असंख्य व्यक्ति आहेत त्या सगळयांचे असंख्य 'मी' हे 'मी' नव्हत काय व त्यांच्या सत्ता ह्या सर्वश्रेष्ठ सत्ता नाहीत काय ? प्रश्नाचे उत्तर 'नाही' असेच द्यावे लागेल. मी यावेळी (हा लेख लिहीत असताना) 'मी' च्या पातळीवरून हे विवेचन करीत नसून, सामाजिक किंवा तात्विक पातळीवरून करीत आहे. पण मी 'मी'च्या वैयक्तिक पातळीवर गेल्यावर जगातली सर्वश्रेष्ठ सत्ता ही माझीच असू शकते, ह्याचा मला पूर्ण निश्चय होतो. मीच्या या सर्वश्रेष्ठ सत्तेला इतर सर्व सत्तांच्या तुलनेत 'प्राथमिक सत्ता' असे म्हणावयास हरकत नाही. ह्या मी ला सगळ्यात जवळ असलेले जे मन (व्यक्तीचे) त्याची सत्ता 'मी' च्या सत्तेच्या खालोखाल असते व त्याच्या खालोखाल शरीराची सत्ता असते. म्हणून

सामान्य अवस्थेत 'मी' च्या द्वारे शरीराचा बोध होतो. शरीरासंबंधी विचार करताना मी च्या द्वारे मनाचा बोध होतो. मनाबद्दल विचार करताना 'मी' च्या द्वारे विशिष्ट मनोवृत्तीचा बोध होतो. पण शेवटी या मनोवृत्तींच्याबद्दल जेव्हा आपण बोलू लागतो तेव्हा आपण उच्चारलेल्या 'मी' पासून दुसऱ्याला कोणताही बोध होऊ शकत नाही. ह्या शेवटच्या 'मी' ची सत्ता सर्व संशयापलीकडची व केवळ अन्तदर्शनालाच जाणवणारी अशी असल्यामुळे, तिची शब्दाच्या द्वारे अभिव्यक्ति होऊ शकत नाही.

'तू'

'तू' चा अर्थ 'मी' च्या अर्थाहून अगदी वेगळा व दुसऱ्याला कळण्या न कळण्यासारखा असा आहे. साधारणपणे समोर असलेल्या माणसाचा 'तू' या शब्दाच्याद्वारे निर्देश केला जातो. पण जोपर्यन्त त्या माणसाकडे काही विशिष्ट कारणामुळे आपले लक्ष वेधत नाही व तो माणूस आपल्यासारखा समजूतदार आहे असे आपणास वाटत नाही तोपर्यंत 'तू' या सर्वनामाचा प्रयोग त्या माणसा संबंधी आपण करीत नाही. थोडक्यात असे म्हणता येईल की 'तू' च्या द्वारे दोन व्यक्तीमधील एकतर्फी असा अनुरूप चैतन्य संबंध व्यक्तविला जातो. म्हणून एखाद्या अगदी अडाणी माणसाला सुसंस्कृत समजून त्याच्याशी कोणी सुसंस्कृत माणूस बोलत असताना मधेच बोलणाऱ्याला जर कळून आले की (तो ज्याचा 'तू' म्हणून निर्देश करीत आहे) तो माणूस अगदी मूर्ख असून त्याला आपले म्हणणे बिलकूल समजले नाही, तर बोलणारा फार खजील होतो व आपण काहीतरी वेडेपणा केला असे त्याला वाटू लागते. ज्याप्रमाणे जड वस्तूचा अनेक प्रकारे उपयोग करूनही तिचा 'तू' म्हणून आपण निर्देश करीत नाही, त्याचप्रमाणे आपल्या समोर असलेला माणूस आपल्या चेतनेला अनुरूप साद देण्यास असमर्थ असला, तर त्यालाही 'तू' म्हणून आपण संबोधणार नाही. पण ज्याप्रमाणे आत्मचैतन्याशी अन्तर्दर्शनाच्या द्वारे आपला सरळ संबंध प्रस्थापित होऊ शकतो त्याप्रमाणे 'मी व तू' मधे हा संबंध स्थापित होऊ पावत नाही. 'तू' चे ज्ञान 'तू' च्या दृश्य वर्तनावरूनच होत असते. पण हे ज्ञान या वर्तनापुरतेच मर्यादित नसून या वर्तनामागील चैतन्यालाही गवसणी घालण्याचा प्रयत्न करते. पण हा प्रयत्न पूर्णपणे यशस्वी होत नाही. कारण, जर माझे ज्ञान (किंवा चेतना) समोरच्या माणसाच्या वर्तनातून शिरून त्याच्या पाठीमागील चेतनेचे पूर्ण आकलन करू शकले तर तो माणूस 'तो' न राहता माझ्यादृष्टीने 'तू' राहणार नाही. तो 'मी' होऊन जाईल; यावरून असे दिसते की मला माझ्या खऱ्या मी पणाचा स्पष्ट अनुभव जरी शरीर, मन आदि मी वरील आवरणांच्या निराकरणानेच होऊ शकत असला—व या बाबतीत या अनुभवाचे 'तू' च्या अनुभवाशी पूर्ण साम्य असले तरी— मी च्या

अनुभवात एक वैशिष्टय आहे, जे तूच्या अनुभवातक धीच येऊ शकत नाही. ते असे की देह, मन इत्यादिकांच्या अनुभवालाहीं खऱ्या 'मी' च्या अनुभवाची थोडी फार झाक असतेच. या मुद्द्याचे निदर्शक असे एक विनोदी उदाहरण देता येईल. हिन्दुस्थानातले सगळेच गवळी दुधात पाण्याची भेसळ करतात. कोणी जास्त भेसळ करतो कोणी कमी. पण एखादा गवळी कितीही धाडशी असला तरीं दुधाची झाकच नसलेलें दूध–पाण्याचे मिश्रण दूध म्हणून कधी खपवणार नाही. म्हणजे गवळचाच्या परिभाषेप्रमाणे दोन तृतीयांश दुधाचे मिश्रण जसे दूध मानले पाहिजे तसेच एक पंचमांश दुधाचे मिश्रणही दूधच समजले पाहिजे; फक्त त्यात दुधाची थोडी झाक असली की झाले. याचप्रमाणे देह चेतनेत 'मीपणा'ची चेतना फार कमी असली तरीं ती त्यात नाहीच असे मात्र होत नाही. मनाच्या चेतनेत मीपणाचा बराच मोठा भाग समाविष्ट असतो; त्यामुळे शरीरापेक्षा आपल्याला मन जास्त जवळचे वाटते. पण व्यक्तींच्या कोणत्याही अनुभवात आत्मचैतन्य हे जास्त कमी प्रमाणात कायमच असते. या सत्याचाच उपनिषदातली–न हि द्रष्टुर्दृष्टेर्विपरि लोपो विद्यते– अशासारखी वाक्ये निर्देश करतात.

पण याच्यां उलट, माझ्या 'तू'च्या जाणिवेत 'तू'च्या शरीराचा, त्याच्या वर्तनाचा, किंवा त्याच्या मनाचा समावेश झाल्याशिवाय रहात नाही. म्हणजे जेव्हा जेव्हा मी 'तू'बद्दल बोलतो, तेव्हा तेव्हा 'तू' म्हणून निर्देशिल्या जाणाऱ्या माणसासंबंधीची कोणतीतरी दृश्य गोष्ट माझ्या दृष्टीपुढे आल्याशिवाय रहात नाही. जर 'मी' पणाच्या अनुभूतीला अन्तर्दर्शन असे नाव दिले तर 'तू' पणाच्या अनुभूतीला (Mediated introspection) व्यवहित अन्तर्दर्शन, असे नाव देता येईल. वरील उदाहरणच वापरायाचे असेल तर असे म्हणतो येईल की, जसे काही गवळी दुधात पाणी घालून दुधाचे मिश्रण तयार करतात त्याचप्रमाणे काही इतर गवळी पाण्यात दूध घालूनही दुधाचे मिश्रण तयार करतात. तसेच व्यक्तीच्या सर्व अनुभूतींना जशी नेहमी मी पणाची झाक असते त्याचप्रमाणे व्यक्तीच्या परानुभूतीला–ती कितीही स्पष्ट असली तरी–शरीर, मन इत्यादीपैकी कोणत्या तरी बाह्य उपाधीची झाक असतेच. यामुळेच एकाच चैतन्याचा अनुभव कधी 'मी' तर कधी 'तू' या स्वरूपाने आपण घेत असतो.

'तू'ची सत्ता दुय्यम

'तू'च्या अनुभूतीच्या या वैशिष्टचामुळे 'तू'ची सत्ता ही 'मी'च्या सत्तेहून खालच्या दर्जाची मानावी लागते. 'मी'च्या सत्तेविषयी आपल्या मनात कधीच संशय येऊ शकत नाही. (उदा० 'न हि, जातुकश्चित्संदिग्धेऽहं वा नाऽहं वेति' हें आचार्यांचे वाक्य पहा). पण 'तू'च्या सत्तेविषयी काही विशिष्ट परिस्थितीत आपण संशय घेतो व घेऊ शकतो. उदा० समोर आपल्याशी बोलत

असलेला माणूस हृदयक्रिया बंद पडून एकाएकी मरण पावलेला पाहून आपण स्तंभित होऊन जाऊ. शरीर मन इत्यादिकाशी मिश्रित का होईना पण अशा एका विशिष्ट व्यक्तिरूप चैतन्याचा, समोरच्या व्यक्तीशी बोलण्याच्या प्रसंगी साक्षात्कार घडत असताना, या अपघातामुळे एकाएकी हे चैतन्य समोरून नाहीसे होऊन जावे व त्याच चैतन्याची स्वतःच्या मनात तीव्र अनुभूति कायम असावी, या दोन गोष्टींचा विरोध इतका मूलगामी स्वरूपाचा आहे की, त्यामुळे आपण चकित न झालो तरच आश्चर्य. पण मग आपण आपले कळत न कळत असे समाधान करून घेतो की, जो 'तू' शरीर, मन इत्यादिकांच्या मागे चैतन्याच्या रूपाने आपण पाहिला होता तो खरोखर या शरीर आदिकापासून वेगळा नाही. म्हणजे आपल्याला नंतर असे वाटू लागते किंवा आपण बळेच आपली अशी समजूत करून घेतो की, 'मी 'चा विनाश अकल्पनीय असला तरी 'तू 'चा विनाश हा शक्य आहे. याचाच अर्थ असा की 'तू 'ची सत्ता दुसऱ्या दर्जाची तर 'मी 'ची सत्ता ही पहिल्या दर्जाची असते.

'तो'

'मी' व 'तू' प्रमाणेच 'तो 'चेही तात्विक विश्लेषण अगदी स्वतंत्र असेच आहे. जो माणूस समोर नाही पण ज्याच्याबद्दल विचार करण्याची गरज आहे, अशा माणसाचा 'तो 'च्या द्वारे निर्देश होत असतो. समोर नसल्यामुळे या माणसाशी अनुरूप चैतन्यसंबंध प्रस्थापित होऊ पावत नाही. यामुळे 'मी' व 'तो' मधे इतका मानसिक दुरावा निर्माण होतो की, 'तो 'चे चैतन्यस्वरूपच त्याने झाकले जाते व 'तो 'चे बाह्य स्वरूपच फक्त (त्याबद्दल बोलताना) मनापुढे येते. याचा अर्थ असा की 'तू' पणाच्या जाणिवेत शरीरादि बाह्यांशाची जशी फक्त झाकच असते त्याच्या उलट 'तो' पणाच्या जाणिवेत बाह्यांश हा प्रधान होऊन बसतो व त्यामुळे चैतन्याची थोडीथोडी झाकच त्यांतून प्रगट होत राहते. यास्तव "तो' विषयी आपुलकीची भावना 'मी 'च्या मनात उत्पन्न होत नाही व तसेच 'तो 'च्या सुखदुःखाचे किंवा मृत्यूचेही 'मी 'ला फारसे महत्व वाटत नाही. यावर असा कोणी आक्षेप घेऊ शकतो की, अनोळखी माणसाची वाईट स्थिति पाहून केव्हा केव्हा आपल्याला हळहळ वाटतेच. बरोबर आहे. पण ही हळहळ वाटणे हे त्या माणसाच्या अनोळखीपणावर, किंवा या लेखातील परिभाषेप्रमाणे, त्या माणसाच्या 'तो' पणावर अवलंबून नसते. जोपर्यंत भावनेने आपण अनोळखी माणसाला आपल्या चैतन्यापुढे आणून त्याच्यात (किंवा त्याच्या कल्पनेत) 'तू' पणाची जवळीक उत्पन्न करीत नाही, तोपर्यंत त्या माणसाच्या बद्दल आपल्याला हळहळ वाटणे शक्य नाही. आपल्या सर्व भावना आपल्या कोणत्या ना कोणत्या (Attitude) दृष्टिकोणाशी संलग्न असतात. उदा० मी पणाशी संलग्न जी अहं

भावना किंवा आनंद भावना (joy) आहे, तिचा (Introspective किंवा subjective attitude) आत्मलीनतेच्या दृष्टिकोणाशी संबंध असतो. 'तू' पणाशी संलग्न जी प्रेम किंवा आकर्षणाची भावना आहे तिचा (Intersubjective mediated introspective or social attitude) सामाजिक दृष्टिकोणाशी संबंध असतो, तसेच 'तो' पणाशी संलग्न जी उपेक्षा भावना आहे तिचा (Attitude of indlifference) तटस्थेच्या दृष्टिकोणाशी संबंध असतो. म्हणून कोणाही माणसाविषयी हळहळ वाटण्यासाठी त्याच्या सामाजिक स्वरूपाकडे, म्हणजे 'तू' पणाकडे लक्ष जाणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्याच्याविषयी काही वाटणे शक्य नाही.

'हे' व 'ते'

मी, तू, व तो यांच्या पलीकडच्या अनुभूति 'हे' व 'ते' या सर्वनामांच्या द्वारे व्यक्तविल्या जातात. 'हे' मधे समोर असलेल्या वस्तूचे जाड्य प्रामुख्याने नजरेत भरत असूनही आत्मचैतन्य त्या जाड्यावर आक्रमण करीत असलेसे दिसून येते. पण हे आक्रमण सफल होऊ पावत नाही. कारण इन्द्रियांच्या व मनाच्या वृत्ती समोर असलेल्या वस्तूशी एकाकार होऊ पाहतात; पण त्या वस्तूचे जाड्य किंवा त्या वस्तूबद्दलची जाड्यभावना, या एकाकारतेच्या आड येते, त्यामुळे 'हे'च्या द्वारे निर्दिष्ट होणाऱ्या वस्तूचा, आत्मचैतन्य अर्धवटच स्वीकार करू पावते, या स्वीकारनिषेधात्मक अशा आत्मचैतन्याच्या प्रवृत्तीतून (Oljective attitude) वस्तुनिष्ठ दृष्टिकोण उद्भवतो व त्यापासून त्याच्याशी संबद्ध असलेली उपभोगा (Exploitation) ची किंवा (Manipulation) हवे तसे वस्तूला हाताळण्याची भावना उत्पन्न होते.

येथे एका महत्वाच्या मुद्याचा उल्लेख थोडक्यात केलेला बरा. शास्त्रज्ञ (Scientists) लोक विषयनिष्ठ दृष्टिकोणातूनच जगाकडे पाहण्याचा व त्याच्या द्वारे जगाचे स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न करतात. हा प्रयत्न पूर्णपणे यशस्वी होऊ शकत नाही असे पुष्कळ तत्वज्ञांचे मत आहे. हे मत खरे आहे की खोटे, याचा येथे विचार कर्तव्य नाही. तरी पण वर म्हटल्याप्रमाणे, विषयनिष्ठ दृष्टिकोण जर आत्मचैतन्याच्या स्वीकार–निषेधात्मक परस्पर विरोधी प्रवृत्तीतून जन्मास येतो ही गोष्ट खरी असली, तर शास्त्रज्ञांना हा दृष्टिकोण सोडल्याशिवाय जड जगताचे देखील अंतिम सत्य स्वरूप कळू शकत नाही, असे मानणे भाग आहे. हा विषय प्रस्तुत नसल्यामुळे त्याचा येथे विशेष विस्तार करण्याची जरूर नाही.

'ते' किंवा 'ती'

समोर नसलेल्या जडवस्तुसंबंधी बोलताना वापरलेली 'ते' किंवा 'ती' ही सर्वनामे आत्मचैतन्याच्या अभिभवाची परिसीमा दाखवितो. 'ते'च्या बाबतीत

वाह्य वस्तूचा चैतन्याच्या द्वारे अर्धवट देखील स्वीकार झालेला दिसून येत नाही. या ' ते 'च्या प्रयोगातून (Agnostic किंवाsceptical attitude) अज्ञेयते-च्या दृष्टिकोणाचा प्रादुर्भाव होतो व शुद्ध उपेक्षेची भावना या दृष्टिकोणातून जन्म पावते. जे ' ते ' आहे, ते कसेही असले तरी त्याची दखल घेण्याची आपली तयारी नसते.

मानवी जीवन

या प्रमाणे संपूर्ण मानव जीवन हे, ' मी 'ची एका टोकावरची आत्मलीनतेची अवस्था—जिचा केव्हा केव्हाच मानवाला अनुभव येतो—व त्याच्या दुसऱ्या टोकावरची ' ते 'ची पूर्ण विषय लीनतेची अवस्था, या दोघांच्यामधे हिंदकळत असते. पण या दोन टोकामधील ज्या वेगवेगळ्या अवस्थांचा आपण वर विचार केला, त्या अवस्था त्याच्या शुद्ध स्वरूपात क्वचितच आपण अनुभवू पावतो. कारण त्यांची जीवनामधे सरमिसळ झालेली असते. (या सरमिसळीलाच आचार्यांनी अध्यास म्हटले आहे, हे आता फिरून सांगण्याची गरज नाही). म्हणून ज्याप्रमाणे एकाच जीवनामधे आपण जागृति, स्वप्न व सुषुप्ति या अवस्थांचा अनुभव घेतो, त्याच-प्रमाणे यातल्या एकेका अवस्थेतही इतर सगळ्या अवस्थांचा अनुभव आपल्याला येत असतो. उदा० ' मी ' पणाच्या अनुभवाला जर जागृति मानले तर ' तू ' पणाच्या अनुभवाला स्वप्न व ' तो ' किंवा ' ते ' पणाच्या अनुभवाला सुषुप्ति, असे तुलनात्मक दृष्टीने म्हणता येईल. आपले जीवन हे एकाच वेळी जाग्रत, स्वप्न, सुषुप्त्यात्मक आहे, असे यावरून दिसून येते.

जीवनविषयक ज्ञानाच्या शाखा

येथपर्यंत भाषेतील काही शब्द—प्रयोगाच्या तात्विक विश्लेषणाच्या आधारे आत्मस्वरूपावर काय प्रकाश टाकता येतो हे आपण पाहिले. आता, या आत्म-स्वरूपाचा किंवा त्याच्या जगतातील, वर विवेचिलेल्या विविध अभिव्यक्तींचे अध्य-यन करणाऱ्या ज्ञानाच्या विविध शाखांचे काय उद्दिष्ट असते, हे थोडक्यात पाहू. यासाठी ज्ञानाचे वस्तुशास्त्र, समाजशास्त्र व तत्त्वशास्त्र, असे (वरील विवेचनास धरून) तीन विभाग करता येतील. सगळ्या विषयनिष्ठ दृष्टिकोणावर आधारलेल्या शास्त्रांचा या विभागातील वस्तुशास्त्र या सदरात समावेश होईल. या सर्व शास्त्रांचा उद्देश थोडक्यात असा मांडता येईल की ' सगळे जग हे (Object) वस्तु किंवा ' ते ' असून त्याचा सर्व सामान्य धर्म (Objectivity) ' वस्तुत्व ' (Nature किंवा uniformity of nature) हा आहे. डोळयांना जग विविध दिसते, पण त्याचे सामान्य वस्तुत्व दिसत नाही. या ' वस्तुत्वा 'चा (म्हणजे सर्व वैश्विक प्रक्रियांना लागू पडणारा नियम) शोध लागला की, वस्तुशास्त्रांच्या मते सत्याचा

उलगडा झाला. तत्वज्ञांच्या परिभाषेप्रमाणे 'वस्तुत्व' हे सत्य, विज्ञान, आनंदमय ब्रह्मातील 'सत्यांश' आहे. मानसशास्त्र, नीतिशास्त्र वगैरे समाजशास्त्रे सर्व 'तू' चे, त्यांच्यामधील विज्ञानात्मक दुव्याने एकीकरण करून, 'आम्ही'पणावर आधारलेले मानव जीवनाचे सामाजिकत्व आपल्यापुढे मांडतात. हे सामाजिकत्व ब्रह्माच्या विज्ञानांशाशी संबंधित आहे. तत्त्वशास्त्रे या दोघांच्या पलीकडे जाऊन, सर्व 'मी' चे एकीकरण करून आनंदरूप परब्रह्मतत्त्वाचा आपणास साक्षात्कार करवून देतात. या मुद्द्याचे विस्तृत विवेचन पुढे केव्हातरी केले जाईल.

टीप:– लेखात 'उत्तम पुरुष' या संज्ञेचे तात्विक स्पष्टीकरण आले आहे. इतर संज्ञांची स्पष्टीकरणे लेखातील विवेचनावरून समजण्यासारखी असल्यामुळे त्यांची चर्चा केलेली नाही.

★ ★ ★

पं. नेहरू आणि धर्म

'धार्मिक विधींवर माझा विश्वास नाही. पण माझे असे निश्चित मत आहे की, चांगल्या कृतीतून चांगली फळे निर्माण होतात व वाईट कृतींतून वाईट फळे निर्माण होतात.

'मी वारंवार असे बोललो आहे की, पूजा–अर्चादि विधि म्हणजे धर्म, असे जे मानले जाते त्यावर माझा विश्वास नाही. मला अभिप्रेत असलेला धर्म कोणता, हे माझे मलाच कळत नाही. पण माझी अशी अढळ श्रद्धा आहे की, पदार्थविज्ञान व रसायनशास्त्र यांच्या क्षेत्रात जसे प्राकृतिक सिद्धांत आहेत, नियमबद्धता आहे, तसेच सिद्धांत व तशीच नियमबद्धता सत्कृत्ये व दुष्कृत्ये यांच्याहि क्षेत्रात आहे. सत्कृत्यातून चांगलीं फळे व दुष्कृत्यातून वाईट फळे, कमी अधिक कालावधीत, निर्माण होणें अपरिहार्य आहे. हे कसे व कोणत्या स्वरूपात घडून येते, हे मला सांगता येणार नाही. पण हा प्राकृतिक सिद्धांत आहे, अशी माझी धारणा आहे.'

(नवी दिल्ली, दि. ५ नोव्हेंबर, १९५९;
पत्रपरिषदेत दिलेले वक्तव्य.)

● लेखक पुरुषोत्तम यशवंत देशपांडे ●

लेखकाच्या स्वातंत्र्याचा विचार करू लागले की असे आढळून येते की, लेखक जेव्हा आपल्या विचारांना व भावनांना अभिव्यक्ति देण्याचे ठरवितो, तेव्हा तो साहजिकच अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य गृहीत धरूनच चालतो. आणि जोवर राज्य-शासनाच्या कायद्याशी त्याचा संघर्ष घडून येत नाही, किंवा दीर्घकालीन परंपरेमुळे मान्यता पावल्याकारणाने जनमनात खोल रुजून बसलेल्या प्रस्थापित विचारांशी त्याचा संघर्ष घडून येत नाही, तोवर त्याची ही समजूत अधिकाधिक दृढच होत राहते. पण अशा प्रकारचा संघर्ष ज्या क्षणी घडून येतो, त्याच क्षणी ही स्वातंत्र्या-बद्दलची त्याची कल्पना मुळापासून हादरून जाते.

असा संघर्ष उत्पन्न होताच नानाप्रकारचे प्रश्न त्याच्यापुढे उभे ठाकतात. लेखक, किंवा सर्जनशील असा कलावंत, अभिव्यक्तीचे जे स्वातंत्र्य गृहीत धरून चालतो, ते खरोखर अमर्याद आहे का ? अनुशासनाचे तत्व व स्वातंत्र्याचे तत्व यांच्यात कधीहि न मिटणारा असा विरोध आहे का ? प्रस्थापित समाजव्यवस्थेत प्रगतिशील असा बदल घडवून आणण्यासाठी स्वा ंत्र्याची जेवढी आवश्यकता आहे, तेवढीच अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य जोपासण्यासाठी कोणत्यातरी समाजव्यवस्थेची गरज नाही का ? ज्या परिस्थितीत मनुष्य जीवन घालवतो, त्या परिथितीत कसली तरी व्यवस्था असल्यावाचून माणूस जिवंत तरी राहू शकेल का ? तो राहू शकणार नसेल, तर जे स्वातंत्र्य सर्जनशील व्यक्ति गृहीत धरून चालते, ते स्वातंत्र्य व अनुशासन, किंवा व्यवस्था, यांचा मेळ कसा घालावयाचा ?

लेखक व शासनसंस्था किं वा लेखकाचे स्वातंत्र्य

अनुक्रमणिका

अनुशासन व स्वातंत्र्य

वस्तुस्थिति अशी आहे की, कोणत्यातरी प्रकारचे अनुशासन नसले, तर व्यक्तीला साधे जगणेहि धोक्याचे होऊन बसते. आणि अशा अव्यवस्थित वा अराजक समाजात केवळ जगण्यासाठी धडपड करण्यातच सर्जनशील कलावंत लेखकाचा सगळा काळ जाऊ लागला, तर आपल्या प्रेरणांना मुक्तपणे व्यक्तता देणे त्याला कसे शक्य होईल ? जेथे हे असेच घडत राहते, अशा प्रकारची समाजव्यवस्था ही अर्थातच अगदी प्राथमिक स्वरूपाची अशी व्यवस्था आहे. अशा प्राथमिक अवस्थे-मधूनच, नाना प्रकारच्या संकटांना व अडचणींना टक्कर देत देतच, मानवाने आजवर सुधारणेच्या व संस्कृतीच्या मार्गावरील, आज दिसते एवढी वाटचाल केली. ही वाटचाल करीत असताना माणसाने काही केवळ वैयक्तिक स्वातंत्र्य मिळवि-ण्याचेच प्रयत्न केले असे नाही. तर नवीनवी समाजव्यवस्था अंमलात आणण्याचे प्रयत्न करून अधिकाधिक व्यापक स्वातंत्र्य संपादन करण्याचेहि प्रयत्न मानवाने केले. ही वस्तुस्थिति असल्यामुळे, स्वातंत्र्य आणि अनुशासन ही दोन परस्परविरोधी तत्वे आहेत, अशी कल्पना करणे हे मुळातच चुकीचे आहे.

अमर्याद व अनिर्बंध स्वातंत्र्य ही कल्पना केवळ कल्पित साम्राज्यातीलच आहे. किंवा फार तर परमार्थामध्ये ती शोभून दिसेल, पण वस्तुस्थिति अशी आहे की, मानव व मानवी समाज, हे ज्या विश्वाचे घटक आहेत, त्या विश्वाचे सारतत्व अनुशासन हेच आहे. आपले हे विश्व एकतर अनुशासित तरी असले पाहिजे किंवा अनुशासनशून्य तरी असले पाहिजे. ते जर खरोखर अनुशासनशून्य असेल, तर स्वातंत्र्य किंवा अनुशासन यांच्याबद्दल कसलेहि विधान करणे हे वेडगळपणाचेच ठरेल. तेव्हा हे विश्व अनुशासितच आहे, ही गोष्ट गृहीत धरण्यावाचून गत्यंतरच नाही. त्याचबरोबर, विश्वाचे हे अनुशासन किंवा ही व्यवस्था ही मनुष्यनिर्मित नाही, ही गोष्टहि गृहीत धरावीच लागेल. अशा या प्रकृतितः अनुशासित विश्वाच्या मुळाशी असणाऱ्या तत्वाचा शोध मानवाने अनादिकालापासून चालवला आहे. आजवरच्या इतिहासाच्या ज्ञात व अज्ञात युगायुगातून वेगवेगळ्या मानवी समाजांची जी अनुशासित स्वरूपे दृष्टीस पडतात, ते म्हणजे विश्वाच्या मुळाशी असणाऱ्या अनुशासन–तत्वाचे अपूर्ण असे आविष्कारच होत. कोणत्याहि काळातील मानवी समाजव्यवस्था घेतली, तरी ती म्हणजे प्रकृतिदत्त किंवा ईश्वरदत्त विश्वव्यवस्थेचेच एक अपूर्ण स्वरूप, अशाच प्रकारची मानावी लागते. एखाद्या समाजव्यवस्थेत विश्वव्यवस्थेच्या तत्वांचा अंश अधिक प्रमाणात उतरला, तर एखाद्यात तो अति-शय स्वल्प प्रमाणात दिसून आला, एवढेच. मानवी समाजव्यवस्थेत वैश्विक तत्वांचा अंश जितक्या कमी प्रमाणात उतरलेला असतो, तितक्या जास्त प्रमाणात ती व्यवस्था बदलण्याची माणसाची इच्छा बळावते. प्रचलित समाजव्यवस्थेमधील

कोणत्या ना कोणत्या भागाविषयी असंतोष उत्पन्न होऊन, जेंव्हा माणसे त्या भागाला विरोध करू लागतात, तेव्हा अशा माणसांचा हा असंतोष व हा विरोध हीच इतिहासाला गति देणारी शक्ति बनते. प्रचलित समाजव्यवस्थेत बदल घडवून आणण्याची जी मानवाची धडपड व प्रेरणा असते, ती संपूर्ण समाजव्यवस्था नाहींशी करण्याची प्रेरणा कधीच नसते. तर केवळ अधिक प्रगतिशील व मानवाला अधिक सुखकर, अशी समाजव्यवस्था घडवून आणू पाहणारी ही प्रेरणा असते. ही संकल्पिलेली नवी समाजव्यवस्था वैश्विक व्यवस्थेशी अधिक सुसंगत अशी मानण्यात येत असते, ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. या अशा नव्या समाज-व्यवस्थेत सर्जनशील लेखक-कलावंताला आपल्या विचारांना व कल्पनांना व्यक्तता देणे अधिक सुलभ होईल व वैश्विक तत्वांशी ही व्यवस्था अधिक सुसंगति साधेल, अशी श्रद्धा असते.

इतिहासाच्या मागील शक्ति

प्रस्थापित समाजव्यवस्थेमध्ये कोणत्या ना कोणत्या स्वरूपात बदल घडवून आणण्याचा असा प्रयत्न नाना दिशांनी होत असतो. तत्वज्ञ, धर्मज्ञ, राजकारणी, विज्ञानशास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, लेखक व कलावंत हे सारेच आपापल्या परीने असा बदल घडवून आणण्यास झटत असतात. या सर्वांची एकत्रित होणारी शक्ति हीच इतिहासाला चालना देणारी प्रबल शक्ति बनते. या प्रक्रियेचा अपरिहार्य परिणाम असा होतो की, एकीकडे प्रस्थापित समाज–व्यवस्थेविषयी श्रद्धा आणि दुसरीकडे या व्यवस्थेत प्रगतिकारक बदल घडवून आणण्याची दुर्दम्य आकांक्षा, यांच्यात संघर्ष उत्पन्न होतो. हा संघर्ष हे मानवी इतिहासाचे एक वैशिष्टच आहे. मानवी इतिहासाचे चक्र याच संघर्षाच्या आसावर फिरत असते. वैदिक तत्वज्ञानाने व वैदिक विश्वोत्पत्तिशास्त्राने विशद केलेल्या अनाद्यनन्त अशा कर्मचक्राच्या मुळाशी हीच कल्पना आहे. परंतु आधुनिक बुद्धिवंतांनी मात्र या कर्मचक्राचा आजवर उपहासच केलेला आहे.

मूलभूत संघर्ष

मानवी इतिहासाच्या मुळाशी असणाऱ्या या मूलभूत संघर्षाचा आविष्कार मानवी जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांत झालेला आढळून येतो. अनुशासन–विरुद्ध–लेखकाचे स्वातंत्र्य, ही समस्याहि याच संघर्षाचा एक आविष्कार होय. या समस्येत अंतर्भूत असणाऱ्या संघर्षाचे स्वरूप दुहेरी आहे. (१) वैश्विक व्यवस्था–विरुद्ध–प्रचलित समाजव्यवस्था; आणि (२) प्रचलित समाजव्यवस्था–विरुद्ध-त्या व्यवस्थेत बदल घडवून आणू पाहणारी व्यक्ति.

या दुहेरी संघर्षात दोन गोष्टी गृहीत धरलेल्या असतात. एक म्हणजे प्रस्थापित व्यवस्थेत बदल घडवून आणण्याचा जो प्रयत्न असतो तो, कळत किंवा

अनुक्रमणिका

नकळत, सनातन अशा वैश्विक व्यवस्थेच्या आधारावरच केला जातो. दुसरी गोष्ट अशी की, या अखंड गूढ असणाऱ्या वैश्विक व्यवस्थेचे अधिक ज्ञान करून घेणे आणि या ज्ञानाच्या आधारावर मानवी जीवनाची पुनर्रचना करणे, हाच या सगळ्या मानवी प्रयत्नांचा अंतिम हेतु असतो.

मूलभूत संघर्षामध्ये या दोन गोष्टी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे अंतर्भूत असतातच. त्यामुळे ज्या सर्जनशील लेखकाच्या मनात अभिव्यक्तीची वेगवान प्रेरणा प्रबल होते, त्याला त्या गूढ वैश्विक व्यवस्थेचे थोडेसे तरी दर्शन स्पष्टपणे वा अस्पष्टपणे घडलेलेच असते. स्वतःला घडलेल्या या दर्शनाशी तो जितक्या प्रमाणात एकनिष्ठ राहील, तेवढ्या प्रमाणात प्रस्थापित व्यवस्थेत प्रगतिकारक बदल घडवून आणण्याचे कार्य तो आपल्या निर्मितीच्या द्वारा प्रभावीपणे करू शकेल. अशी वस्तुस्थिति असल्यामुळे, प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध व्यक्तीचे जे बंड असते, ते त्या व्यवस्थेतील काही भागाविरुद्ध असते, समग्र व्यवस्थेविरुद्ध नसते, हे लक्षात ठेवले पाहिजे. वैश्विक व्यवस्थेमागे जे वैश्विक स्वरूपाचे तत्व त्याच्या दृष्टीला दिसते, त्या तत्त्वाशी अधिक सुसंगत असणाऱ्या अशा अधिक चांगल्या समाज-व्यवस्थेसाठीच व्यक्तीचे ते बंड असते. व्यक्तीच्या या बंडामागे असे एखादे नवव्यवस्थेचे तत्त्व जर नसेल, तर ते बंड व्यक्तीच्या दृष्टीने व समाजाच्याहि दृष्टीने सर्वस्वी अर्थशून्य ठरेल.

समस्येचे स्वरूप

म्हणून शासनसंस्था व लेखकाचे स्वातंत्र्य यांच्या संबंधाबद्दलची समस्या ही, '**व्यवस्था–विरुद्ध–स्वातंत्र्य,**' अशा स्वरूपाची समस्या नसून, **प्रस्थापित समाज-व्यवस्था–विरुद्ध–नवव्यवस्था,**' अशा स्वरूपाची ती समस्या असते, ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. सर्जनशील लेखकाला किंवा कलावंताला अभिप्रेत असणारी ही 'नवव्यवस्था,' प्रस्थापित समाजव्यवस्थेपेक्षा वैश्विक व्यवस्थेच्या सत्यस्वरूपाशी अधिक सुसंगत आहे, असे जर दाखविता आले, तरच या नवव्यवस्थेचे खरेखुरे समर्थन होऊ शकेल.

बऱ्याच वेळा असे आढळून येते की, ज्या तळमळीमुळे लेखकाला किंवा कला-वंताला मुक्तपणे आपल्या विचारांना व भावनांना अभिव्यक्ति द्यावीशी वाटते, त्या तळमळीचे खरे महत्व त्याला स्वतःलाच माहीत नसते. आपल्या तळमळीच्या मागे असलेल्या प्रेरणेचे स्वरूप त्याला माहीत नसल्यामुळेच तो केवळ स्वातंत्र्यतत्त्वाचा अजाणता आधार घेतो; व प्रस्थापित समाजव्यवस्थेला विरोध करू लागतो. परंतु सर्जनशील लेखकापुढील किंवा कलावंतापुढील समस्येचे स्वरूप हे 'व्यवस्था–विरुद्ध–स्वातंत्र्य,' किंवा 'शासनसंस्था–विरुद्ध–लेखकाचे स्वातंत्र्य,' अशा प्रकारे मांडणे म्हणजे अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याच्या मुळाशी असणाऱ्या प्रेरणेबद्दल घोर

गैरसमज पसरविणेंच होय. मूळ समस्येबद्दल अशी अतिशय चुकीची कल्पना प्रसृत झाल्यामुळेच विचार प्रणालींच्या सध्याच्या जगात नाना वाद निर्माण झाले आहेत. 'लोकशाहीवादी किंवा मुक्तसमाजव्यवस्थावादी–विरुद्ध–सर्वाधिकारशाहीवादी किंवा बद्धसमाजव्यवस्थावादी,' यांच्यातील अखंड वाद हा या गैरसमजामुळेच उत्पन्न झाला आहे. स्वातंत्र्याचे तत्व हें कोणत्याच प्रकारच्या व्यवस्थेशी न जोडता नुसतेच मांडणें, म्हणजे सर्वाधिकारशाहीविरुद्ध चाललेल्या युद्धात सपशेल हार खाणेंच होय.

चुकीच्या मांडणीचे दुष्परिणाम

अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नाची अशी भयानक चुकीची मांडणी झाल्यामुळेच, सर्वाधिकारशाहीची वाढ पश्चिमेकडे आणि पूर्वेकडे इतकी झपाट्याने होऊ शकली. प्रस्थापित समाजव्यवस्थेपेक्षा, म्हणजे लोकशाही व सर्वाधिकारशाही या दोन्ही व्यवस्थापेक्षा अधिक चांगल्या समाजव्यवस्थेचे अधिष्ठान अभिव्यक्ति–स्वातंत्र्याला जर प्राप्त करून दिले नाही, तर त्या स्वातंत्र्याच्या केवळ स्वतंत्र मूल्याला काही अर्थ राहणार नाही. नव्या व अधिक चांगल्या समाजव्यवस्थेचे खरोखर परिणामकारक रीतीने समर्थन करावयाचे असले, तर ही नव–व्यवस्था सध्याच्या कोणत्याहि प्रस्थापित समाजव्यवस्थापेक्षा वैश्विक व्यवस्थेमागील प्राकृतिक तत्वाशी अधिक सुसंगत आहे, हे निर्विवादपणें सिद्ध केले पाहिजे.

व्यवस्थेच्या रक्षणासाठी स्वातंत्र्यावर बंधने घालण्याचे जसे समर्थन करता येते, तसे कोणत्याहि व्यवस्थेचे अधिष्ठान नसणाऱ्या स्वातंत्र्याचे समर्थन करता येणार नाही. याचे कारण हे आहे की, व्यवस्था ही स्वातंत्र्यापेक्षा अधिक मूलभूत स्वरूपाची आहे. कारण बंधनविरहित स्वातंत्र्याचा शेवट संपूर्ण अराजकामध्ये किंवा रानटी अवस्थेतच होतो. आणि त्यामुळे अखेर सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याचाच पूर्ण नाश होतो. केवळ स्वातंत्र्यासाठी स्वातंत्र्याचे मूल्य मानणाऱ्यांनाहि या तत्वाचा उद्घोष करता येतो, तो एकाच आधारावर: त्यांच्या स्वतःच्या जीवनांत कोणत्या तरी प्रकारची व्यवस्था असते, म्हणून त्यांना हे करणे शक्य होते. पण स्वतःच्या जीवनातील या व्यवस्थेचा त्यांना विसर पडून 'स्वातंत्र्यासाठी स्वातंत्र्य' या तत्वाचा ते आक्रोश करू लागतात. वस्तुतः ज्याप्रमाणे जबाबदारीवाचून अधिकार असू शकत नाही, त्याचप्रमाणे कोणत्या तरी वैयक्तिक व सामाजिक व्यवस्थेवाचून स्वातंत्र्य राहूच शकत नाही. म्हणून प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या नावाने स्वातंत्र्यावर जी बंधने लादली जातात, त्यांच्याविरुद्ध झगडायचे असले, तर त्याचा एकच मार्ग आहे. वैश्विक व्यवस्थेच्या मागे असणाऱ्या प्राकृतिक तत्वाशी सर्वस्वी विसंगत असणाऱ्या अशा व्यवस्थेने लादलेली ही बंधने आहेत आणि म्हणून निसर्ग व मानव यांच्या विरुद्ध ती आहेत, हे सिद्ध करून दाखविणे, हाच तो मार्ग आहे.

आधुनिक विज्ञानाचे कार्य

वर मांडलेल्या विचारातील सत्यता आधुनिक विज्ञानाने पूर्णपणे सिद्ध केली आहे. पिसाच्या झुलत्या मनोऱ्यावर चढून गॅलिलिओने जो एक साधा प्रयोग केला, त्यामुळे जड व हलक्या पदार्थांच्या खाली पडण्याबद्दलचा जो ॲरिस्टॉटलप्रणीत नियम अबाधित गणला जात होता, त्याची अबाधितता तर त्याने पूर्ण नाहीशी करून टाकलीच; परंतु त्याचबरोबर मध्ययुगीन जगतात तत्कालीन वैश्विक व सामाजिक व्यवस्थेविषयी ती त्रिकालाबाधित सत्यावर आधारली आहे अशी जी आंधळी श्रद्धा अस्तित्वात होती, तिलाही त्याने जबरदस्त धक्का दिला. आधुनिक विज्ञानाने निर्माण केलेल्या यंत्र–तंत्रशास्त्राने मानवी समाजव्यवस्थातच उलथा-पालथ घडवून आणली असे नाही, तर समाजव्यवस्थेविषयी त्या काळी अस्तित्वात असलेल्या सगळयाच विचारप्रणाल्यांना आधारभूत मानल्या गेलेल्या तत्वांचाहि पाया खिळखिळा करून त्या सर्व विचारप्रणाल्यांना आपल्या विश्वव्यवस्थेबाबतच्या नव्या तत्वाने विज्ञानाने आव्हान दिले. आधुनिक विज्ञानाने निर्माण केलेल्या यंत्र–तंत्रशास्त्राने स्वातंत्र्याच्या चळवळींना जोराची चालना दिली. आणि –'स्वातंत्र्य-समता-बंधुभाव–' या मूल्यांवर आधारलेल्या समाजक्रांत्याहि त्यामुळेच घडून आल्या. स्वातंत्र्याच्या या मूल्याला नवसमाजव्यवस्थांत जे स्थान मिळाले, त्याचे कारण हे होते की, आधुनिक विज्ञानाने–विश्वव्यवस्थेचे जे नवे तत्व शोधून काढले होते, त्या तत्वाशी सुसंगत असेच ते स्वातंत्र्यमूल्य होते. ते नुसते स्वातंत्र्यासाठी स्वातंत्र्य नव्हते, तर आधुनिक विज्ञानाने विश्वव्यवस्थेबद्दलचे जे तत्व गृहीत धरले, त्याच्याशी सुसंगत असे हे स्वातंत्र्यमूल्य होते. हे विश्वव्यवस्थेचे नवे वैज्ञानिक तत्व नाना प्रकारच्या शोधांनी सिद्ध झाले होते; या शोधातून अश्रुतपूर्व अशी उत्पादनाची व विनाशाची शक्तिशाली साधने निर्माण झाली. आधुनिक विज्ञानाच्या या विलक्षण प्रभावशालित्वामुळेच स्वातंत्र्य–समता–बंधुभाव यासारख्या मूल्यांचा मुक्त उद्घोष करणे मानवाला शक्य झाले. विश्वाच्या घटनेमध्ये अनुस्यूत असलेले विश्वव्यवस्थेचे नवे तत्व विज्ञानाने सिद्ध करून दाखविले, म्हणूनच सामाजिक क्षेत्रात स्वातंत्र्याच्या कल्पना मूर्त स्वरूपात आणण्याच्या क्रियेला फार मोठी अशी चालना मिळाली.

आधुनिक जगात, कला, साहित्य, राजकारण व तत्वज्ञान या सर्वच क्षेत्रात ज्या नवनव्या विचारप्रणालि निर्माण झाल्या, त्या सगळ्या वस्तुतः आधुनिक विज्ञानाच्या तत्वावर, प्रत्यक्षात उतरलेल्या त्याच्या विलक्षण प्रभावावरच आधारलेल्या आहेत. म्हणून, सर्वस्वी परोपजीवी अशा ह्या सर्व विचारप्रणालि आहेत. या सर्व विचारप्रणालींना आधारभूत विज्ञानाहून वेगळे, असे स्वतःचे तत्व किंवा वेगळी विश्वव्यवस्थेची कल्पना नाही.

ज्या क्रांतिकारक विचारप्रणालींचा उद्घोष आजचे लेखक, कलावंत

राजकारणी व वुद्धिवंत मोठचा डौलाने करीत आहेत, त्या सगळचा विचारप्रणालि या आधुनिक विज्ञानाने दिलेल्या विश्वव्यवस्थेच्या तत्वावरच उभ्या राहणाऱ्या अशा परोपजीवी विचारप्रणालि आहेत. हे कटु सत्य ओळखण्याची आता वेळ आली आहे.

मुख्य प्रश्न

ज्या ज्या लेखकाला किंवा कलावंताला शब्दाच्या माध्यमातून किंवा दुसऱ्या माध्यमातून अभिव्यक्ति करावयाची आहे, त्या प्रत्येकाने प्रथम पुढील प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजे: 'आधुनिक विज्ञानाने मांडलेले विश्वव्यवस्थेचे तत्व हे सत्य आहे का?' या प्रश्नाचे उत्तर जर अस्तिपक्षी असेल, तर त्याचा सरळ परिणाम असा होईल की, या विज्ञानप्रणीत विश्वव्यवस्थेमध्ये स्वातंत्र्याचे तत्व पूर्णपणे अर्थशून्य आहे, हेच तर्काने सिद्ध होईल. कारण आधुनिक विज्ञानाने सिद्ध केलेल्या विश्वव्यवस्थेमागे काटेकोर गणिती स्वरूपाची अशी सात वैश्विक शाश्वते (Cosmical constants) गृहीत धरली आहेत. या सात वैश्विक शाश्वतांच्या समुच्चयातूनच हे विश्व वनले आहे, असे आधुनिक विज्ञान मानते. ही सात वैश्विक शाश्वते पुढीलप्रमाणे आहेत: (१) इलेक्ट्रॉनचा चार्ज; (२) इलेक्ट्रॉनचे घनमान; (३) प्रोटॉनचे घनमान; (४) प्लँक्चे शाश्वत 'एच'; (५) प्रकाशाचा वेग; (६) गुरुत्वाकर्षणाचे शाश्वत; (७) वैश्विक शाश्वत. अशा सात वैश्विक शाश्वतांवर आधारलेली विश्वाची रचना असल्यामुळे, ज्या नियमात ही संख्यात्मक वैश्विक शाश्वते काही विशिष्ट प्रमाणात अंतर्भूत आहेत, त्याच नियमांना वैश्विक स्वरूपाची यथार्थता प्राप्त होऊ शकते, हे उघड आहे. विशिष्ट प्रकारच्या संख्यात्मकतेने बद्ध अशा या सात शाश्वतांच्या संबंधानाच काय तो भौतिक व वस्तुगत, म्हणजेच प्राकृतिक असा अर्थ आहे. यांच्या कक्षेत न येणाऱ्या मानवी भावना, विचार, कल्पना इत्यादि इतर सर्व गोष्टींना व त्यांच्यावर आधारलेल्या तथाकथित सर्जनशील कृतींना केवळ आत्मगत स्वरूपाचे, म्हणजेच केवळ काल्पनिक मूल्य तेवढेच काय ते आहे. या प्रकारच्या सर्व गोष्टी, ज्यांची त्यांच्यावर श्रद्धा आहे, त्यांच्याच पुरत्या यथार्थ किंवा सत्य आहेत, असाच या सगळयाचा निष्कर्ष निघतो. या श्रद्धा किंवा हा विश्वास म्हणजे निव्वळ कल्पनारंजन आहे, त्यांना वस्तुगत स्वरूपाची यथार्थता किंवा वैश्विक स्वरूपाचा अर्थ मुळीच नाही. दुसरे असे की, या श्रद्धा बदलत असतात आणि आधुनिक वैज्ञानिक विचारसरणीशी सुसंगति साधण्यासाठी तर त्यांच्यात कितीतरी फरक होत आले आहेत. मानवी भावनाविचाराबद्दलचा विज्ञानाचा दृष्टिकोण हा असा आहे. विज्ञानाच्या या दृष्टिकोणाशी आधुनिक लेखक-कलावंताला सामना द्यावयाचा आहे. या प्रश्नाच्या खोलात शिरण्याचा प्रयत्न आधुनिक कलावंतांपैकी फारच थोड्यांनी केला आहे. मग ते पाश्चिमात्य

कलावंत असोत की पौर्वात्य असोत. आधुनिक विज्ञानाची विश्वकल्पना जर खरी असेल, तर वैयक्तिक व सामाजिक हेतूसाठी यंत्र–तंत्र–शक्तीची अधिकाधिक बलशाली संघटना करणे, हीच मानवी जीवनातील सर्वांत महत्वाची गोष्ट होऊन बसते. नीतिशास्त्र व सौंदर्यशास्त्र, ही शास्त्रे आत्मगत स्वरूपाची मानली गेल्यामुळे, त्यांना या व्यवस्थेत केवळ दुय्यम स्वरूपाचेच स्थान प्राप्त होते. विज्ञान–तंत्रज्ञानाने प्रभावित झालेल्या सध्याच्या जगात सामाजिक–राजकीय तत्वप्रणालींच्या नांवाखाली मिरवणाऱ्या या ना त्या सत्ताकारणाला सुंदर झूल पुरवणे, एवढेच कार्य काय ते या शास्त्रांना मिळते. 'कलावंतांचा कारखाना' किंवा 'साचेबंद कलावंत' हे शब्दप्रयोग काही एकट्या सर्वाधिकारी सत्ताकारणाशीच निगडित झालेले नाहीत. या शब्दप्रयोगात चुकले ते एवढेंच की, त्यांतील अर्थ फारच उघड व नग्न स्वरूपात पुढे मांडला गेला आहे. पण वस्तुस्थितिच अशी आहे की, विज्ञान व यंत्रतंत्रशास्त्र यांनी प्रभावित झालेल्या आजच्या जगात मानवाच्या नैतिक व सौंदर्यविषयक प्रेरणांचे अनन्य स्वरूप, वस्तुगत मूल्य व त्यांची यथार्थता, यांना हळूहळू ओहटीच लागत जाणार. विज्ञानाच्या विश्वव्यवस्थेत या प्रेरणांना काहीच मूलभूत स्वरूपाचे महत्व दिले गेले नाही. सूर्याच्या दाहक उष्णतेचा स्पर्श होताच मोहक दवबिंदु जसे नाहीसे होऊन जातात, त्याचप्रमाणे वस्तुस्थितीच्या प्रखर स्पर्शाबरोबर या कलात्मक प्रेरणांचे दृष्टिभ्रमहि निश्चितपणे नाहीसे होतील, असे विज्ञान मानते.

लोकशाही व सर्वाधिकारशाही

शासन संस्था व लेखकाचे स्वातंत्र्य, यांच्या संबंधाची समस्या सोडवायची झाल्यास किंवा नुसती समजून घ्यावयाची झाल्यास, लोकशाही किंवा सर्वाधिकारशाही यांच्याविषयी वाद माजवून काही ती सुटणार नाही किंवा समजणारहि नाही. या दोन्ही विचारप्रणाल्या म्हणजे आधुनिक विज्ञान व यंत्रतंत्रशास्त्र यांचीच संताने होत. आधुनिक विज्ञानाच्या शोधातून निघालेल्या यंत्रशास्त्राने जेव्हा औद्योगिक क्रांति केली आणि त्या काळच्या मध्ययुगीन सरंजामशाहीविरुद्ध या औद्योगिक क्रांतीने लढा पुकारला, त्या पहिल्या नवोत्साहाच्या काळाचे एक अपत्य म्हणजे लोकशाही हे होय. पुढे त्याच यंत्रशास्त्रात जसजसे नवनवीन शोध लागत गेले, तसतसे पूर्वीच्याच प्रक्रियेचे क्षेत्र वाढत जाऊन त्याने सामाजिक क्षेत्रहि व्यापले. आणि याच तर्कसंगत परिणतीतूनच कम्युनिस्ट सर्वाधिकारशाही जन्माला आली. अशा प्रकारे मानवी इतिहासात प्रथमच सत्ताकारणाला वैश्विक यथार्थता व सार्थकता प्राप्त झाली आहे. आधुनिक विज्ञानाच्या विश्वदृष्टीने नीतिशास्त्र व सौंदर्यशास्त्र यांचा मूलाधारच नाहीसा करून टाकला आहे. विज्ञान व यंत्रज्ञान यांच्यावर आधारलेल्या सत्ताकारणाने निर्माण केलेल्या सर्वव्यापी समाज व्यवस्थेत, वाटेल त्या उपायांनी

स्वतःसाठी जास्तीत जास्त चांगले स्थान मिळविणे म्हणजेच वस्तुस्थिति ओळखणे होय, असा आजचा सर्वमान्य संकेत आहे. या शिवाय दुसरा कसलाहि प्रयत्न करणे म्हणजे विज्ञानवादी वास्तववाद्यांच्या कुचेष्टेचा विषय होणाऱ्या कल्पनासाम्राज्यात रमणेच होय.

सत्ताकारण आणि स्वातंत्र्य ही दोन्ही कधीहि एकत्र नांदू शकणार नाहीत. विज्ञानाचे तंत्रशास्त्र जसजसे अधिकाधिक सूक्ष्म होत जाईल, जसजसे सत्ताकारणाचे व त्यावर आधारलेले योजनाबद्ध समाजव्यवस्थेचे क्षेत्र अधिकाधिक विशालतर होत जाईल, तसतसे स्वातंत्र्याचे क्षितिज आकुंचन पावत जाणार, हे निश्चित आहे. सतत विकास पावत जाणाऱ्या यंत्रतंत्र शास्त्रावर आधारलेल्या योजनाबद्ध समाजव्यवस्थेला नैतिक किंवा सौंदर्यविषयक मूल्यांची कदर करण्याचे काहीच कारण नाही. विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या जगन्नाथाच्या रथाखाली सगळ्यांच मूल्यांचा चुराडा होत चाललेला आहे.

नव्या विश्वदृष्टीची आवश्यकता

आजच्या लेखकापुढे व कलावंतापुढे जी भीषण समस्या आज उभी ठाकली आहे, तिचे थोडक्यात स्वरूप, वर वर्णिल्याप्रमाणे, हे असे आहे. लेखकांच्या किंवा कलावंतांच्या सर्जनशील कृति या नैतिक, सौंदर्यविषयक किंवा तत्वज्ञान विषयक अशा असतात. या सर्जनशील प्रेरणांना ज्यांत महत्वाचे स्थान आहे व त्या प्रेरणां ज्यात मूलभूत स्वरूपाच्या व विश्वाला आणि मानवीजीवनाला सारख्याच आधारभूत अशा मानल्या जातील, अशी नवी विश्वदृष्टि क्षितिजावर आली, तरच तत्वज्ञान, नीतिशास्त्र व सौंदर्यशास्त्र यांना सर्जनशील कृति, अशी सार्थता ती प्राप्त करून देऊ शकेल. आणि या सर्वांच्या अभिव्यक्तीसाठी आधारभूत म्हणून स्वातंत्र्य या मूल्याचेहि रक्षण ती नवी विश्वदृष्टि करू शकेल. अशा प्रकारच्या नव्या विश्वदृष्टीचे अंकुर आधुनिक विज्ञानाच्या गाभ्यातच दिसून येऊ लागले आहेत. परंतु दुर्दैव हे आहे की, हायड्रोजन बॉंब, नियंत्रित आकाशगामी अस्त्रे किंवा कृत्रिम ग्रह, याच विज्ञानातील गोष्टींचा प्रभाव आजच्या लेखक-कलावंतावर अधिक दिसून येतो. त्यांच्या तुलनेत विज्ञानाच्या गाभ्यातील नव्या विश्वदृष्टीच्या अंकुराकडे त्यांचे दुर्लक्षच झालेले दिसून येते. नवनिर्मितीच्या नव्या विश्वदृष्टीपेक्षा विनाशाच्या व मृत्यूच्या तांडवानेच लेखक-कलावंतांचे लक्ष अधिक वेधून घेतलेले दिसते. अशा प्रकारच्या लेखक-कलावंतांच्या दृष्टीने स्वातंत्र्याची भाषा देखील हळूहळू अर्थशून्यच होत जाईल. वस्तुतः साऱ्या मानवी भावना-कल्पना-विचारांची थट्टा करणारी व त्यांच्या अभिव्यक्तीकडे केवळ दयेच्या दृष्टीने पाहणारी जी आधुनिक विज्ञानाची विश्वदृष्टि आहे, तिच्यामुळे ज्यांना आपल्या मर्मावर खोल आघात झाल्याची दुःखदायक

जाणीव क्षुब्ध करीत नाही, ते लेखक–कलावंत हे अस्सल नाहीतच. त्यांना काही भविष्य नाही, म्हणून त्यांची संपूर्ण उपेक्षाच केली पाहिजे.

सर्व सर्जनशील कृतींना आधारभूत असे स्वातंत्र्याचे मूल्य जर नव्याने प्रस्थापित करावयाचे असेल, आणि दिक्कालाने मर्यादित अशा भौतिक जगांच्या पलीकडे त्याचे क्षितिज विस्तारावयाचे असेल, तर साऱ्या सर्जनशील लेखक–कलावंतांच्या शक्ति एकाच कार्यावर केंद्रित झाल्या पाहिजेत. अणुस्फोटकाने चकित झालेल्या आजच्या जगापुढे नव्याने शोधलेली अशी नवी विश्वदृष्टि कलावंताच्या त्या केंद्रित शक्तीने मांडली पाहिजे. या नव्या विश्वदृष्टीत भौतिकता व उपयुक्तता-वादी स्वरूपाच्या प्रेरणा खालच्या पायरीवर राहतील; आणि शुद्ध स्वरूपातील तत्वज्ञान विषयक, नीतिविषयक व सौंदर्यविषयक प्रेरणांना या विश्वव्यवस्थेमध्ये उच्च श्रेणीतील स्थान प्राप्त होईल; अशा प्रकारच्या विश्वदृष्टीचा शोध जोवर लावला जात नाही व ती दृष्टि प्रभावीपणे जगापुढे मांडली जात नाही, तोवर स्वातंत्र्याची ओरड, हे केवळ अरण्यरुदनच ठरणार.

नव्या क्रांतीच्या दिशेने

जगाच्या विनाशाचे नैराश्यमय भविष्य वर्तविणाऱ्यांपैकी एक होण्याची माझी इच्छा नाही. आजच्या विज्ञानाच्या सर्वस्वी भौतिक अशा विश्वदृष्टीचा संपूर्ण निरास करता येणे शक्य आहे, अशी माझी श्रद्धा आहे. भौतिक परमाणु ही जर सत्यवस्तु आहे, तर मानवाच्या मनाचे व आत्म्याचे व्यापार ह्याहि तितक्याच प्रकृतितः सत्यवस्तु आहेत. भौतिक परमाणु किंवा विद्युत् तरंग यांच्या मोजलेल्या चलनवलनावर आधारलेली अशी विश्वदृष्टि जर विज्ञानाला प्रस्थापित करता येते, तर निसर्गाचेच घटक असणारे जे मनाचे व आत्म्याचे व्यापार, त्यांच्यावर आधारलेली अशी नवी विश्वदृष्टि सहजच प्रस्थापित करता आली पाहिजे. वस्तुतः, प्राचीन काळीच वैदिक दर्शनकारांनी व द्रष्ट्यांनी आत्मसाक्षात्कारांच्या तंत्राने युक्त अशी विश्वदर्शनाची मांडणी केली होती. त्या आत्मसाक्षात्कारांच्या तंत्रांला आजच्या विज्ञानाच्या आधुनिकतम शोधांनीहि कसलाच धक्का पोचलेला नाही, ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. या वैदिक दर्शन शास्त्रांचा सखोल अभ्यास करून वैदिक विश्वदर्शन हे आधुनिक वैज्ञानिक विश्वदृष्टीपेक्षा अधिक वस्तुनिष्ठ कसे आहे, हे आजच्या बुद्धिवंतांना समजेल अशा नव्या परिभाषेत त्यांची मांडणी करण्याची जबाबदारी आपणा भारतीय लेखकांवर व बुद्धिमंतावर आहे. साऱ्या जगातील अजाण मानवी मनावर अधिराज्य गाजविणाऱ्या आसुरी सत्ताकारणा-पासून जगाचे व स्वतःचे रक्षण करण्यासाठी या नव्या विश्वदर्शनाच्या दिशेने नव्या सर्जनशील कृति निर्माण करण्यास भारतीय कलावंत–लेखकांना फार मोठा वाव आहे.

पण हे मात्र पक्के ध्यानात ठेवले पाहिजे की, आधुनिक विज्ञानाचे संपूर्ण

भौतिक असे विश्वदर्शन मानवाच्या मनातून जोपर्यंत पूर्णपणे नाहीसे करतां येणार नाही, तोपर्यंत लेखकांचे स्वातंत्र्य हे धोक्यातच राहणार. आधुनिक विज्ञान–तंत्राच्या साह्याने आजची राज्ये ही मानवावर सर्वव्यापी सत्ता गाजविणारी अशीं शक्तिशाली साधने बनली आहेत. तरीहिं शब्दाच्या सर्जनशील सामर्थ्यानें आजच्या मोठमोठ्या लोकशाही राष्ट्रांतील लोकांच्या मनावर फार मोठा प्रभाव पाडणे अद्यापहि शक्य आहे. परंतु यासाठी लेखक–कलावंतांच्या सर्जनशील प्रेरणांची अभिव्यक्ति वैश्विक स्वरूपाची झाली पाहिजे. कारण आजच्या जगात भौतिकता व उपयुक्ततावादी प्रेरणांचा एवढा विलक्षण प्रभाव माणसांच्या मनावर पडला आहे की, प्रचंड शासनयंत्रांची गुलामगिरी सर्वसामान्य माणसे आपखुषीने पत्करीत आहेत. या विश्वव्यापी प्रभावाशी टक्कर देण्यासाठी लेखक–कलावंतांची सर्जनशील अभिव्यक्ति वैश्विक स्वरूपाचीच असली पाहिजे. आधुनिक विज्ञान–तंत्राने प्रस्थापिलेल्या खोटचा विश्वदर्शनाच्या मगरमिठीतून प्रथम स्वतःची सुटका करून घेणे, हे आजच्या सर्जनशील लेखक–कलावंताचे ऐतिहासिक स्वरूपाचे कर्तव्य आहे. आणि हे केल्यावर प्रचंड स्वरूपाची सर्वव्यापी शासनयंत्रे बनविण्यास ज्या ज्या प्रवृत्ति साह्यीभूत होतात, त्या सर्वांवर निष्ठुरपणे मर्मघातक हल्ला चढविणे, हे त्याचे दुसरे ऐतिहासिक कर्तव्य आहे.

प्रथम हे पूर्णपणे समजून घेतले पाहिजे की, लेखक–कलावंतांच्या स्वातंत्र्यासाठी करावयाचा लढा म्हणजे विज्ञानप्रणीत भौतिक जडवादी विश्वदर्शनाला आव्हान देणाऱ्या नव्या चैतन्यवादी विश्वदर्शनासाठी करावयाचाच लढा आहे. हा लढा तत्वज्ञानविषयक, नैतिक, सौंदर्यविषयक, राजकीय व सामाजिक, अशा सगळ्याच आघाड्यांवर लढावयाचा आहे. तसेच तो आंतरराष्ट्रीय क्षेत्रातहि लढावयाचा आहे. या ऐतिहासिक व क्रांतिकारक युद्धाचा जो शेवट होईल, त्यावर केवळ लेखक–कलावंतांचे स्वातंत्र्य नव्हे, तर समग्र मानव जातीचे भवितव्य अवलंबून आहे.

बौद्धिक, मानसिक व आध्यात्मिक अशा सर्वव्यापी स्वरूपाच्या क्रांतीचा प्रारंभ आपणास करावयाचा आहे. आधुनिक विज्ञानाने जो सत्तेचा हपाप सुलभ करून दिला आहे, त्याचे विश्वव्यवस्थेतील योग्य स्थान या क्रांतीने दाखवून दिले पाहिजे. तसेच उपयुक्ततावादी प्रेरणांच्या आहारी जाऊन सर्वव्यापी अशा लोककल्याणकारी किंवा सर्वाधिकारवादी शासनयंत्रांची गुलामगिरी पत्करणाऱ्या मानवी मनाची, त्या प्रेरणांच्या भयानक मगरमिठीतून या क्रांतीने मुक्तता केली पाहिजे.

ही नवी, सर्वव्यापी व यथार्थाने मानवी अशी क्रांति घडवून आणण्यासाठी अखिल भारतीय लेखक परिषदेने एक नवे व्यासपीठ निर्माण केले पाहिजे. आणि प्राकृतिक

विश्वव्यवस्थेशी सुसंगत असणाऱ्या अशा नव्या समाजव्यवस्थेच्या निर्मितीसाठी, या व्यासपीठाचा आंतरराष्ट्रीय व्यासपीठाशी निकटचा संबंध जुळवून आणला पाहिजे. याच दिशेने पावले टाकल्यास मानवाच्या सर्व सर्जनशील प्रेरणांचा पूर्ण विकास घडवून आणण्याची आशा आहे. असा संपूर्ण विकास घडून आला तरच समाज–व्यवस्था व स्वातंत्र्य, शासनसंस्था व व्यक्ति, यांच्यातील संघर्ष नाहीसे होतील. आणि मानवी जीवनाला आवश्यक अशा सर्व जीवनमूल्यांची एका विशाल विश्वदृष्टीत जुळणी होऊन, मानवी जीवन हे, समाजव्यवस्था व व्यक्तिस्वातंत्र्य ही दोन जणू एकाच रथाची दोन चाके आहेत अशा रीतीने, चैतन्यमय सर्जनशीलता व ज्ञानमय मुक्ति यांच्या दिशेकडे उत्साही आत्मविश्वासाने प्रवास करू लागेल.

(मूळ इंग्रजीवरून रूपांतरित– **वि. देशपांडे**)

टीप : हा प्रबंध गेल्या वर्षी मद्रास येथे भरलेल्या अखिल भारतीय लेखक परिषदेत चर्चेसाठी मांडला गेला होता. **– संपादक**

* * *

आला श्रावण तरीहि……..

तुझ्यासह होतो उभा
अग्नीच्याहि वर्षावात
साहवत होतो दोघे
सारे काही आनंदात !

तेव्हा होता चैत्रातहि
तुझ्या प्रीतीचा गारवा
आला श्रावण तरीहि. .
आता दिसेना ओलावा !

–कृष्णा चौधरी

पूर्वग्रह

[एक अंक दोन प्रवेशी नाटिका]

लेखक
वसंत वरखेडकर

●

सन १९४३
पार्श्वभूमि स्वातंत्र्यपूर्व कालातील. दृश्य एका बड्या सरकारी अधिकाऱ्याच्या बंगल्यातील दिवाणखान्याच्या दालनाचे. रंगभूमीवर तो बडा अधिकारी, बाबुराव व त्याची मेहुणी पुष्पा.

[पूर्वार्ध]

पुष्पाः–(उल्हसित वृत्ति निदर्शक)

गोकुल में कहीं
मथुरा में सही
हाँ. तुम्हे ढूंडहि लेंगें कहीं न कहीं.

बाबुरावः–मेहुणीवाई, आज काही विशेष दिसतं आहे.

पुष्पाः–विशेष ? हो. विशेषच म्हटलं पाहिजे. तुम्ही आणि आपल्या परमपूज्य ज्येष्ठ भगिनी विमलाबाई यांच्या युद्धाच्या नौबती झडू लागल्या आहेत. विशेषच आहे हे.

बाबुरावः–पुष्पाबाई, आपण गाणं गुणगुणत होतात ते मोठ्या खुशीत. नवरा बायकोच्या भांडणानं आपण खुशीत आलात होय ?

पुष्पाः–खुशीत ? (नकली स्वरात) माझं अंतःकरण शतशः विदीर्ण झालं आहे. बाबुराव कसं हो व्हायचं तुमचं ?

बाबुरावः–पुष्पा, हे बघ तू लहान आहेस. वयानं. अधिकारानं. माझी मेहुणी आहेस. पाहुणी आली आहेस. यू शुड नॉट टेक लिबर्टीज.

अनुक्रमणिका

पुष्पा:–(नकली स्वरात) साहेब. चुकले. क्षमा असावी. . . . साहेब. . .

बाबुराव:–साहेब साहेब काय म्हणतेस !

पुष्पा:–दुसरं कोणतंहि संबोधन तुम्हाला शोभूच शकत नाही. साहेब नावाचा प्राणी काढून दाखवा असा परीक्षेत प्रश्न आला तर तुमचं चित्र काढावं आणि सेंटपरसेंट मार्क्स घ्यावेत.

बाबुराव:–एकूण वाईट आहे तर मी.

पुष्पा:–मी मेहुणी आहे. पाहुणी आहे. लहान आहे. आय शुड नॉट टेक लिबर्टीज. नाहीतर म्हणाले असते. होय.

बाबुराव:–ठीक आहे. समजलो.

पुष्पा:–हा नेकटाय कशाला बांधता हो तुम्ही ?

बाबुराव:–टाय कशाला बांधत असतात ?

पुष्पा:–मला प्रत्येक वेळेला वाटतं की तुम्ही आपली मान आवळता आहात असं नव्हे तर व्यक्तित्वच आवळता आहात.

बाबुराव:–शिस्तीचाच भाग आहे तो. पुष्पा, दोन प्रकारची माणसं असतात. बेशिस्त आणि अपेशी होणारी. आणि स्वतःला शिस्त लावून यशस्वी होणारी.

पुष्पा:–तुम्ही यशस्वी आहात, असंच सुचवायचं आहे नं तुम्हाला ?

बाबुराव:–त्याबद्दल तुम्हा लोकांना शंका आहे वाटतं ?

पुष्पा:–मोठ्या पदावर असलेली माणसं मोठीच असतात असं म्हणायचं आहे कां तुम्हाला ?

बाबुराव:–सवाल मोठा छान आहे. अच्छा, सवडीनं ह्या सवालाचं उत्तर देऊं.

पुष्पा:–साहेब—

बाबुराव:–परत साहेब म्हणालीस.

पुष्पा:–मी तुम्हाला साहेबच म्हणणार. दुसरं संबोधन तुम्हाला शोभणं शक्य नाही. साहेब, तुम्हाला बाहेर गेलंच पाहिजे ?

बाबुराव:–कां ?

पुष्पा:–मला जरा कार हवी होती.

बाबुराव:–कशाला ?

पुष्पा:–तुम्हाला काहीच सांगितलं नाही विमलनं ?

बाबुराव:–काहीच म्हणजे ?

पुष्पा:–मेलची वेळ होत आली नं.

बाबुराव:—कोण येणार आहे मेलनं ?

पुष्पा:—कमाल केली विमलनं. तिनं तुम्हाला सांगायलाच हवं होतं. हरीशना तिनं इथं बोलावलं. ते आज मेलनं येणार आहेत....आणि विमलनं तुम्हाला हे सांगू नये अं ? दॅटस नॉट फेअर.

बाबुराव:—हरीश ? आठवतो आहे मला. लग्नात होता तो, नाही का ?

पुष्पा:—तोच तो. मोठा देखणा आहे, नाही ? पण त्याचे डोळे जरा गंभीर. . . जरा उदासच दिसतात, नाही ?

बाबुराव:—मी इतकं निरीक्षण केललं नाही. तुझ्या ताईचे सहाध्यायी होय ना ?

पुष्पा:—सहाध्यायी ? अहो, बालमित्र म्हणा. चार वर्ष शाळेत आणि चार वर्ष कॉलेजात नोटस्ची देवाणघेवाण करून दोघांनी परीक्षा पास केल्या आहेत.

बाबुराव:—अस्सं !

पुष्पा:—कां हो ? अस्सं म्हणायला काय झालं ?

बाबुराव:—सहज विचार आला, तुझ्या वहिणीनं हरीशशीच का नाही लग्न केलं ?

पुष्पा:—सरळ आहे उत्तर. विमलनं केलं तेच मीहि केलं असतं. तुम्ही सरस आहात.

बाबुराव:—थँक यू.

पुष्पा:—मग कार देणार ?

बाबुराव:—सॉरी. मला कारची जरूर आहे. तुम्ही टॅक्सी बघा.

पुष्पा:—समजले. पण हा खेळाडूवृत्तीचा अभाव आहे. हरीशनं तुमचं काही देखील वाकडं केलेलं नाही.

बाबुराव:—मी कुठं म्हणालो तसं ? मी उत्तम प्रकारे स्वागत करीन हरीशचं. आमची जात एक आहे.

पुष्पा:—ती कोणची ?

बाबुराव:—लीलावात मांडलेल्या वस्तूंची.

पुष्पा:—थोडी चूक होते आहे तुमची.

बाबुराव:—ती कशी काय ?

पुष्पा:—हरीशांचा लिलाव व्हायचा आहे आणि तुमचा तो केव्हाच झाला आहे.

बाबुराव:—बरोबर आहे. चिंता माझी नाही, हरीशची आहे आणि तीच मी वाहणार आहे.

पुष्पा:—फार छान, मग हरीशना रिसीव्ह करायलाच जाना स्टेशनवर.

बाबुराव:—मला दुसऱ्या एंगेजमेंटस आहेत, अच्छा.

पुष्पा:–(गाते) (जा जा जा झणी–घेऊनी ये पंखा, वाळयाचा घेऊनि या पंखा.) आबा, पंखा घेऊन या. वाळयाचा पंखा घेऊन या. साहेबांनी कार द्यायला साफ नकार दिला हो. आता कुठलं स्टेशनवर रिसीव्ह करायला जाणं. आणलांत का वाळयाचा पंखा ? (आबा दाखल होतात.)

आबा:–(पंख्याच बटन फिरवीत) आता पंखे विजेचेच. ह्यानीच व्हा गार. पुष्पाबाई, तुमचं आणि साहेबांचं सगळं बोलणं ऐकलं आम्ही.

पुष्पा:–काय वय आहे तुमचं ?

आबा:–आहे साठीच्या आसपास.

पुष्पा:–तेव्हा ही खोड काही चांगली नाही. आज माझं आणि साहेबांचं बोलणं चोरून ऐकता आहात. उद्या साहेबसाहेबिणीचा एकान्त चोरून ऐकायला लागाल.

आबा:–पुष्पाताई, तुमचं आणि साहेबांचं बोलणं दुसऱ्यानं ऐकूं नये असं खाजगी असण्याचं कारण नाही.

पुष्पा:–छान टोला हाणलात ! आबा, तुमचा स्कोअर एकानं वाढला.

आबा:–आम्ही काही सांगितलं तर ऐकाल का पुष्पाताई ?

पुष्पा:–अटळ आहे ते. डोळे मिटून घेण्याची परमेश्वरानं सोय केली आहे तशी कान मिटून घेण्याची केलेली नाही.

आबा:–पुष्पाताई, साहेबांचं आणि बाईसाहेबांचं सतत बिनसतं आहे, पण ही बाब तुम्ही थट्टेचा विषय करावा हे योग्य नाही.

पुष्पा:–थट्टा ? मी केव्हा केली थट्टा ? मी रडले तरी तुम्हाला थट्टाच वाटते.

आबा:–तेहि खरंच आहे. दुसरी गोष्ट म्हणजे बाईसाहेब आणि हरीश सहाध्यायी होते आणि दोघांचं काही विशेष होतं असं सूचित करणं भयंकर आहे.

पुष्पा:–भयंकर गोष्टी करण्यासाठीच माझा जन्म आहे. अलेक्झांडर, सीझर, नेपोलियन, लेनिन, हिटलर, मुसोलिनी, स्टॅलिन यापैकी प्रत्येकाच्या कुंडलीतला एकेक ग्रह माझ्या कुंडलीत आहे. घरातल्या घरात मी दहापाच क्रान्त्या केल्या आहेत. एखादी क्रान्ति इथे ह्या घरात झाली तर काय बिघडलं ? उन्हाळयाची सुटी तेवढीच सत्कारणी लागली असं म्हणता येईल. आबा, भयंकर ह्या शब्दाला घाबरू नका. भयंकर म्हणजेच सत्यं–शिवं–सुंदरम् !

आबा:–हरीशनं पाहुणे म्हणून येणं वरं नव्हे येवढं मात्र खरं. अजूनहि काही निमित्त होऊन ते न आले तर बरं होईल.

पुष्पा:–भित्रे आहात झालं ! अहो, ह्या घरात जे मिळमिळीत युद्ध चाललं आहे त्याला चांगली धार चढावी असं वाटतंय. पण मेलं सगळं मवाळांचंच राजकारण!

आबा:—ताईसाहेब स्वभावाच्याच सालस, शांत व समंजस आहेत.

पुष्पा:—सालस ? शांत व समंजस ? आबा, कशाला तीन तीन विशेषणं खर्ची घातलीत ? ह्या तीन्ही विषेषणांचा अर्थ ज्यात येईल असा एक शब्द वापरता आला असता तुम्हाला.

आबा:—तो कोणता ?

पुष्पा:— मेषपात्र !

विमल:—(आतून हाका) पुष्पा——

आबा:—ताईसाहेब हाक मारताहेत.

पुष्पा:—आपण वडील वहिण आहोत हे क्षणभर विसरेल तर शपथ. आतून हाका मारण्यापेक्षा अशी इथे येऊन बोलली असती तर काही बिघडलं असतं ?

(विमल येते)

विमल:—स्टेशनवर जायचा विचार नाही की काय तुझा ?

पुष्पा:—नाही.

विमल:—का ?

पुष्पा:—साहेबांनी कार दिली नाही.

विमल:—पण टॅक्सी करून जा म्हणून म्हटलं होतं नं ?

पुष्पा:—पण ते मला मान्य नाही म्हणून मीहि म्हटलं होतं नं ?

विमल:—उगाच हेका करीत असतेस.

पुष्पा:—हे बघ विमल, इथे हक्काचा प्रश्न आहे. नवऱ्याच्या मोटारवर बायकोचा हक्क नाही का ?

विमल:—माझ्या हक्काचं मी बघून घेईन, तू सरळ टॅक्सी करूनच जायला हवं होतंस.

पुष्पा:—हरीशना तुझं वैभव दिसायला हवं; दारिद्रय नव्हे.

आबा:—हरीश ! हरीश ! हरीश ! ह्या माणसाचं नाव राम असतं तर जपच झाला असता. अन् पुण्य पदरी पडलं असतं.

विमल:—आबा, तुम्ही जा पुष्पाबरोबर.

पुष्पा:—हं चला आबा. हे बघा आमच्या ताईचं वैभव म्हणून तुमच्याकडे बोट दाखविते.

विमल:—पुष्पा, शोभत नाही असलं बोलणं.

आबा:—म्हणून देत हो ताईसाहेब, खटाऱ्याचीच उपमा शोभते आम्हाला. पेन्शन

पुरत नाही म्हणूनच वरवरचा कारभार बघायला तुम्ही ठेवून घेतलं आहे नं नोकरीवर ?

पुष्पा:– (सहानुभूतीनं) आबा, चुकले अं मी. माझ्या खाती एक काळी फुली मारा.

विमल:–आबा, फोन करून टॅक्सी बोलवा.

आबा:–ठीक आहे. (फोन करतात) टॅक्सी ? हां–देखो. सिव्हिल लाईन्स. वडा बंगला–हां कमिश्नरसाहबका. अच्छा; जलदी.

पुष्पा:–टॅक्सीनं जाणं तुला मान्य असेल तर तू खुशाल जा. आबांना घेऊन जा: मी साफ सांगते. मी काही टॅक्सीनं जाणार नाही.

आबा:–बालहट्ट अधिक स्त्रीहट्ट ! केवढी भयंकर बेरीज !

विमल:–तुला नसेल जायचं तर नको जावूस. मला काय करायचंय. तुझा हट्ट म्हणून हरीशला इथं येण्याचं आमंत्रण दिलं मी..

पुष्पा:– (दटावीत) पुन्हा म्हणू नकोस असं. हरीशना कळलं तर फजितीच होईल माझी.

(टॅक्सीचा हॉर्न)

पुष्पा:–तू चलतेस ? तू चलत असशील तरच जाईन मी टॅक्सीनं.

विमल:–हं चल. (जाता जाता) आबा. स्टेशनवर गेलो आहोत म्हणून सांगा. हं

(टॅक्सीचे दार लावल्याचा व टॅक्सी निघून गेल्याचा आवाज)

आबा:–(टेलीफोनवर) हां–रेल्वे एन्क्वायरी ? आज मेल कितनी लेट है ? लेट नही ? आज क्यूं नही लेट ? तुम रेल्वेवाले बडे अजब हो. रोज लेट लाते हो. आजहि क्यूं वख्तपर लाई ?. अहो आज मेल लेटच यायला हवी होती. हो मी आबाच. आमच्याकडे पाहुणे यायचे होते. त्यांना रिसीव्ह करायला आताच मंडळी निघाली आहे. काय म्हणता ? आज मेल अगदी वेळेवर आली ? तर मग घातच झाला ! नाही नाही, गाडी वेळेवर आली म्हणून कमिश्नरसाहेब गरम होणार नाहीत. त्यांचा ह्या पाहुण्याशी मुळीच संबंध नाही. . . ती फटाकडी पोरगी कोण आहे म्हणून विचारता ? ती साहेबांची मेहुणी आहे. हे बघा, एन्क्वायरी आम्ही करायची. एन्क्वायरी ऑफिसनं नव्हे. हो हो. दिसतील तुम्हाला पुष्पाताई. पाच मिनिटात दिसतील. मिस्टर, सुंदर तरुणीबद्दल इतका इंटरेस्ट घेणं चांगलं नाही. तुमचं वय टेलिफोनमधून दिसतं आहे आम्हाला. हें: हें: हे: हें: !

(टेलिफोन बंद. अभय प्रवेश करतो.)

आबा:–कोण ? अभय ? या.

अभय:–आहेत का साहेब ?

आबा:–तुम्हीहि साहेब म्हणता ? केवढे जुने दोस्त तुम्ही.

अभय:–म्हणून काय झालं ? आमचे बॉसच आहेत. आहेत की नाहीत घरी ?

आबा:–बाहेर गेले आहेत.

अभय:–आणि वहिनी ?

आबा:–का ? त्यांच्याशी बोलायचं होतं ?

अभय:–होय !

आबा:–असं काय बोलायचं होतं ?

अभय:–आबा, माझ्या ह्या मित्राबद्दल केवढा अभिमान होता मला, ह्याच्या बुद्धिमत्तेबद्दल, बाणेदारपणाबद्दल, भयंकर परिश्रमसामर्थ्याबद्दल मी बोलू लागलो म्हणजे मला भान रहात नसे. पण आबा, हा माणूस, माणूस ह्या कोटीतून निघून राक्षस ह्या कोटीत जात आहे. हा फरक बघून बेचैन झालो आहे मी.

आबा:– बाईसाहेबांशी काय बोलणार ?

अभय:–असं वाटतं की त्याच कदाचित् ह्या माणसांत परिवर्तन घडवून आणू शकतील.

(मोटर आल्याचा व थांबल्याचा आवाज. नंतर दार आपटल्याचा आवाज.)

आबा:–साहेब आलेत वाटतं.

अभय:–हं, साहेबच आले.

बाबुराव:–कोण ? अभय ? बस ! बस ! बॉस समजून वागू नकोस.

अभय:–बरं वाटतं, असं मित्रत्वानं वागलास म्हणजे !

बाबुराव:–तुम्ही लोक समजता तितका खरोखरच मी वाईट नाही.

अभय:–आम्ही समजतो ते चूक नाही.

बाबुराव:–तुला असं का वाटतं ते मी समजू शकतो. तुझ्या बडतर्फीच्या हुकुमावर माझी सही व्हावयाची आहे. ती होईल म्हणूनच नां असं तुला वाटतं ?

अभय:–माझ्या बडतर्फीच्या हुकुमावर सही होण्यापर्यंत प्रकरण आलं आहे ? मला कल्पना नव्हती.

बाबुराव:–मी तुझा मित्र आहे आणि, आय एम सॉरी फॉर यू.

आभय:–बडतर्फीच्या हुकुमावर सही करणार तू ?

बाबुराव:–होय अभय. आणि हे, तू मित्र असूनहि मी करतो म्हणून तू अधिक ॲप्रिशिएट केलं पाहिजे. अधिकाऱ्यानं आपलं कर्तव्य, हा माझा आहे आणि हा माझा शत्रू आहे, अशा भावनेचा थोडा देखील स्पर्श न होऊ देता केलं पाहिजे.

अभय:–बरोबर आहे.

बाबुराव:–बरोबर आहे असं उपरोधानं म्हणू नकोस.

अभय:–छे ! त्यात उपरोध कुठेच नाही.

बाबुराव:–मी खेद व्यक्त केला तो हार्दिक आहे अभय.

अभय:–कबुल आहे मला.

बाबुराव:–तुझा स्वर किती जड आहे ते कळतंय मला.

अभय:–माझ्या बडतर्फीच्या हुकुमावर तू, प्रत्यक्ष माझ्या मित्रानं सही केली म्हणून अंत:करण जड झालेलं नाही.

बाबुराव:–नोकरी गेली म्हणून ? होय ना ?

अभय:–तेहि नाही. मला दु:ख झालेलं नाही. देश स्वतंत्र करण्यासाठी देशभक्त हंसत हंसत फासावर चढले. देश स्वतंत्र व्हावा म्हणून माझ्या अल्प शक्तीप्रमाणे मीहि थोडंफार कार्य केलं. फासावर गेलो तरी गौरवच होईल माझा. मग इथे तर फक्त नोकरीच जाते आहे.

बाबुराव:–स्वत:चं समाधान करून घेतो आहेस. ठीक आहे !

अभय:–ते जाऊ दे. मी इथे आलो होतो ते खणखणीतपणे चार शब्द बोलायला. तुझ्या रूपानं एक राक्षस आकाराला येत असलेला मी बघत आलो आहे. आणि तुझ्यातला राक्षसीपणा वेगळा करून कर्तबगारी जोपासावी अशी आकांक्षा आहे माझी.

बाबुराव:–तुझ्या बडतर्फीच्या हुकुमावर सही करण्यानं मी राक्षस होत नाही अभय.

अभय:–तो विषयच राहू दे बाजूला.

बाबुराव:–मग माझ्या ठायी राक्षस प्रतीत होण्याचं कारण काय ?

अभय:–दहा वर्षं घेतली आहेस तू राक्षसाचं हे रूप धारण करायला.

बाबुराव:–अरे वा ! राक्षस कसा जन्माला येतो, कसा वाढतो ते कळू तरी दे.

अभय:–तुझं ज्ञान अफाट असे. आम्ही स्तिमित होत असूं. आठवतं आहे, शेक्सपीअरची प्रतिमा अष्टपैलू असून तो कालिदासापेक्षा शतपटीने श्रेष्ठ आहे असे लेख लिहून आणि भाषणं करून तू एकदा वादातीत सिद्ध करून दाखविलं होतंस ?

बाबुराव:–कालीदासापेक्षा शेक्स्पीयर शतपटीनं श्रेष्ठ आहेच आहे.

अभय:–आणि तूं तेव्हा प्रतिपादीत होतास, मोरोपंतापेक्षा मिल्टन श्रेष्ठ आहे.

बाबुराव:–होय. दोघांचीहि शैलि कृत्रिम, पण त्यातल्या त्यात मिल्टनच्या प्रतिमेची झेप अफाट आहे. मोरोपंत एकाच आवर्तात गिरक्या घेत राहिले.

अभय:–असे कित्येक पाश्चिमात्य लेखक, तत्वज्ञ, मुत्सद्दी, सेनानी भारतीयांपेक्षा श्रेष्ठ असल्याचे तू प्रतिपादित राहिलास.

बाबुराव:–न रुचणारं असलं तरी सत्य होतं ते सांगतलं.

अभय:–आणि तुझं असं ठाम मत आहे, की इंग्रज लोकांच्या ठायी चारित्र्य आहे, सचोटी आहे, गुणवत्ता आहे आणि राज्य करायला तेच लायक आहेत. आणि ह्याच्या उलट भारतीय—

बाबुराव:–इंग्रजांची निंदा करण्याने माणूस देशभक्त ठरतो हे मला माहित आहे. पण सत्य आहे तेच बोललो आहे मी.

(अभय हंसतो)

बाबुराव:–मी म्हणतो ते चूक असल्याचं सिद्ध करू शकशील का तू ?

अभय:–नाही. तुझ्या इतकं वुद्धिसामर्थ्य माझ्या ठायी नाही. पण एकच गोष्ट मला सांगायची आहे, तुझी मतं बरोबर होती किंवा नाही हा प्रश्न नाही. पण येवढं मात्र खरं की, आपल्या माणसांनी आपल्याला दुखावलं आहे, ह्या भावनेच्या पोटी ह्या साऱ्या मतांचा जन्म झाला. तू बोलतोस ही मतं नाहीत, तत्व नाहीत, सिद्धान्त नाहीत–सत्य तर नाहीच नाही. त्यांना नाव आहे पूर्वग्रह ! माणूस केवळ पूर्वग्रहांचं गाठोडं बनू लागला म्हणजे तो राक्षस बनतो. दुबळा असला तर मोठा केविलवाणा ठरतो.

बाबुराव:–माझी समस्या माझ्याजवळ असू दे. तुझ्या समस्या अधिक अवघड आहेत. तू त्यांचाच विचार कर आधी.

(मोटर येऊन थांबल्याचा आवाज. दारं वाजल्यांचा आवाज.)

विमल:–कोण अभय ? अहो, तुमचं पत्र मिळालं मला. ह्यांनाच दाखवणार आहे ते. आणि अभय, मग तुम्हालाच चर्चा करायला बोलावीन.

अभय:–आताच चर्चा केली आम्ही. वायफळच ठरली ती.

पुष्पा:–साहेब, तुमच्यासाठी आनंदाची बातमी ! जो पाहुणा तुम्हाला यायला नको होता नं, तो आलाच नाही अखेर !

बाबुराव:–मेहुणीबाई, चुकता आहांत आपण. हरीशबद्दल मलाच अधिक आत्मीयता आहे.

अभय:–बरं वहिनी, येईन केव्हातरी.

विमल:–नव्हे. आलंच पाहिजे. ह्यांच्याबद्दल जे तुम्ही म्हणता आहात ते खरं आहे आणि ह्यांचे पूर्वग्रह दूर झालेच पाहिजेत.

बाबुराव:–करा सगळ्या चळवळी ! सत्याग्रह ! दंडेली ! दंगेधोपे ! आणि वर मुलुखमैदानी भाषणं ! बघा येवढं करून सत्य दडपता येतं का ते ! मजजवळ एकच शास्त्र आहे. तें म्हणजे सत्याचं.

अभय:–आज तुला काहीच पटणार नाही. बरं असो, अच्छा—(जातो)

विमल:–काय चर्चा झाली तुमची ?

बाबुराव:–मला आता इतर कामं आहेत.

विमल:–ती नेहमीचीच आहेत.

बाबुराव:–चर्चाहि नेहमीचीच आहे.

विमल:–नाही. चर्चा नेहमीची नाही. तुम्ही माझं केव्हाहि ऐकून घेतलेलं नाही.

बाबुराव:–ज्या गोष्टी तू बोलतेस त्या तुझ्या तोंडात शोभतच नाहीत. गोष्टी चांगल्या असतात, पण त्या बोलायला बोलणाऱ्याला अधिकारहि असावा लागतो.

विमल:–माहित आहे मला. (कंपित स्वरात) सांगा, मी काय केलं म्हणजे हिला थोडी तरी किंमत द्यावी असं वाटेल तुम्हाला ?

बाबुराव:–विचार करीन आणि सांगेन. आबा. . . .

आबा:–जी साहेब—

बाबुराव:–करवून घेतलेत ना सर्व स्टेटमेंटस् तयार ?

आबा:–होय साहेब.

बाबुराव:–स्पेलिंगची चूक राहिलेली मला सहन होत नाही हे माहित आहे ना तुम्हाला ?

आबा:– होय साहेब ! फार दक्षतेनं करवून घेतलं आहे टाइपिंग.

(विमल आत जाते)

पुष्पा:–काय ह्या आमच्या ताईसाहेब ? एक फेर झडली नाही तर दिवाणखान्यातून स्वयंपाकघरात पळ काढतात. साहेब, आपण आम्हाला कचकड्याच्या बाहुल्या समजता, नाही ?

बाबुराव:–होय बरं मेहुणीबाई.

पुष्पा:–पण साहेब, कचकड्याची बाहुली, पेंढा भरलेल्या बुजगावण्यापेक्षा हिणकस समजण्याचं हो काय कारण ?

बाबुराव:–पेंढा भरलेल्या बुजगावण्याला विचारा.

पुष्पा:–युवर ऑनर, माझा सवाल आपल्यालाच आहे.

बाबुराव:–पुष्पा, आपण वयानं लहान आहोत ह्याची थोडी तरी जाणीव असू दे.

पुष्पा:–बरं बाई ! मीहि जाते आत. बुजगावणं भिवविण्यासाठीच असतं ना !

बाबुराव:–आबा, सरकारतर्फे तयार होत असलेल्या ह्या काटकसरीच्या योजनेत अनेकजण नोकरीवरून दूर केले जाणार आहेत ही वार्ता इतकी कशी काय पसरली ?

अनुक्रमणिका

आबा:–मला कल्पना नाही साहेब.

बाबुराव:–कागद तुम्ही पाहिले आहेत. आणि दोघा टायपिस्टनी बघितले आहेत.

आबा:–पण आमच्यामार्फत वाच्यता झालेली नाही साहेब.

(हरीश दरवाजात प्रगट होतो)

हरीश:–(उत्साहाच्या ऐन भरांत–ऐटींत) हॅलो गुड मॉर्निंग (बाबूराव थंडपणे हरीशचं निरीक्षण करतात. एक दोन क्षणांनी आवाज खाली आणून)आयसे, गुड मॉर्निंग. (परत एक दोन क्षणांनी, पडलेल्या आवाजात) गुड मॉर्निंग सर ! (क्षमा याचनेच्या स्वरात) क्षमा करा अं ! इतक्या मोठ्या स्वरात गुड मॉर्निंग म्हणायला नको होतं मी.

बाबुराव:–डोंट वरी. बसा ! सामान कुठे आहे तुमचं ?

हरीश:–स्टेशनवरच क्लोकरूममध्ये ठेवलं आहे.

बाबुराव:–का ?

हरीश:–म्हटलं, तुम्ही इथे आहात की दौऱ्यावर गेलात ?

बाबुराव:–दौऱ्यावर गेलो तरी बंगला घेऊन जात नाही मी.

हरीश.–खरं म्हणजे, पाहुणा म्हणून यायला जरा नर्व्हसच होतो मी.

बाबुराव:–मी मोठा भयंकर माणूस आहे अशी वार्ता तुम्हालाहि लागली की काय ?

हरीश:–खरं सांगायचं म्हणजे––

बाबुराव:–बोला–बोला ! बरं ! हरीश, लोक समजतात तसा मी असलो तरी खास तुमच्याबद्दल मला जरा वेगळ्याच प्रकारची सहानुभूति आहे. आत्मीयता आहे म्हणा ना.

हरीश:–मी समजलो नाही.

बाबुराव:–तुम्ही आणि विमल वर्षानुवर्ष एकत्र वाढलात. किती स्वाभाविक होतं तुमचं प्रेम वृद्धिंगत होणं ! पण एक दिवस आला आणि विमल एका बड्या अधिकाऱ्याची बायको होऊन निघून गेली.

हरीश:–बाबुराव, काय भलतंच बोलता आपण.

बाबुराव:–भलतंच काय आहे ह्यांत ?

हरीश:–विमल आणि मी एकाच वर्गात नेहमी होतो, पण विमल माझ्याहून दीड वर्षानं मोठी आहे.

बाबुराव:–त्यानं काय फरक पडतो ?

हरीश:–ती वयानं दीड वर्षानं मोठी असेल, पण जाणिवेनं दहा वर्षांनी तरी मोठी

वाटायची. माझ्या भावनेचं स्वरूप मला नीट माहित होतं. वडिलधाऱ्या स्त्रीच्या ममतेची माझ्या मनाला भूक लागली म्हणजे मी विमलकडे धाव घेई. माझ्या वेडचा कल्पनांचं तिनं निवारण केलं की आनंदून मी परत जाई.

बाबुराव:–हरीश, फार चांगले आहात तुम्ही. उदात्तीकरण चांगलं साधलं तुम्हाला.

(पुष्पा येते)

पुष्पा:–अय्या हरीश ? तुम्ही ? (हाका देत) ए विमल, अग हरीश आले.

(विमल येते)

विमल:–कमाल केलीस अं हरीश. स्टेशनवरच जरा वाट नाही का पहायची ?

पुष्पा:–अन् तुमचं सामान कुठे आहे ?

बाबुराव:–स्टेशनवर.

पुष्पा:–चला हरीश. स्टेशनवरून सामान आणू.

विमल:–आबा—

पुष्पा:–समजले अं ! चला आबा ! तुम्हीहि चला ! आणि लक्षात ठेवा, आम्हा दोघांवर सतत लक्ष ठेवायचं ! माझी जबाबदारी तुमच्या बाईसाहेबांवर आहे. समजलात ? तरुण तरुणी एकटी असलीत तर धोका असतो.

विमल:–पुष्पा, तुझ्या बोलण्याला थोडा देखील ताळतंत्र नाही.

पुष्पा:–साहेब, बाईसाहेबांच्या वतीने विचारते, गाडी नेऊ का ?

बाबुराव:–बाईसाहेबांच्या वतीने सांगतो, हक्कच आहे आपलाहि !

पुष्पा:–थँ . . क् यू . .

(हरीश, पुष्पा व आबा निघतात. मोटरची दारं वाजतात आणि मोटर निघून गेल्याचा आवाज होतो.)

विमल:–गेलींत तीघंहि !

बाबुराव:–हूं.

विमल:–पतिपत्नीचं नातं वर्ज्य केलंत ह्याला किती दिवस झाले ?

बाबुराव:–वर्ज्य मी केलं का तू ?

विमल:–तुम्ही याल आणि अनुनय कराल म्हणून वाट पहात होते.

बाबुराव:–अनुनय करण्याचा गुण माझ्यात नाही.

विमल:–पत्नीचाच अनुनय करायचा होता नं.

बाबुराव:–सपशेल झूट असलेल्या गोष्टी ऐकायला हव्या असतात तुला.

विमल:–तसं समजा.

अनुक्रमणिका

बाबुराव:—पण बोला आणि मला खुश करा ! असंच नं ? सफाईनं खोटं बोलणारी माणसं एकावर एक प्रेमप्रकरणं सफल करताना दिसतात. खोटं बोलण्यात पटाईत असलेले नवरे आपल्या बायकांना जास्त खुश राखतात. आणि ह्याच कलेच्या जोरावर अनेकजण मोठ्या मोठ्या पदावर चढतात. पण माझी जात वेगळी आहे.

विमल:—सत्यावर तुमचं प्रेम आहे नं ? मीहि होईन की त्या प्रेमात भागीदार.

बाबुराव:—कसं शक्य आहे ते ? एका पुरुषाला कर्तबगार बनवून महत्पदाला आपण पोहोचवलं अशी आकांक्षा असल्याचं दाखवतेस तू. पण सत्य सांगतं की रेडी मेड मोठेपण लाटण्यासाठी बापाकरवी मोल देवविलंस आणि फक्कड सौदा केलास.

विमल:—(कंपित स्वरात) मी सौदा केला, आणि आपण ?

बाबुराव:—मीहि सौदा केला. पण सौदा केल्याबद्दल मला खंत नाही. अठरा हजारांची कार विकत घेतली आहे मी. ह्या कारमधून जेव्हा मी उतरतो तेव्हा माझ्यामागून चार चौघांच्या नजरा एकदम ओढून घेणारी सुंदर स्त्री उतरते, हे एकास एक साजेसं असंच आहे. मला हवा होता तोच सौदा केला आहे मी.

विमल:—(कंपित स्वरात) कार आणि पत्नी दोघी सारख्याच ? तुमच्या वैभवाची साक्ष देणाऱ्या ? शोभेच्या ?

बाबुराव:—तुझ्या दृष्टीनंहि नवरा म्हणजे कारप्रमाणेच तुझ्या वैभवाची, मोठेपणाची समाजाला साक्ष देणारी चीज आहे. विकत घेतलेली चीज आहे. ह्यामुळे तुला देखील केलेल्या सौद्याबद्दल अभिमान बाळगायला हरकत नाही. असा अभिमान बाळगणाऱ्या बायका झाल्या आहेत आणि अतिशय अभिमानात जगल्या आहेत !

विमल:—(विद्ध स्वरात) माझ्याबद्दलची तुमची समजुतच मुळात चूक आहे.

बाबुराव:—अडीअडचणीतून मार्ग काढीत असलेल्या, उत्तेजनासाठी, आधारासाठी व्याकुळ असलेल्या, भागीदारीसाठी आर्त आवाहन करीत असलेल्या तरुणाला साथ करण्याची संधि होती तुला. अशा तरुणाचा आत्मविश्वास वाढवता आला असता तुला. तो महत्पदाला पोहोचल्यावर त्याचं श्रेय घेता आलं असतं तुला आणि ते त्यानं आनंदानं दिलं असतं. पण जाळीजळमट झटकावीत इतक्या सहजतेनं वर्षानुवर्षांचे भावबंध तू दूर केलेस.

विमल:—(विव्हलपणे) कुणाबद्दल म्हणता आहात हे सगळं ?

बाबुराव:—हरीशबद्दल.

विमल:—तुमची कल्पना साफ चूक आहे. कसले भावबंध म्हणता ? कधीच नव्हते ते.

बाबुराव:—नव्हते ? नाहीत ? माझ्या दृष्टीनं बरं आहे ते. पण ह्या साऱ्या गोष्टी एकच सत्य सांगतात. तू स्वत:ला समजतेस तशी तू नाहीस आणि तुझ्या संसाराच चित्र चकचकीत असलं तरी तू समजतेस त्यातलं भव्योदात्त नाही.

विमल:–ही तुच्छता कशी सोसू मी ? (कढ आवरीत) किती वेळा वाटलं की यावं. . . . तुमच्या कुशीत शिरावं. . मन शांत करावं. . . . पण सारंच चुकलं ! पतिपत्नीप्रेमाला मूळच नव्हतं ! कसली बैठकच नव्हती. सांगा—सांगा अजून तरी सांगा, मी काय केलं म्हणजे तुम्हाला हवी तशी वाटेन ? (हुंदके देते.)

बाबुराव:–(वैतागून) काय वाटेल ते कर ! वाद घाल ! वाभाडे काढ ! पण रडू नकोस !

विमल:–(हुंदके देत) नाही ! मला रडायचं नाही ! खरंच रडायचं नाही (हुंदके कष्टाने आवरते) तुमचंच म्हणणं बरोबर आहे. माझी योग्यताच असायला हवी होती तेवढी.

(काही क्षण तंतुवाद्याचे आर्त स्वर.)

(पडदा पडतो)

उ त्त रा र्ध

(पडदा वर जातो. दृश्य तेच)

(रंगभूमीवर पुष्पा, हरीश व आबा)

पुष्पा:–हरीश, मला असं वाटतं की तुम्ही बाबुरावांची मत्सरबुद्धि जागृत करावी. तुम्हाला सहज शक्य आहे ते. मत्सराबरोबर प्रेमहि जागृत होतं माहित आहे नं ?

हरीश:–बाबुरावांचा मत्सर जागृत करू ? उद्या म्हणशील, महाराजबागेतल्या पिंजऱ्यात जा आणि वाघाच्या गळयाला गुदगुल्या करा.

पुष्पा:–मी म्हटलं तर येवढा पराक्रम तुम्ही करायलाच हवा. पूर्वीच्या राजकन्या नव्हत्या का राजपुत्रांना सांगत, की सातासमुद्रापार जा, शंभर राक्षस मारा आणि दैदिप्यमान रत्नं आणा.

हरीश:–(हंसत) अग आजकालच्या सुंदर मुलीसाठी पराक्रम करावे लागत नाहीत. वशिला जुळवून, चांगल्या पगाराची नोकरी मिळविली की हुंड्याच्या थैल्या घेऊन सुंदर मुली दारी क्यू लावतात क्यू.

पुष्पा:–चेला झाला हं तयार ! काय घडघड बोलतो हो ! गंडा कुणी बाबुरावांनीच बांधला नं ?

हरीश:–(काही क्षण थांबून, विचारग्रस्त स्वरात) थट्टा सोड पुष्पा, वैवाहिक जीवनाची वाताहत होण्याचं संकट त्या दोघांपुढे वाढून ठेवलं आहे.

आबा:–साहेबांचा मूड काही ठीक दिसत नाही.

पुष्पा:–त्यात विमलचा काहीच दोष नाही.

अनुक्रमणिका

आबा:–मी वेगळंच म्हणत होतो. काटकसर बोर्डापुढे काटकसरीची योजना मांडण्याचं काम साहेबांकडे आहे. त्या योजनेत भल्या मोठ्या संख्येनं नोकर नोकरीवरून दूर करण्याची सूचना आहे. आणि साहेब म्हणतील तसंच होणार. असा आतापर्यंतचा परिपाठच तसा असल्यामुळे ही कुऱ्हाड कोसळल्यावाचून रहात नाही अशी साऱ्यांनी खात्री करून घेतली आहे. आणि विशेष हे की अडीच हजार सरकारी नोकरांचं नेतृत्व अभयनं पतकरलं असून साहेबांच्या निषेधाची नुसती धमाल उडवून दिली आहे.

पुष्पा:–मग अभय हा आमचा मित्रपक्ष होय.

(मोटर आल्याचा, थांबल्याचा आवाज, दार वाजते. बाबुराव येतात.)

आबा:–साहेब, स्टेटमेंटचे कागद मीटिंगला नेले नाहीत आपण. खरंच, त्यात स्पेलिंगची कुठेहि चूक नाही.

बाबुराव:–त्याहून मोठी चूक आहे. तुमची नव्हे आबा. माझी.

(अभय प्रगट होतो.)

अभय:–मे आय कम इन ?

बाबुराव:–अभय ? हं ! ये !

अभय:–बाबु, तुझी योजना तू मागे नाही का घेऊ शकणार ? अरे परक्या राज्यकर्त्यांना आपल्या लोकांच्या सुखदुःखाचं काय ? पण तू तरी अमानुष होऊ नयेस.

बाबुराव:–हे बघ अभय, कॉलेजमधे असताना आपण आग्र्याहून सुटका हे नाटक केलं होतं. त्यात औरंगजेबाची भूमिका माझ्या वाट्याला आली. ती मी वठवली. टाळ्या घेतल्या, पारितोषिकं जिंकली, ती औरंगजेबाची वाक्यं ठासून म्हणून ! शिवाजीची नव्हत !

अभय:–माहित आहे मला. गेल्या वर्षी गांधीजींच्या करा आणि मरा संदेशानुसार देशभर प्रचंड चळवळ झाली. पण ह्या विभागात तू आपल्या कणखर हातांनी ती सपशेल चिरडून टाकलीस. भूमिका छान वठवलीस ! मोठं पारितोषिक मिळवलंस ! आय. सी. एस. होऊन आठ वर्षं होण्याच्या आत येवढ्या मोठ्या पदावर पोहोचणारा पहिलाच भारतीय आहेस तू. पण हा औरंजेबाचा मेकअप उतर तरी उतर येवढच मागणं मागायला आलो आहे मी.

बाबुराव:–उगाच आलाच.

अभय:–ठीक आहे !

पुष्पा:–जहांपन्हा—शहेनशहा—खुदावंत . . .

बाबुराव:–(करड्या स्वरांत) पुष्पा, हे बघ, पुन्हा जर मर्यादा सोडून बोलू लागलीस तर कोणतीहि भीड न राखता मला ताकीद द्यावी लागेल.

हरीश:–(क्षमा याचनेच्या स्वरात) माझं काही चुकलं तर नाही ? बाबुराव, मी आज संध्याकाळच्या मेलनं नक्की जात आहे.

बाबुराव:–तुमच्यावर माझा राग नाही. हरीश, मला तुमच्याबद्दल सहानुभूति आहे. आत्मीयता आहे.

हरीश:–असं म्हणू नका. जगात जे काही पवित्र आहे, त्याची शपथ घेऊन सांगतो विमल माझी बहिण आहे. मोठी बहिण आहे. ताई आहे.

बाबुराव:–ठीक आहे. बरं, पुष्पावर तुमचं प्रेम आहे नं ?

हरीश:–कुणास माहित !

बाबुराव:–त्याचा स्पष्ट निर्णय करण्याची वेळ आली आहे. पुष्पाचं लग्न जुळविण्याचा विचार चालू आहे. तिचे वडिल स्थळं बघू लागले आहेत. आणखी सांगायचं म्हणजे आधुनिक तंत्राप्रमाणे ओळखदेख करून देण्याचं कार्यहि सुरू आहे. आणि खात्रीपूर्वक सांगतो, जो अधिक चांगला तो आपला असं पुष्पा ठरवणार आहे. भ्रमात राहू नका येवढंच माझं सांगणं आहे. आबा,

आबा:–जी साहेब.

बाबुराव:–मी सरळ ऑफिसला जात आहे. तुम्ही एक तासाने सगळे कागद घेऊन या. गाडी बोलावून घ्या आणि येताना बरोबरच लंच आणा.

आबा:–होय साहेब.

(जातात. मोटर स्टार्ट झाल्याचा आवाज. गेल्याचा आवाज)

हरीश:–(निर्वाणीच्या स्वरात) पुष्पा, तुझं माझ्यावर प्रेम आहे की नाही ?

पुष्पा:–आबा, धावा ! इथं धोका आहे. प्रेमाची बात बोलता बोलता नायक नायिकेला जवळ ओढतो. एखाद वेळेला जबरीनं चुंबन देखील घेतो. हं, हरीश, तुम्ही त्या टोकाला––मी ह्या टोकाला ! आता बोला.

आबा:–मला कशाला मधे उभा करता ? मधे अंतरपाटाची गरज आहे. माझी नव्हे

हरीश:–(गंभीर स्वरात) तुझ्या लग्नाच्या गोष्टी सुरू झाल्या आहेत हे खरं आहे ?

पुष्पा:–हो. पपांनी पाठवलेले सगळे फोटोच दाखवते तुम्हाला. कन्याकुमारीपासून पठाणकोटपर्यंतची नाजुक तशीच पठाणी नररत्नं आहेत त्यात. भिन्न जातीय, भिन्न प्रांतीय, भिन्न भाषीय–येवढंच नव्हे तर भिन्न धर्मीय सुद्धा ! तसे आमचे पपा फार ब्रॉड माइंडेड आहेत. वर संशोधन करताना एकच जात पपांनी वगळली आहे –ती म्हणजे अर्थात् स्त्रियांची.

हरीश:–त्यातला कुणी आवडला तुला ?

पुष्पा:–सांगितलं असतं मी. पण हरीश, तुमच्यात स्पोर्टस्‌मन स्पिरिट नाही.

अनुक्रमणिका

हरीश:–आणतो थोडं फार ! कोण आवडला ?

पुष्पा:– देसाई.

हरीश:–कोण देसाई ?

पुष्पा:–माहित नाही तुम्हाला ? मलवार हिलवर राहतात. रसिक देसाई.

हरीश:–गुजराती ?

पुष्पा:–हो. हरीश. माझी अन् त्यांची पहिली भेट झाली तेव्हा मी बर्नार्ड शॉ वाचीत बसले होते. किती कौतुक वाटलं त्यांना.

हरीश:–सट्टेदलालीपलीकडे काही समजत नसलेल्या ह्या रसीकलालला ?

पुष्पा:–प्लीज – लीप्ज हरीश ! हे खेळाडूवृत्तीला सोडून होतं आहे. देसायांचं बोलणं चालणं कसं इंप्रेसिव्ह वाटतं ! फेल्ट हॅट अशी अलगद हलवत ते म्हणतात, हॅलो मॅडम ! किती गोड वाटतं हरीश, त्यांचं ते हॅलो मॅडम म्हणणं.

हरीश:–हं, खूप धनवान असतील ?

पुष्पा:–तिथं स्वीमिंग पूल आहे. टेनिस कोर्ट आहे. बॅडमिंटन कोर्ट आहे. बिलीयर्ड आणि पिंगपाँगची टेबलं आहेत आणि—

हरीश:–पुरे आहे येवढी जंत्री. ह्या लक्ष्मीपुत्राचे पिता, पितामह सगळेच लक्ष्मीधर असतील.

पुष्पा:–हरीश, मत्सर झटकून टाका बघू. देसायांच्या घरची सगळी माणसं अतिशय कल्चर्ड आहेत. पप्पासाहेब, ममीसाहेब यांच्यापासून तर डॉली आणि जॉलीपर्यंत ! आणि मला त्यांच्या घरचं सर्वात जास्त काय आवडतं सांगू ?

हरीश:–काय ?

पुष्पा:–एकमेकांचा निरोप घेताना ती माणसं परस्परांचं चुंबन घेतात.

हरीश:–पुष्पा मी संध्याकाळी मेलनी जाण्याऐवजी दुपारी एक्स्प्रसनंच जातो.

पुष्पा:–आय एम सॉरी हरीश. तुम्ही म्हणालात म्हणून बोलून गेले. तुमच्या भावना माहित आहेत मला.

हरीश:–पुष्पा, वर्षानुवर्ष हळुवारपणे तुझ्याबद्दलचं प्रेम मनात जोपासलं आहे मी.

पुष्पा:–मग आता ?

हरीश:–मी रागावलो नाही. चिडलोहि नाही. आकाशातली चांदणी, तशी तू ! माझ्या आवाक्यातली नव्हेस. प्रेम तसंच, हळुवारपणे अजूनहि जोपासेन.

आबा:–एक्स्प्रेसनं जाणार असाल तर झालीच गाडीची वेळ.

पुष्पा:–थांबा ना हरीश, दुपारच्या प्लेननी देसाई यायचे आहेत. बघा तरी एकदा.

हरीश:–आबा, स्टेशनपर्यंत कारमधे लिफ्ट देता का ?

अनुक्रमणिका

आबा:–हो. चला.

पुष्पा:–सामान बांधण्यापुरते तर थांबा.

हरीश:–कारमधे बांधीन–(सामान सुटचा स्थितीत उचलीत) चला आबा.

आबा:–थांबा हं, साहेबांचा डबाहि घेतो बरोबर. (आत जातात)

पुष्पा:–विमल – ए विमल—

हरीश:–(विद्ध स्वरात) नको पुष्पा. निरोपाचे शब्द मला नीट बोलता येणार नाहीत. तसाच जातो मी.

(आबा डबा घेऊन परततात)

आबा:–चला –

पुष्पा:–आय एम सॉरी हरीश. (आबा व हरीश बाहेर पडतात)

(कारचे दार वाजते. गाडी सुरू होते. जाते)

विमल:–पुष्पा, हे काय ? हरीश सामान घेऊन गेला ?

पुष्पा:–होय ग ! पण काळजी करू नकोस. त्यांची गाडी चुकणार आहे. मग मीच स्टेशनवर जाऊन घेऊन येईन त्यांना.

विमल:–आहे तरी काय प्रकार ?

पुष्पा:–जरा थांब (टेलिफोनवर) टॅक्सी ? हां–देखो सिव्हिल लाईनमे–बडा बंगला–हां हां, कमिश्नर साहाबका. जल्दी लाव टॅक्सी.

(गाडी आल्याचा, थांबल्यांचा, दार उघडून बंद केल्याचा आवाज)

पुष्पा:–ही काय जादु आहे ? फोन केल्यावरोबर दुसऱ्या क्षणी दाराशी टॅक्सी ? अच्छा ? साहेब टॅक्सी करून घरी आले. बरं झालं ! (ओरडून) ए टॅक्सी, तुम ठहरो. (फोनवर) टॅक्सी स्टँडवाले–ये कमिश्नर साहाबका बंगला है. निकल गयी क्या टॅक्सी ? नही. अच्छा मत भेजो. हमको यंही मिल गयी टॅक्सी. (रिसिव्हर ठेवते) (गात गात जाते) हम जिनको ढूंडते थे ! वे खुद बुला रहे है !

(टॅक्सी सुरू झाल्याचा, निघून गेल्याचा आवाज)

विमल:–टॅक्सी करून आलात ?

बाबुराव:–तिथे थांबण्यात अर्थ नव्हता.

विमल:–फोन केला असतात तर चटकन पाठवली असती गाडी.

बाबुराव:–तेवढा वेळहि मी थांबू शकलो नसतो.

विमल:–एक गोष्ट बोलू ?

बाबुराव:–हं !

विमल:–शांतपणे विचार केला मी. मला वाटतं, कितीहि लाचार अवस्थेत का असेना, पत्नीनं पतीजवळ नांदलंच पाहिजे हा आदर्श, जोपर्यंत स्त्रिया पूर्णपणे परावलंबी होत्या, अंगतिक होत्या तोपर्यंत ठीक होता.

बाबुराव:–बरं––

विमल:–आजची स्त्री गांधीजींच्या हाकेसरशी स्वातंत्र्यसंग्रामात विनदिक्कतपणे आघाडीवर जाते. तेव्हा समानतेच्या भूमिकेवर, स्वाभिमानानं राहता येत असेल तरच पतीजवळ राहायचं हेंच आजच्या स्त्रीला शोभण्यालायक आहे. नाही का ?

बाबुराव:–पुष्कळ विचार फार आकर्षक असतात. पण ते मोल मात्र फार मोठं मागतात.

विमल:–तेच देईन म्हणते. पुष्कळ विचार करून पाहिला. पण शोभेची वस्तु म्हणून तुम्ही जे स्थान मला दिलं त्यापेक्षा वेगळं मला मागताच येत नाही.

बाबुराव:–मला ह्या वागण्याचा अर्थच कळत नाही. जे हवं होतं तेच तू मिळवलंस. मग येवढी तक्रार कशाबद्दल ? वरवर गोड मुलायम गोष्टी बोलण्यानं भागण्यालायक असेल तर करतो उद्यापासून सुरवात.

विमल:–नको. मी इथून जाऊ इच्छिते.

बाबुराव:–इब्सेनच्या नोराप्रमाणे ? दाणकन दार आदळून ? समाजांत काहीतरी भयंकर खळबळ उडावी म्हणून ?

विमल:–नाही. अगदी शांतपणे जाईन मी. इकडच्या कानाची वार्ता तिकडच्या कानाला लागणार नाही इतकी गुपचुप.

बाबुराव:–ठीक आहे. जा. कुठे ते विचारू का ?

विमल:–नका.

बाबुराव:–परत केव्हा येणार ?

विमल:–ते कसं सांगू ? ज्या गोष्टीचा आज कुठे प्रारंभच दिसत नाही त्याबद्दल कसं सांगू ?

बाबुराव:–विलक्षण समयी जाते आहेस तू. ठीक आहे. किती पैसे देऊ मी ?

विमल:–पैसे नको आहेत मला.

बाबुराव:–हुंडा दिला होता तुझ्या वडिलांनी.

विमल:–वाटला तर तो त्यांचा त्यांना परत द्या.

बाबुराव:–चालेल ! अवश्य देईन. अधिक काही देऊ ?

विमलः–काही नको.

(अभय प्रगट होतो)

अभयः–(गर्जना करीत) माझ्या परम मित्राचा जयजयकार असो ! ब्रेव्हो ! काँग्रॅच्युलेशन्स !

विमलः–काय झालं ?

बाबुरावः–आणखी काही बोलायचं आहे तुला ?

विमलः–नाही.

बाबुरावः–तुला हवंय ते स्वातंत्र्य तुला आहे.

विमलः–ठीक आहे. लागते मी तयारीला.

अभयः–योजना मागे घेतलीस ना तूं ?

बाबुरावः–नाही.

अभयः–म्हणजे ? बोर्ड बरखास्तहि झालं ! आणि तू म्हणतोस की योजना मागे घेतली नाही ?

बाबुरावः–बोर्ड बरखास्त झालं. काटकसरीची योजना बारगळली. मी मागे घेतली असं मात्र नाही.

अभयः–जे काही झालं असेल ते असो. आज हजारो कुटुंबं तुला धन्यवाद देतील. तुझ्या काटकसर योजनेतल्या रिट्रेंचमेंटनुसार उद्या सातशे कुटुंबं उघड्यावर पडणार होती. दहा हजार नोकरांच्या तोंडचा एकेक घास छिनला जाणार होता.

बाबुरावः–त्यांना आनंद होऊ दे, पण त्यांनी मला धन्यवाद देण्याचं कारण नाही.

अभयः–त्यांची हाक तू ऐकलीस असच म्हणतील ते.

बाबुरावः–त्यांच्या निषेधानं, मिरवणुकांनी, चळवळींनी माझ्यावर थोडा देखील परिणाम झाला नाही. तेवढी गरजच पडली असती तर ही चळवळ तेव्हाच चिरडून टाकली असती मी.

अभयः–हे आगळं अगम्य आहे.

बाबुरावः–ऐक तर. सरकारच्या ६० लाखांच्या पे बिलात सात लाखांची बचत रिट्रेंचमेंट व पगार कपात यांच्या द्वारे मी सुचवली होती. बचतीची ही कमाल मर्यादा होती. दहा लाखांची बचत नाही का होऊ शकणार असं मला विचारण्यात आलं. मी होय म्हणालो. पंधरा लाखांची बचत होईल अशी योजना मी त्यांना, क्षणाचाहि विलंब न करता दाखविली. बोर्डावर मीच एकटा भारतीय होतो. माझी सूचना होती, जो न्याय एतद्देशीय नोकरांना लागू तोच इंग्रज अधिकाऱ्यांना.

येवढंच तत्व मला लाऊ द्या. पंधरा लाखांची बचत देतो. ही दोन दिवसांपूर्वीची गोष्ट आहे अभय.

अभयः—शाबास ! पुढे काय झालं ?

बाबुरावः—काटकसर बोर्डानं निर्णय घेतला की असल्या योजना म्या भारतीयानं हाताळणं इष्ट होणार नाही, मी आव्हान दिलं, माझ्या हातून हे काम कसं काढून घेता ते बघतो.

अभयः—पुढे ?

बाबुरावः—चोवीस तासात हे प्रकरण लंडनला सेक्रेटरी ऑफ स्टेटपर्यंत पोहोचलं. सारेजण एकदम दचकले. आणि अभय, आज एकदम भलतच मोठं मोठेपण त्यांनी माझ्यावर लादलं आहे आणि ते मी स्वीकारलं आहे.

अभयः—म्हणजे ?

बाबुरावः—म्हणजे असं की तडकाफडकी माझ्या कॅरेक्टरची एन्क्वायरी रीतसर सुरू करण्यात आली आहे. त्यांचा आरोप आहे की मी नॅशनॅलिस्ट आहे. गेल्या वर्षी ऑगस्टची चळवळ झाली. मला विचारण्यात आलं, तुमचा आणि गांधींचा संबंध होता की नाही ? मी उत्तर दिलं— आमचं स्फूर्तिस्थान आहे तो महात्मा. दोन वर्षापूर्वी सुभाषबाबू परागंदा झाले. मला विचारण्यात आलं, त्यांना परागंदा होण्याच्या कामी मी मदत केली की नाही ? मी उत्तर दिलं, त्या थोर देशभक्ताला मदत करण्याचं थोडं देखील पुण्य जोडता आलं असतं तर धन्यच झालो असतो. मी ही उत्तरं दिली ती त्या उलट उत्तर देणं म्याडपणाचं दिसलं असतं म्हणून आणि अभय, चालू असलेल्या ह्या चळवळीचा पुढारी, अभय तुमचा मित्र आहे की नाही ? असा त्यांनी प्रश्न टाकला तेव्हा तुझ्या बडतर्फीच्या हुकुमावर सही करणारा मी उत्तरलो, होय ! मला स्थानभ्रष्ट करायला येवढं साहित्य पुरे आहे येवढी जाणीव करून दिल्यावर मला चुचकारण्यात आलं. मला सांगण्यात आलं, की आता कॅरेक्टरची एन्क्वायरी करणाऱ्या ह्याच थोर मंडळींनी मला मोठ्या पदावर चढवलेलं आहे. मी ‘समंजसपणानं’ वागणार असेन तर ही थोर मंडळी माझ्यावर पुढेहि कृपालोभ ठेवायला तयार आहेत !

अभयः—येवढाल्या घटना घडल्या असतील ह्याची कल्पनाच नव्हती मला.

बाबुरावः—अभय, ह्या लोकांनी मला मोठं केलं हा दावा मी एक क्षणभर देखील सहन करू शकत नाही. मी ह्या पदावर आहे म्हणून मी मोठा नाही. माझं मोठेपण मी जाईन तिथे माझ्याबरोबर येईल. आणि अभय, राजीनामा देऊन मी घरी आलो आहे. मी अतिशय अहंकारी आहे म्हणून हे करून आलो आहे.

विमलः—काय म्हणता ?

बाबुराव:–होय. अठरा हजारांचं सरकारी लोन घेऊन ही गाडी घेतली होती. गाडी विकून आणि बँकेतली शिल्लक देऊन हे कर्ज चुकवलं आहे मी. हा सरकारी बंगला, रात्री बाराच्या आत रिकामा करून देईन आणि, दहा वर्षांपूर्वी ज्या अवस्थेत होतो त्याच अवस्थेत––एकाकी, एकटा रस्त्यावर उभा राहीन.

विमल:–एकटे नाही. तुमच्या शेजारी तुमची पत्नी असेल.

बाबुराव–तू तर सोडून निघाली आहेस नं ?

विमल:–होते. आता नाही. (कंठ दाटून) दहा वर्षांपूर्वी ज्या अवस्थेत तुम्ही होतात त्याच अवस्थेत मला पुन्हा मिळणार ह्याच कल्पनेनं अनावर आनंद झाला आहे मला.

अभय:–माझ्या घरी आल्यावाचून कुठे जाऊ नका हं. मी जातो.

बाबुराव:–दहा वर्षांपूर्वीच्या अवस्थेत मी पोहचतो आहे हे बघून तुला आनंद होण्याचं काय कारण ?

विलल:–कारण तेव्हा माझ्या मनात तुमच्याबद्दल प्रेमांकुर उत्पन्न झाला होता.

बाबुराव:–माझ्यावर फार पूर्वीपासून तुझं प्रेम होतं असा का दावा करायचा आहे तुला ?

विमल:–वाटलं तर खरं माना. तुम्ही एम. ए. च्या वर्गात होता. मी फर्स्ट इयरला होते. तुमच्या ठायी सामर्थ्य आहे येवढ्याच एका गोष्टीनं मी लुब्ध होते. पण तुम्ही सतत वर जात होतात मी व्याकुळ होत होते. मी बी. ए. झाल्यावर दोन वर्षं पपांनी माझ्याकरता स्थळं पाहिली. पण मीच लग्न होऊ दिलं नाही. येवढं तर तुम्हाला मान्य आहे ना की मी सहज पसंतीला उतरण्यालायक होते ? अखेर पपांनीच हिय्या केला आणि तुमच्याशी माझा विवाह जुळवून आणला. तुम्ही मला मिळालात खरे. पण मिळूनहि पारखेंच राहिलात. आता मात्र सडकेवर का होईनात, तुम्ही मला मिळणार आहात. आधार द्यायला आणि घ्यायला.

बाबुराव–(आनंदून) हे तर काव्य वाटतं आहे. इतका आनंद झाला आहे की काय सांगू (हसत) आणि विशेष हे की ह्या क्षणी एकान्ताचा भंग करायला दुसर कोणीहि इथे नाही.

विमल:–हा स्पर्श प्रथमच जाणवतो आहे मला.

बाबुराव:–आणि मलाहि. मीच बदललो की काय ?

विमल:–आता बदलायलाच लावीन मी. वडिल वारल्यामुळे लहाणपणी तुम्हाला अवहेलना सोसावी लागली. तरुणपणी तुम्ही एका मुलीवर प्रेम केलंत आणि तिनं व्यवहारी विचार करून तुम्हाला तोडलं. तुमचं मानी मन फार दुखावलं आणि

म्हणूनच ते सतत हिंस्त्र होत गेलं. आता जीवनाची सोज्वळ बाजू मी दाखवीन. माझ्यावरच नव्हे तर नव्यानं, सगळ्यांवर प्रेम करायला लावीन मी.

बाबुराव:—सिंहाला शेळी मात्र करू नकोस.

विमल:—ते माझं मी बघेन. आता एकच मागणं आहे. तेवढं मात्र द्या.

बाबुराव:—कोणतं ?

विमल:—तुमच्या जवळचं पूर्वग्रहाचं बंडल तेवढं माझ्या हवाली करा. ते मी सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधे ठेऊन देईन.

(दोघेहि हंसतात. गाडी आल्याचा व थांबल्याचा आवाज)

विमल:—दूर व्हा बघू. पुष्पा अन् हरीश आली.

बाबुराव:—मला वाटतं, त्या दोघांनी आपल्याला ह्या अवस्थेत बघणं जरूर आहे. नाहीतर त्या मूर्खांना झाल्या क्रांतीची गंधवार्ताच लागायची नाही.

(पुष्पा हरीश व आवासह परत येते)

पुष्पा:—अय्या ? काय हे ? फुकटात सिनेमा ? ब्रेव्हो ! हीच का ती कुत्र्यामांजराप्रमाणे एकमेकांवर फुसफुस करणारी नवरा बायको ? आता दूर का झालात ? फोटो घ्यायचा होता नं.

विमल:—आणलंस हरीशला परत ?

पुष्पा:—घरके बुद्दु घर को आये !

विमल:—हरीश, मी तुला कां बोलावलं होतं, माहित आहे ? पुष्पानं तुझ्याशी लग्न करावं ह्या विचाराला पपांनी आनंदानं संमति दिली आहे. पुढच्या गोष्टी बोलायला बोलाविलं होतं मी.

पुष्पा:—ताईसाहेब, कृपया ह्या महाशयांना सांगा, की मलबार हिलवर कुणी देसाई रहात नाहीत. देसाई रहातच असतील तर त्यांना रसिक नावाचा मुलगा नाही. रसिक नावाचा मुलगा असला तरी त्याची माझी ओळख नाही. आणि ओळख असली तरी प्रेम नाही. आणि प्रेमहि असलं तरी मी ह्या रसिकराजशी लग्न करणार नसून हरीशशीच. . . इश्य गडे, मला बाई भारीच लाज वाटते !

(सर्वजण हसतात)

★ ★ ★

अनुक्रमणिका

एका दगडाची कथा
(पान २२० वरून)

(पान २२० वरून)

चुकल्याचुकल्यासारखं वाटू लागलं. माझी ही आंतरिक चलबिचल लोकांना, त्यांच्या नकळत, जाणवू लागली. 'हा दगड जरा निराळा आहे,' असं त्याना वाटू लागलं. म्हणून त्यांनी मला चबुतऱ्यावर 'देव' म्हणून बसविलं. काही लोकांनी मला भाब्या-भोळ्या भक्तिभावानं नवस केले. त्यांच्या भक्तिभावाच्या प्रभावामुळेच ते त्यांना फलद्रूप झाले. पण त्यांना वाटलं, हा देवच पावला. आणि मग इथं देऊळ बांधलं गेलं. मी दगडाचा देव बनलो, तो हा असा.– ही सारी तुझी करणी आहे. तुझे उपकार कसे फेडावे, हे मला कळेना. अखेरीस तुलाच, तुझ्या अंःतकरणातील देवानं, आज इथं येण्याची बुद्धि दिली. आणि यामुळंच माझी कृतज्ञता व्यक्त करण्याची संधि मला मिळाली. देव किती दयाळु आहे !"

पुन्हा सारे शांत, शांत झाले. क़िती अर्थगर्भ होती ती शांति ! जणु सर्व चलाचल सृष्टीची मोठी माय ! त्या मोठ्या मायबाईचे वायुरूप, अति तरल, कोमल व सूक्ष्म हात मला मोठ्या मायेने कुरवाळीत होते. माझे सारे अंगांग रोमांचित झाले. एका अननुभूत शांत– आनंदात मी न्हावून निघालो.–

हा भाव ओसरू लागताच मी म्हणालो–

"माझ्या मित्रा, माझ्या सख्या, तू मला आज जो अनुभव दिलास त्याबद्दल तुझं कसं उतराई व्हावं, मला कळत नाही. आणि आता तो दिव्य भाव ओसरू लागताच मला जरा भीति वाटू लागली आहे. वाटतं, डोळे उघडले, इथून घरी परत गेलो की, संपलं सारं. हे सारं मग स्वप्नवत् होणार. त्यावरचा विश्वासदेखील उडून जाणार. माझ्या मित्रा, माझ्या सख्या, आता मी काय करूं ?"

"तुझी भीति खरी आहे. डोळे उघडताच हे जे तू आता अनुभवीत आहेस ते सारं तुला स्वप्नवत् वाटू लागणं अगदी साहजिक आहे. कारण तुझे उघडे डोळे, तुझी दृष्टि ही भेदात्मक सृष्टीशी जखडली गेली आहे, देहात्मभावाशी पक्केपणी तादात्म्य पावली आहे. म्हणून डोळे उघडताच, हे सारं सारं तुला स्वप्नासारखंच वाटू लागणार."

"पण तसं वाटायला नको आहे." मी तळमळून म्हणालो. "मित्रा, ही सारी जडाजड सृष्टि एकाच अनवच्छिन्न चैतन्यानं रसरसलेली आहे, असा अनुभव मला हवा आहे. हा अनुभव मिळावा यासाठी मी आपल्या डोळ्यांचं देखील मोल द्यावयास तयार आहे. माझ्या जिवलग सख्या, घेऊन जा माझे हे डोळे.– नाही तर तुझ्या दगडी आंगावर आदळून मी ते फोडून टाकू का ?–"

" असं वेडयासारखं नको बोलू. अशा आक्रस्ताळी, अघोरी वृत्तीनं चैतन्याचं दर्शन होत नसतं. आणि झालं, तरी ते तसंच अघोरी रूप धारण करतं. हा कल्याणाचा मार्ग नव्हे. ज्या सहजतेनं तू मला मित्र मानलंस, आणि विशेषतः ज्या सहजतेनं, मला एक समाधिस्त योगी मानून तू मोठया सहजसुंदर आदरानं मला नमस्कार करू लागलास, तोच सहजपणा, सृष्टीतील समग्र वस्तुजाताबाबत, तितक्याच सहजसुंदरतेनं तुला जेव्हा वाटू लागेल, तेव्हा आपोआप तुला विश्वात्मक चैतन्याचं दर्शन होईल. तेच खरं दर्शन. बाकी सारं खोटं. जबरीनं, अहंकारी प्रयत्नानं, कोणत्याहि कृत्रिम शारीरिक वा मानसिक उपायानं हे प्राप्त होत नसतं. जितका कृत्रिम प्रयत्न तितकी अधिकाधिक फसवणूक– अशी ही भानगड आहे. देवदर्शनासाठी, आत्मदर्शनासाठी, केले जाणारे सारे कृत्रिम प्रयत्न जबरी–संभोगाच्या स्वरूपाचे असतात. त्यात कसलं प्रेम नि कसला सहजसुंदर उमाळा वा जिव्हाळा ! ते सारे लहान– मोठया अहंकाराचे प्रकार आहेत. सहज– सुंदर चैतन्यापासून अधिकाधिक दूर दूर नेणारे ते प्रकार आहेत. तू मला खराखुरा, जिव्हाळयाचा मित्र मानलं आहेस. त्याच खऱ्या जिव्हाळयानं मी तुला सांगतो की, माझं मित्रत्व जसं तुला प्राप्त झालं, त्यातच चैतन्यदर्शनाचं खरं सार साठलं आहे. प्रयत्नशून्य **सहजभाव** आणि अशा सहजभावातून तितक्याच सहजपणे प्रस्फूर्त होणारा **नमनभाव**. असं जिथं जिथं, ज्या ज्या वेळी घडून येतं तिथं– त्यावेळीं चैतन्याचं खरंखरं दर्शन घडतं. अहंकाराचा, मतलबाचा यत्किंचित्हि वारा लागला की, चैतन्य निश्चितपणे दुरावलं जातं."

" मग मी आता काय करू ? मला आता काही सुचेनासं झालं आहे. वाटतं, इथं तुझ्या पायापाशी माझा प्राण जाईल तर बरं होईल. काय करायचं आहे मला, डोळे उघडल्याबरोबर दिसणाऱ्या भेदात्मक, संघर्षात्मक, क्रूर, दुष्ट अशा त्या सृष्टीशी ? दगडापेक्षाहि कितीतरी पटीनं अधिक हृदयशून्य व निर्घृण अशी ती सृष्टि आहे.– माझ्या जिवलग सख्या, नको मला परत पाठवू, त्या भयाण सृष्टीच्या वणव्यात. सारे सारे कोमल भाव तिथं जळून खाक होतील, काळे ठिक्कर पडतील.– मला आता डोळे उघडण्याची देखील भीति वाटू लागली आहे."

" मित्रा, असा अट्टाहास करू नकोस. माझं ऐक. भीति, अट्टाहास, आक्रस्ताळीपणा, जबरीचा आसक्तपणा आणि हावरा अधीरेपणा– हे सारे चैतन्याचे घोर शत्रु आहेत. तुला डोळे उघडलेच पाहिजेत आणि परत आपल्या घरी गेलंच पाहिजे, आणि–"

" आणि काय ?"

" आणि हे जे आता तू अनुभविलं आहेस, ते सारं तुला विसरलं पाहिजे."

" विसरलं पाहिजे ?" मी किंचाळूनच विचारलं. " ते शक्य नाही."

" हो, विसरलं पाहिजे. आणि ते शक्यहि आहे. जे झालं, गेलं, पार पडलं, त्याच्याशी मन गुंतवून ठेवणं म्हणजे प्रेताशीच मन गुंतवून ठेवण्यासारखं आहे. प्रेतात कधीहि चैतन्यदर्शन होत नसतं. देवाच्या नावाने जगात जे जे केलं जातं, त्यांपैकी बहुतांश सारं प्रेतपूजात्मकच असतं. या अशा प्रेतपूजेच्या आहारी तू जाऊ नकोस. माझ्याविषयी यत्किंचित्हि सखाभाव तुझ्या अंतःकरणात उरला असेल, तर त्यातील चैतन्यच हे बोलत आहे असं समज. तू माझा उद्धार केलास म्हणून मलाहि तुझ्या उद्धाराला हातभार लावलाच पाहिजे. त्यासाठीच मी हे सांगत आहे. डोळे उघड. हे सारं सारं पार विसरून जा. आणि अंतःकरणात उमलणारा सहजभाव व नमनभाव प्रयत्नशून्यपणे कसा उत्स्फूर्त होत असतो, हे अगदी निर्मळ, शांत, निरपेक्ष, केवळ साक्षी वृत्तीनं शोधून पहा. आज ना उद्या, तुला यातलं रहस्य सहजपणे ध्यानांत येईल. पण एक लक्षात ठेव. काल– आज– उद्या, अशा रीतीनं भासणाऱ्या कालाच्या चक्रात अडकून पडू नकोस. त्यात अडकलास की चैतन्यदर्शनाला मुकलास म्हणून समज. अधीरेपणा, घाई, अपेक्षा, हपाप, उतावीळपणा, हे सारे कालचक्रात अडकविणारे व माणसाला भ्रमातच बांधून ठेवणारे गुणधर्म आहेत. त्यांच्यापासून सावध रहा.– चैतन्य ही **घडणारी, घडविली जाणारी** गोष्ट नसून, ती केवळ **असणारी** वस्तु आहे. एवढंच ध्यानात ठेव. मनाला आवर घाल.– त्याच्या आहारी जाऊ नको. शांत हो.– जा आता रामराम.–"

● ● ●

त्यानंतर त्या दगडाच्या वाटेला मी कधीहि गेलो नाही.–

केवळ एका दगडाची कथा ही अशी आहे.

* * *

माझे संशोधन कार्य

१) इतिहास आणि वाङ्मय यांच्या संशोधनास मी सन १९०५ सालापासून सुरवात केली आणि संधि मिळेल त्याप्रमाणे अजूनही संशोधन क्षेत्रात कार्य करीत आहे.

२) इ. स. १९०२ ते इ. स. १९०५ या काळातमी मुंबई येथे विल्सन कॉलेजात शिकत होतो. त्यावेळेस डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर आणि इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांची संशोधनावर व्याख्याने ऐकावयास मिळाली. त्याचप्रमाणे त्यांचे संशोधनात्मक लेख आणि ग्रंथहि वाचावयास मिळाले. त्यांचा परिणाम म्हणून माझे लक्ष संशोधन कार्याकडे वळले.

३) माझे संशोधनाचे कार्यक्षेत्र विशेषतः प्राचीन विदर्भ म्हणजे नागपूर विभाग, वऱ्हाड, पूर्व खानदेश आणि मराठवाडा हा भाग. मी वैदर्भीय असल्यामुळे आणि तेथील ऐतिहासिक आणि वाङ्मयीन साधने विपुल आणि असंशोधित असल्यामुळे स्वाभाविकपणेच माझे लक्ष तिकडे वेधले. प्रसंग विशेषी मी विदर्भा-बाहेरहि संशोधन कार्य केले आहे.

४) माझ्या आवडीचा असा कोणताहि संशोधनाचा एक विषय सांगता येण्यासारखा नाही कारण संशोधनार्थ जो विषय माझ्यापुढे येईल त्या विषयात मी सारख्याच तत्परतेने आणि आवडीने समरस होतो. त्या कारणाने वैदिक काल, पौराणिक, ऐतिहासिक, प्राचीन काल, मध्ययुगीन काल, मुसलमानी काल, आधुनिक काल इत्यादि सर्व क्षेत्रात माझे संशोधनकार्य झाले आहे. तसेच संस्कृत आणि मराठी वाङ्मय यातहि माझे कार्य झाले आहे.

(डॉ. य. खु. देशपांडे यांची डॉ. वा. वि. मिराशी यांनी वरील विषयावर ऑल इंडिया रेडिओमार्फत घेतलेली रेडीओवरील ही मुलाखत आहे. डॉ. वा. वि. मिराशी यांनी विचारलेल्या प्रश्नांची डॉ. य. खु. देशपांडे यांनी दिलेली उत्तरे अनुक्रमाने ऑल इंडीया रेडिओ, नागपूर, याच्या कृपेने, वाचकांना माहीत व्हावीत म्हणून येथे दिली आहेत.– **संपादक**)

अनुक्रमणिका

५) माझे संशोधन कार्य व्यक्तिशः होते. मी एकटयानेच या कार्यास प्रारंभ केला व आजवर व्यक्तिशःच कार्य करीत आहे. तथापि या कार्यास संघटित स्वरूप यावे आणि संशोधनाच्या निरनिराळया क्षेत्रात सहकारी निर्माण व्हावेत म्हणून यवतमाळ येथे इ. स. १९२६ च्या सुमारास 'शारदाश्रम यवतमाळ' ही संस्था स्थापण्यात आली आणि सांगण्यास आनंद वाटतो की हा हेतु बहुतांशी साध्य झाला आहे.

संशोधन क्षेत्रात ज्यांचे सहकार्य लाभले त्यापैकी नावेच घ्यावयाशी झाली तर डॉ. वि. भि. कोलते, श्री. वा. ना. देशपांडे, श्री. द. बा. महाजन, श्री. ना. ना. हूड, श्री. रा. द. दामले, श्री. वा. कृ. दाणी, श्री. म. दा. साठे, अशी किती तरी नावे देता येतील.

विदर्भातील पहिले संशोधन कार्य

६) मी ज्यावेळेस पाहिले की विदर्भात पद्धतशीरपणे संशोधन मुळीच झालेले नाही तेव्हा मला प्रारंभापासूनच कार्यारंभ करावा लागला. मठ, मंदिरे, जुनी घराणी, इत्यादि ठिकाणी इतिहास वा वाङ्मयाची साधने विखुरलेली आहेत. तेव्हा प्रवास करून ती साधने असतील तेथे जाऊन त्यांचे निरिक्षण करणे व महत्वाची असतील ती संग्रहित करणे, या मार्गाचा अवलंब करावा लागला. हा संशोधनाचा पहिला टप्पा होय. अशी साधने एकत्रित झाल्यावर अनेक आधार ग्रंथांच्या साह्याने आपल्या अभ्यासिकेत बसून त्या साधनांचा अभ्यास करून त्यावरून निघालेला निर्णय आणि माहिती प्रकाशित करणे, हा संशोधनाचा दुसरा टप्पा होय. या दोनहि मार्गांचा मला अवलंब करावा लागला हे वर सांगितलेच आहे.

७) मी आपल्या संशोधनाची फलश्रुति म्हणून ऐतिहासिक आणि वाङ्मयीन अनेक लेख इंग्रजीतून आणि मराठीतून अनेक मासिकातून आणि नियतकालिके, साप्ताहिके यातून प्रसिद्ध केले आहेत. विशेषतः भारत इतिहास संशोधन मंडळाचे त्रैमासिक, इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्डस् कमिशन, ऑल इंडीया हिस्टरी काँग्रेस, ऑल इंडिया ओरिएंटल कॉन्फरन्स, इंटरनॅशनल हिस्टरी काँग्रेस, यांच्या प्रतिवार्षिक निवेदनात ते लेख प्रसिद्ध झाले आहेत. शिवाय महानुभावीय मराठी वाङ्मय, श्री. ऋद्धीपूर वर्णन आणि चक्रपाणि चरित्र हे अनुक्रमे प्राचीन मराठी काव्य गद्य ग्रंथ, वत्सगुल्म महात्म्य हे ग्रंथ प्रकाशित केले आहेत. वत्सगुल्म महात्म्याची सुमारे १०० पृष्ठांची प्रस्तावना अभ्यासपूर्ण आणि संशोधनपूर्वक लिहिली आहे. विदर्भातील ऐतिहासिक लेखसंग्रह खण्ड १ ला, हा मी संपादन केलेला ग्रंथ नुकताच विदर्भ संशोधन मंडळाने प्रकाशित केला आहे. तसेच 'वेद शाखा वाङ्मय आणि चरक ब्राह्मणांचा इतिहास' हा संशोधनपूर्वक आणि अभ्यासपूर्वक लिहिलेला असा

अनुक्रमणिका

शास्त्रीय आणि सामाजिक ग्रंथ हल्ली छापला जात असून प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

८) माझे ऐतिहासिक आणि वाङ्मयीन संशोधनात्मक लेख गेल्या ४० वर्षांपासून अनेक ठिकाणी प्रकाशित होवून विखुरलेले असे पडले आहेत. ते अभ्यासकांच्या सोयीकरिता एकत्र करून प्रकाशित करण्याचे कार्य अद्यापपर्यंत हाती घेतले नाही. व ते कार्य माझ्या हातून घडून येईल असा माझ्या वयोमानाने संभवहि दिसत नाही. ते कार्य अर्थात माझ्या पश्चातच होईल. जर हे प्रकाशनाचे कार्य कोणी आपुलकीने हाती घेईल तर त्याला मी आनंदाने संमति देऊन शक्य ते सहकार्य देईन.

महानुभावीय वाङमय संशोधन

९) महानुभावीय वाङ्मयाच्या संशोधनाच्या कार्याकडे माझे लक्ष वेधले त्याची कथा सांगण्यासारखी आहे. सन १९१७ च्या सुमारास एक जुना हस्तलिखित ग्रंथसंग्रह तपासित असता मला गुप्त लिपीत लिहिलेली एक जीर्ण पोथी आढळली. तिचा मला उलगडा होईना. माझे मित्र डॉ. पांडुरंग दामोदर गुणे यांच्याकडे या पोथीची दोन पाने पाहण्यास पाठविली पण त्यांनाहि त्या पोथीचा उलगडा होईना. शेवटी अनायासेच कै. भावे यांनी प्रकाशित केलेला ' महाराष्ट्र सारस्वत ' हा ग्रंथ माझ्या पाहण्यात आला. त्या ग्रंथात महानुभावांच्या सरळ लिपीची किल्ली दिली होती. ती त्या लिपीस लावून पाहताच ती पोथी म्हणजे श्री. चक्रधर स्वामीच्या मुखातून निघालेली वचने ज्यात संग्रहित केली आहेत असा महानुभावाचा ' सूत्रपाठ ' नावाचा तो प्राचीन मराठी गद्य ग्रंथ आहे असे आढळून आले. त्यानंतर महानुभाव पंथाचे पवित्र क्षेत्र ऋद्धिपूर येथे मी गेलो असताना तेथे एका शेतात जुनी विहीर दिसली. त्या संबंधाने मी माहूरचे महंत श्री. दत्तलक्षराज यांच्याशी बोलत असता त्यांनी ' स्थानपोथी ' नावाची एक हस्तलिखित पोथी दाखविली. तीत केशव नायकाची विहीर म्हणून वर्णिलेली विहीर असल्याचे वाचून दाखविले. त्या पोथीत असलेले वर्णन ऋद्धिपूर येथे बघितलेल्या विहीरीशी तंतोतंत जुळले. त्यावरून ती सात-आठशे वर्षाची केशव विहीर असल्याचे आढळून आले. त्या विहीरीसंबंधाने मी १९२२ साली अमरावतीस निघत असलेल्या ' उदय ' वर्तमानपत्रात एक लेख प्रसिद्ध केला. तोच माझा संशोधनात्मक प्रथम लेख होय. महंत दत्तलक्षराज यांच्या प्रोत्साहाने आणि मार्गदर्शनाने मी महानुभाव वाङ्मयाच्या संशोधनकार्यास आरंभ केला. आणि इ. स. १९२६ साली प्रकाशित केलेला 'महानुभावीय मराठी ग्रंथ' त्यावेळी केलेल्या संशोधनाचें फल होय.

१०) इ. स. १९०८ च्या सुमारास मी खडी धामणी येथील पटवाऱ्याचे

येथील जुने कागद तपासित असता मला मोडीत लिहिलेले एक बाड आढळून आले. ते वाचून पाहता पानिपतच्या लढाईनंतर मल्हारराव होळकर यांनी बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यास लिहिलेल्या पत्राची नक्कल होय असे आढळून आले. या नकलेचा विशेष हा की पानिपतचे युद्ध झाल्यानंतर ४० वर्षाच्या आतच त्या पत्राची नक्कल केलेली होती. यापूर्वी वि. का. राजवाडे यांनी 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खण्ड ३ रा' या ग्रंथात ते पत्र प्रसिद्ध केले होते. पण ते अपूर्ण होते. त्यांना पूर्ण प्रत मिळाली नव्हती व मला मिळालेले पत्र पूर्ण होते. हा त्या लेखाचा दुसरा विशेष होय.

शिलालेख, ताम्रपट, नाणी व मूर्ति

११) माझ्या संशोधनात जे शिलालेख, ताम्रपट, नाणी, मूर्ति, वगैरे आढळल्या त्यापैकी एक दोन महत्वाच्याचे उल्लेख करता येतील.

शिलालेख:–सर्वात जुने असे दोन शिलालेख वणी तालुक्यात कायर येथे मापडले. ते सातवाहन कालीन दुसऱ्या वा तिसऱ्या शतकातील आहेत. एक संस्कृत मध्ये असून दुसरा प्राकृतात आहे. त्याची लिपि दुसऱ्या शतकातील ब्राह्मी लिपि आहे.

ताम्रपट:–ताम्रपटापैकी वाकाटकांचा वाशीम ताम्रपट आणि राष्ट्रकूट नन्नराजाचा सांगळूद ताम्रपट हे महत्वाचे आहेत. वाशीम ताम्रपट वाकाटक नृपतीचा, आजवर उपलब्ध झालेल्या ताम्रपटापैकी सर्वात जुना आहे आणि पहिला पत्रा सोडून बाकीच्या शासनाची भाषा प्राकृत आहे. वाकाटकांचा हाच एक प्राकृत ताम्रपट असून तो तिसऱ्या शतकाचा आहे आणि त्या भाषेत जुन्या मराठीचे पूर्ण स्वरूप पाहवयास मिळते. त्या दृष्टीने तो ताम्रपट अभ्यसनीय आहे. दुसरा ताम्रपट संस्कृतमध्ये असून नन्नराज राष्ट्रकूटांचा आठव्या शतकातील आहे. यापूर्वी नन्नराजाचे दोनच ताम्रपट उपलब्ध झाले होते. या तिसऱ्या ताम्रपटाने नन्नराजाच्या इतिहासावर नव्याने प्रकाश पडतो.

नाणी:– मी संग्रहित केलेल्या नाण्यापैकी दोन नाणी विशेष उल्लेखनीय आहेत. पहिले नाणे इराणात ४ थ्या वा ५ व्या शतकात राज्य करीत असलेल्या सास्यानिअन राजवंशाचे आहे. व या नाण्यांचा संग्रह अमरावती जिल्ह्यात अंजनगाव सुर्जी येथे सांपडला. त्यापैकी तीन नाणी शारदाश्रम संग्रहात आहेत. ही परदेशी नाणी भारतात व्यापाऱ्यांनी आणली असावीत. दक्षिण भारतात अशाच प्रकारे रोमन् नाणी सापडली ती देखील व्यापाऱ्यांनीच आणली असावीत. दुसरे उल्लेखनीय नाणे म्हणजे शक नृपाचे नाणे. या नाण्यांचा संग्रह यवतमाळ जिल्ह्यात दामापूर येथे सापडला. हे रावराजे दुसऱ्या व तिसऱ्या शतकात भारतात राज्य करीत होते. हे नाणे चांदीचे असून एक तृतियांश इंच आकाराचे

वाटोळे आहे. या नाण्यांचा विशेष म्हणजे त्यावर त्या त्या राजांची प्रतिमा कोरलेली आहे. अशा तऱ्हेची पाच सहा नाणी शारदाश्रमात आहेत. एका नाण्यावर एका स्त्री राज्यकर्तीची प्रतिमा असून तिच्या कानात कर्णफुले आहेत. या नाण्यावरील प्रतिमा आर्येतरांच्या असल्यामुळे या नाण्यांना 'गधेय्या' हे नांव रूढ झाले आहे.

अभिप्राय

श्री. व्ही. के. नरसिंहन्, सहसंपादक 'हिंदु,' मद्रास, यांनी दि. १-१०-६० रोजी विदर्भ साहित्य संघाला भेट दिली. त्यावेळी वि. सा. संघाचे कार्याबद्दल त्यांनी व्यक्त केलेला अभिप्राय–

What a great inspiration to visit a place like this and discover that the writer can come into his own and be respected for his contribution to society. I am immensely proud of the fact that the Vidarbha Sahitya Sangh has accomplished for writers something which has not been done even in many foreign countries. May it continue to be a source of inspiration to Indian writers in any language !

V. K. Narasimhan.
1-10-60

विपुल सामग्रीचा संग्रह

१२) मी संग्रहित केलेली सामग्री विपुल असून ती हल्ली यवतमाळ शारदाश्रमात ठेवली आहे. मोजदादच करावयाची झाली तर सुमारे पांच हजार संस्कृत व मराठी हस्तलिखित ग्रंथ, सुमारे दोन हजार मराठी व फारशी ऐतिहासिक कागदपत्र आणि विविध नाणी, शिलालेख, ताम्रपट आणि त्यांचे छाप, ऐतिहासिक स्थळांची व स्थापत्यांची छायाचित्रे, मूर्ति इत्यादि प्राचीन वस्तु आहेत.

१३) वकीलीच्या व्ययसायातून सवड मिळेल तेव्हा विदर्भात प्राचीन स्थळे पाहण्यास आणि ऐतिहासिक कागदपत्र व हस्तलिखित ग्रंथ शोधण्यास मी मधून मधून जात असे. मी इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्डस् कमिशनचा मध्यवर्ती सरकारने नियुक्त केलेला सुमारे तीस वर्षापासून सभासद आहे. दरवर्षी कमिशनची बैठक भारतातील प्रदेश राजधानीत भरत असे त्यावेळेस प्रांतसरकारतर्फे त्या भागातील प्राचीन अवशेष व ऐतिहासिक दृष्टीने महत्वाची व प्रेक्षणीय स्थळे सभासदांस दाखविण्यात येत असत. अर्थात् त्या संबंधी ऐतिहासिक माहिती, उपलब्ध साधने वाचून व अभ्यासून मिळविण्यात येत असे. इ. स. १९३८ साली जागतिक ऐसिहासिक परिषद आणि आंतरराष्ट्रीय प्राच्यविद्यापरिषद अनुक्रमे स्विजर्लन्ड–मध्ये झ्युरिच येथे आणि बेल्जिअम मध्ये ब्रुसेल्समध्ये भरली होती. त्या परिषदांना निमंत्रणावरून मला जावयाचा योग आला त्यावेळेस सात महिने युरोपमध्ये मुक्काम होता. त्या अवधीत विद्यापीठे, वस्तु संग्रहालये, आणि ग्रंथालये यांना भेट देण्याचा योग आला होता. तेथे उपलब्ध झालेली भारत विषयक सामुग्री–संबंधी टाचणे करण्यात आली, तसेच युरोपातील प्रेक्षणीय स्थळे पाहून त्यांचीहि माहिती देणारी पुस्तके मिळविण्यात आली. इतिहास आणि वाङ्मय या दृष्टीने ही टाचणे फार महत्वाची आहेत.

उल्लेखनीय लेख

प्रवासात मिळविलेल्या ऐतिहासिक माहितीसंबंधी जे लेख लिहिले त्यात दोनच लेख विशेष उल्लेखनीय आहेत. पहिला लेख म्हणजे सुमारे तीस वर्षापूर्वी रेकॉर्डस् कमिशनकरिता पाटणा येथे गेलो असता विहार मधील बौद्ध, जैन, आणि वैदिक असे प्राचीन अवशेषांचे निरिक्षण केले व त्या संबंधी ऐतिहासिक प्रवास वृत्त म्हणून वागीश्वरी मासिकात नऊ लेखांकांची 'मगध विहार' नावाची एक लेखमाला प्रसिद्ध केली ती वाचनीय आहे. तसेच रेकॉर्ड कमिशन–करिता पेशावर येथे गेलो असता स्थानिक सरकारने सभासदांस त्या भागातील जुने बौद्ध अवशेष दाखविले; त्यासंबंधाने ऐतिहासिक माहितीचा अभ्यास करून सुमारे १५ वर्षापूर्वी गांधार पर्यटण नावाचा एक लेख तरुण भारत या वृत्तपत्रात प्रसिद्ध केला आहे.

१५) माझ्या संकल्पित ग्रंथापैकी दोन ग्रंथ महत्वाचे आहेत. शिंदखेडकर जाधवांचा इतिहास संग्रहित केलेल्या ऐतिहासिक साधनसामुग्रीच्या आधारे लिहावयाचा आहे आणि दुसरा ग्रंथ म्हणजे युरोपात अभ्यासिलेल्या भाषाशास्त्राचे नियमावरहुकूम उपलब्ध साधनसामुग्रीच्या आधारे मराठी भाषेचा इतिहास लिहावयाचा आहे. मराठी भाषेच्या इतिहासाची काही प्रकरणे लिहून झाली असून

अनुक्रमणिका

बरीच शिलालेखादि सामुग्री जुळविली आहे. हल्ली माझे वय ७७ वर्षाचे आहे. माझ्या हातून हा ग्रंथ लिहून न झाल्यास माझ्या मागे कोणीहि अभ्यासु विद्वान तो ग्रंथ पूर्ण करील व त्यातच मला समाधान आहे.

१६) आजवर अनेक संशोधकांनी जी सामुग्री उपलब्ध करून ठेवली आहे तिच्या आधारे दोन महत्वाचे ग्रंथ लिहिता येणे शक्य आहे. पहिला ग्रंथ म्हणजे विदर्भाचा अधिकृत असा प्राचीन इतिहास. हा ग्रंथ अगदी वैदिक, औपनिषिदिक आणि पौराणिक काळापासून तो मुसलानपूर्व कालापर्यंत लिहिता येण्यासारखा आहे. आणि दुसरा ग्रंथ म्हणजे सातवाहन कालीन महाराष्ट्र. त्यावेळचे शिलालेख जैन, बौद्ध, आणि वैदिक ग्रंथ इत्यादि विपुल साधने उपलब्ध आहेत आस्थेवाईक विद्वान अशा तरुण अभ्यासकांनी ही दोन्ही कार्ये हाती घ्यावयास पाहिजेत.

इतिशम्

* * *

व्यक्त आणि अव्यक्त

" वाचेचा विषय झालेला ताओ (आत्मा–ब्रह्म) हा खरा ताओ नव्हे. (खरा ताओ विवाद्य नाही, अनुभवगम्य आहे.) ज्या गुणाचा नामनिर्देश करता येतो, तो त्याचे खरे लक्षण नव्हे.

पृथ्वी आणि स्वर्ग ह्यांच्यापूर्वी जे होते त्याला अव्यक्त म्हणतात.

अव्यक्त हे वस्तुमात्राचे मूळ होय.

म्हणून ज्ञानी पुरुष, मूळ रहस्य जे अव्यक्त त्याच्याच शोधात राहतो. जे म्हणून अस्तित्वात आहे ते त्याची (अव्यक्ताची) परिणति मात्र होय, असे तो पाहत असतो.

अव्यक्त आणि व्यक्त ही, नाम सोडल्यास, सर्व बाबतीत अगदी एकरूप आहेत.

वरवर विरुद्ध दिसणाऱ्या द्वंद्वांच्या एकरूपतेलाच मी 'परम गहन,' 'अति अगाध,' 'विस्मयाचे केवळ मुक्तद्वार' असे म्हणतो."

— ताओ उपनिषत् अर्थात लाओत्सीची बोध–वचने.

अनुक्रमणिका

चालेल ऐशी स्थळें दुर्घट करावी. ऐसें जें जें स्वामींनीं मनीं धरिले तें तें स्वामीनी आशीर्वादप्रतापें मनोरथ पूर्ण केलें." (समर्थ संजीवनी, ले. ल. रा. पांगारकर· पृ. ६६–६७)

समर्थ हाती तलवार घेऊन लढले नाहीत म्हणून त्यांनी राजकारण केले नाही हे म्हणणे बरोबर नाही. लो. ना. बापूजी अणे म्हणतात त्याप्रमाणे, " समर्थांनी राजकारणात घेतलेला भाग, महाराजास सल्ला देणे, युक्तीच्या चार गोष्टी सांगणे, त्यांच्या मार्गातील काटे शक्य तितके बाजूस सारणे व महाराजांच्या हिंदवी स्वराज्यस्थापनेस महाराष्ट्रातील कर्त्या, वजनदार व शूर सरदारमंडळीस अनुकूल करून घेणे या प्रकारचा होता. " (श्रीदासायन– उत्तरार्ध– राजकारणकाण्ड, ले. अनंतदास रामदासी, प्रस्ता० ले. लो. ना. मा. श्री. अणे, प्र. पृ ३७) अशा रीतीनें शिवाजीच्या राजकारणात समर्थांचे कार्य मुख्यत्वे मंत्रस्वरूपाचें होते, परंतु मंत्र ही राजकारणातील एक अमोघ शक्ति आहे हे विसरता कामा नये· (प्रस्तुत ग्रंथ, पृ. ३९) समर्थ हे शिवाजीचे केवळ 'मोक्षगुरु' होते हे सर यदुनाथ सरकार यांचे मत किंवा समर्थांचे राजकीय कार्य केवळ नगण्य होते हे श्री. भा. पं. बहिरट यांचे मत कसे चुकीचें आहे ते वरील विवेचनावरून दिसून येईल.

समर्थांचे राजकीय कार्य

परंतु समर्थांचे राजकीय कार्य शिवाजीला सल्ला व सहकार्य देण्यापुरतेच मर्यादित नाही. शिवाजीप्रमाणेच समर्थांची राजकीय स्फूर्ति व कर्तृत्व स्वतंत्र आहेत. १२ वर्षे तीर्थयात्रेच्या निमित्ताने देशस्थिति पाहिल्यावर 'अहा रे विधि हे असे काय केले । पराधीनता पाप माझे उदेले ॥ ' अशा शब्दांत त्यांनी गुलामगिरी-बद्दल उद्विग्नता व्यक्त केली आहे. यातच त्यांची राजकीय स्फूर्ति आहे. आणि. त्यांची मूळ प्रवृत्ति जरी आध्यात्मिक असली तरी स्वराज्याशिवाय स्वधर्मरक्षण अशक्य आहे हे ओळखून त्यांनी राजकीयदृष्टचा जनजागृतीचे कार्य अंगावर घेतले. 'धीर धरा धीर धरा । हडबडूं गडबडूं नका । काळ देखोनि वर्तावें । सांडावें भय पोटींचें ।' अशा धीरोदात्त शब्दात त्यांनी जनजागृतीचे महान कार्य केले. ह्याकरिता त्यांनी महंतांची संघटना उभारली, जागोजाग मठांच्या स्वरूपात प्रचारकेन्द्रे निर्माण केली, गावोगाव शक्तिदेवतेची स्थापना केली व प्रचारकांना पथ-प्रदर्शक असा दासबोध ग्रंथ निर्माण केला. पद्धतशीरपणे सामूहिक प्रचाराचे आधुनिक तंत्र प्रथम रामदासांनी अमलात आणले व त्याद्वारे लो. टिळक म्हणतात त्याप्रमाणे 'रामदासांनी राष्ट्राची मने तयार करण्याचे कार्य केले. " (गीतारहस्य, प्रकरण १.) हे कार्य रामदासांचे सर्वात महत्त्वाचे राजकीय कार्य होय.

सारांश, शिवरायांच्या समवेत व स्वतंत्रपणे अशा दोन्ही रीतींनी समर्थांनी राजकारण केले व ह्या पार्श्वभूमीवरूनच त्यांच्या विचारसरणीकडे पहावयास पाहिजे. ही पार्श्वभूमि लक्षात घेतली तर समर्थांनी आपल्या ग्रंथात शेकडो ठिकाणी वापरलेल्या 'राजकारण' शब्दाचा राजकारणाहून वेगळा अर्थ घेण्याचे कारण रहात नाही. परंतु श्री. न. र. फाटक, श्री. भा. पं. बहिरट इतकेच नव्हे तर प्रा. सोनोपंत दांडेकर, श्री. गो. स. सरदेसाई, प्रो. आळतेकर, सर यदुनाथ सरकार यांनीहि 'राजकारण' शब्दाचा अर्थ 'व्यवहार', 'चातुर्य' अशा प्रकारचाच घेतला आहे. त्यामुळे ह्या प्रश्नाचाहि विचार करणे आवश्यक आहे.

राजकारणाचा अर्थ

राजकारण शब्दाचा 'व्यवहार', 'चातुर्य' असा अर्थ होऊ शकतो. परंतु समर्थवाङ्मयात अशी कित्येक उदाहरणे आढळतात की ज्या ठिकाणी 'राजकारण' शब्दाचा वरीलप्रमाणे अर्थ घेऊन भागत नाही. उदाहरणार्थ, शिवाजीला लिहिलेल्या एका पत्रात समर्थ लिहितात—

विवेके विचारें **राजकारणें** । अंतर शृंगारिजे ॥१॥
समयासारिखा समय येना । नेम सहसा चालेना ।
नेम धरिता **राजकारणा** । अंतर पडे ॥४॥

ह्या ठिकाणी शिवाजीला साधे व्यवहारज्ञान किंवा चातुर्य शिकविण्याचा समर्थांचा उद्देश होता हे म्हणणे हास्यास्पद ठरेल. समर्थांची पुढील प्रसिद्ध ओवीहि ह्या दृष्टीने अभ्यसनीय आहे. ते म्हणतात—

मुख्य तें हरिकथानिरूपण । दुसरें तें राजकारण ॥
तिसरें तें सावधपण । सर्व विषयीं ॥११–५–४॥

राजकारण म्हणजे केवळ व्यवहार किंवा चातुर्य असते तर पुन्हा सर्व विषयी सावधपणाचा उल्लेख करण्याची गरज नव्हती. ह्या ठिकाणी समर्थांनी हरिकथानिरूपण, राजकारण, आणि सर्व विषयांत सावधपण हे जीवनकार्याचे तीन स्वतंत्र विभाग मानलेले आहेत. त्यात सर्व विषयांत सावधपणा राखणे यातच व्यवहार कसा असावा हे सांगितले आहे. तेव्हा राजकारण म्हणजे राजकारणच ह्याची समर्थतत्त्वज्ञान सूत्ररूपाने सांगणारी ही ओवी म्हणजे निर्णायक पुरावाच आहे.

'उदंड समुदाये करावे। परी गुप्तरूपें।', 'राजकारण बहुत करावें। परंतु कळोंच नेदावें।', 'धटासी आणावा धट। उद्धटासी पाहिजे उद्धट।', 'राहराहों शोध घ्यावा। परांतराचा।', 'वेष असावा बावळा। अंतरी असाव्या नाना कळा।' अशा तऱ्हेच्या शेकडो सूचना समर्थवाङ्मयात आहेत. यातील भाषेचा जोरकसपणा व्यावहारिक चातुर्यापेक्षा कितीतरी अधिक अर्थ दिग्दर्शित

करतो. इतकेच नव्हे तर तत्कालीन बिकट परिस्थिति लक्षात घेता काहीशा संदिग्ध पण ज्यांना समजावयास पाहिजे त्यांना बरोबर समजेल अशा भाषेत समर्थांनी आपल्या सूचना केल्यात यात त्यांचे राजकारणपटुत्वच व्यक्त झाले आहे ब्रिटिश राजवटीत कै. शि. म. परांजपे, कै. अ. ब. कोल्हटकर, कै. प्र. कृ. खाडिलकर, स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या वाङमयात व्यक्त झालेल्या सूचना लक्षात घेतल्यास समर्थवाङ्मयातील सूचनांचे यथार्थ आकलन होऊं शकेल.

समर्थांचे अध्यात्मनिष्ठ राजकीय तत्त्वज्ञान

याप्रमाणे प्राथमिक हरकतींचे निराकरण केल्यानंतर समर्थांचे राजकीय तत्त्वज्ञान काय आहे ह्याचा आपण विचार करू.

आध्यात्मिकता हा समर्थांच्या इतर विचारांप्रमाणेच राजकीय विचारांचाहि पाया आहे. 'सामर्थ्य आहे चळवळीचें। जो जो करील तयाचे। परंतु येथे भगवंताचे। अधिष्ठान पाहिजे ॥ २०–४–२६ ॥' असे ते म्हणतात. विश्वाकडे पाहण्याची समर्थांची दृष्टि पूर्वापार चालत आलेली भारतीय दृष्टिच होती. त्यामुळे 'मुख्य ते हरिकथानिरूपण। दुसरें तें राजकारण ॥' असा राजकारणाला त्यांनी दुय्यम दर्जा दिला आहे. परंतु ह्यामुळे राजकारणाची आवश्यकता कमी आहे असे मात्र त्यांना म्हणावयाचे नाही. प्रपंच आणि परमार्थ हे मानवीजीवनाचे द्विविध ध्येय आहे आणि त्यातहि 'आधी प्रपंच करावा नेटका। मग घ्यावें परमार्थ विवेका ॥ १२–१–१ ॥ असे ते म्हणतात. आणि परमार्थात साकल्य विवरणाचें जे महत्त्व तेच प्रपंचात म्हणजे ऐहिक जीवनांत राजकारणाचे स्थान आहे हे त्यांच्या 'प्रपंची जाणे राजकारण। परमार्थी साकल्य विवरण ॥ १९–४–१७ ॥ ह्या ओळीवरून स्पष्ट आहे. अर्थात् 'धर्मार्थकामफलाय राज्याय नमः' हीच समर्थांची राजकारणाकडे पाहण्याची दृष्टि आहे. राजकारण हा ऐहिक जीवन संपन्न करण्याचा आधार आहे.

विचारवंत अशा चंचल मायेंतून सृष्टि निर्माण झाली 'विकारवंत विकारले सूक्ष्म जडत्वास आले। अमर्याद दिसो लागलें। कांहीच्या बाही ॥१२–२–१ हा सृष्टीच्या विकासाचा आध्यात्मिक दृष्टिकोण समर्थांनाहि मान्य आहे. हळहळू होणाऱ्या ह्या विकासांत 'बहुतां जन्माचा सेवट। नरदेह सांपडे अवचट। येथे वर्तावें चोखट। नीतिन्यायें ॥११–४–१॥' असे ते म्हणतात. समाजधारणेकरिता गुणकर्मावर आधारलेली वर्णव्यवस्था आवश्यक आहे अतएव 'रायांनी करावे राजधर्म। क्षत्रीं करावे क्षात्रधर्म। ब्राह्मणीं करावे स्वधर्म। नानाप्रकारें ॥' असें ते म्हणतात. तथापि अंतरात्म्याच्या दृष्टीने सर्व समान आहेत हा विचारहि त्यांनी मांडला आहे. 'भेटो कोणी एक नर। धेड महार चांभार। राखावें त्याचें

अंतर। याचें नांव भजन ॥ दुःख नेदावे कोणाला। उंच नीच जरी जाला। अंतरात्मा वोळखिला। तोचि जाणा सज्जन ॥' यावरून रामदास हे केवळ जातिनिष्ठ होते व त्यांनी केवळ ब्राह्मण्याचाच पुरस्कार केला आहे हा श्री. भा. पं. बहिरट यांचा आरोप चुकीचा ठरतो. (संतवाणीचा अमृत कलश, १९५५, पृ. ६०) 'ज्या ज्याचा जो व्यापार। तेथें असावे खबर्दार ॥ ११–४–१९॥' एवढाच त्यांचा आशय आहे,

वर्णव्यवस्थेप्रमाणेच आश्रमव्यवस्थाहि रामदासांना मान्य होती. प्रपंच व परमार्थ हे द्विविध ध्येय साध्य करण्याचा आश्रमव्यवस्था हा सोपानमार्ग आहे. परंतु समाजधारणेच्या दृष्टीने गृहस्थाश्रमच श्रेष्ठ आहे, 'नानावेश नाना आश्रम। सर्वांचें मूळ गृहस्थाश्रम। जेथे पावती विश्राम। त्रैलोक्यवासी ॥ १४–७–१ ॥ याकारणे गृहस्थाश्रम। सकलामधें उत्तमोत्तम ॥१४–७–४॥' असें समर्थ म्हणतात.

ऐहिक जीवनांतील कर्मे ही केलीच पाहिजेत, परंतु ती परोपकारबुद्धीने व निःसंगवृत्तीने करावीत अशी समर्थांचीहि कर्मयोगपर शिकवण आहे. 'आधी कर्माचा प्रसंग। कर्म केलें पाहिजे सांग। कदाचित पडलें व्यंग। तरी प्रत्यवाय घडे ॥ ११–९–१ ॥' मात्र 'शरीर परोपकारीं लावावें। बहुतांच्या कार्यास यावें। उणें पडों नेदावें। कोणि येकाचें ॥ २२–१०–५ ॥" आणि 'प्रकृति सारिखें चालावें। परि अंतरीं शाश्वत वोळखावें। सत्य होऊन वर्तावें। लोकां ऐसें ॥ ११–२–४०' असे ते म्हणतात.

ह्या सर्व विचारांच्या पाठीशी 'आवघेचि सुखी असावें। ऐसी वासना ॥ १९–४–२३॥' हेच 'सर्वेऽपि सुखितःसन्तु' ह्या अर्थाचे ध्येय समर्थांच्या मनांत होते. एकदोघांचे नव्हे, बहुसंख्याकांचेहि नव्हे तर सर्वांचे सुख हेच राज्याचे ध्येय होय. मानपंचकात समर्थांनी जे रामराज्याचे वर्णन केले आहे त्यावरून आदर्श राज्यासंबंधीची त्यांची कल्पना लक्षात येते. ते म्हणतात—'राज्य या रघुनाथाचें। कळीकाळासि नातुडे। बहुवृष्टि अनावृष्टि। हें कदा न घडे जनीं ॥ दरिद्री धुंडितां नाही। मूर्ख हा तो असेचि ना। परोपकार तो मोठा। सर्वत्र लोकसंग्रहो ॥ चढता वाढता प्रेमा। सुखानंद उचंबळे। संतोष समस्तै लोकां। रामराज्य भूमंडळीं ॥' आनंदवनभूवनातील 'आरोग्य जाहली काया। वैभवें सांडिली सीमा। सारसर्वस्व देवाचे। आनंदवनभूवनीं ॥' ह्या ओव्याहि समर्थांच्या आदर्श राज्याचे दर्शन घडवतात.

समर्थांची भारतीय राज्यशास्त्राला देणगी

अशा रीतीने समर्थांचे मूळ राजकीय विचार हे पूर्वापार चालत आलेले

भारतीय विचारचं होत. परंतु ह्या विचारांच्या पार्श्वभूमीवर आणि प्रसंगी त्यांना योग्य ती मुरड घालून पारतंत्र्य उलथून पाडण्याकरिता आवश्यक असे आचार-विचारशास्त्र समर्थांनी निर्माण केले आहे. आणि ही त्यांची स्वतःची भारतीय राज्यशास्त्राला देणगी आहे. 'जे लोक 'दास' झालेले असतील, परवशतेत सापडले असतील, त्यांना प्रवुद्ध-जागे करण्याकरितां हा ग्रंथ (दासबोध) लिहिलेला आहे' असे कै. अ. ब. कोल्हटकर यांनी यथार्थपणे लिहून ठेवले आहे. (सज्जनगड –दासनवमी खास अंक, १९५६, पृ. २१) समर्थांनी पारतंत्र्याच्या काळाकरिता राजकीय आपद्धर्म सांगितला आहे.

समर्थांना स्वातंत्र्याबद्दल विशेष तळमळ होती. 'अहा रे विधि हें असें काय केलें। पराधीनता पाप माझें उदेलें।।' अशी आर्त हाक त्यांनी मारली आहे. जे ज्या ठिकाणचे रहिवासी तेथे त्यांचेच राज्य असावे, 'बनावरी वनचरांची सत्ता। जळावरी जलचरांची सत्ता। भूमंडळी भूपाळां समस्तां। येणेंचि न्यायें।। २०–४–२५।।' अशी स्वातंत्र्याची त्यांनी सरळ, सोपी व मार्मिक व्याख्या दिली आहे.

स्वातंत्र्य कशाकरिता हवे ? तर, धर्मस्थापनेसाठी. हृया ठिकाणी धर्म शव्दाचा आधुनिक संकुचित अर्थ घेणे योग्य नाही. तसा अर्थ घेऊन श्री. वहिरटांनी समर्थांवर निष्कारण आरोप केले आहेत. (संतवाणीचा अमृतकलश, १९५५, पृ. ५७ ते ६८ पहा.) 'राष्ट्रीयत्व हा शब्द आधुनिक असला तरी त्याची भावना प्राचीनकाळी देखील दिसून येते. समर्थांची राष्ट्रैक्याची कल्पना धर्मैक्याच्या भावनेवर आधारलेली होती. आधुनिक भाषेत बोलावयाचे तर रामदास हे राष्ट्रवादी संत होते.

धर्मस्थापना = स्वराज्यस्थापना

त्यामुळेच धर्मस्थापना हा शब्द स्वराज्यस्थापना हृया अर्थी रामदासांनी वापरला आहे. 'देव मस्तकीं धरावा। अवघा हलकल्लोळ करावा। मुलुख बडवा कां बुडवाना। धर्मस्थापनेसाठी ।। १३ ।।' हे क्षात्रधर्माचे वर्णन किंवा 'सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ति। सांगणे काय तयाप्रति। धर्मस्थापनेची कीर्ति। सांभाळिली पाहिजे।।' हा शिवाजीला लिहिलेला मजकूर हेच दाखवितात. धर्मस्थापनेचे एक अंग किंवा साधन म्हणून धर्मस्थापनेच्या कल्पनेतच स्वराज्यस्थापना अंतर्भूत आहे अशी समर्थांची धारणा दिसते. अवतारकल्पनेला समर्थांनी दिलेली कलाटणीहि हृयाच अर्थाला पोषक आहे. 'धर्मस्थापनेचे नर। ते ईश्वराचे अवतार।।१८-६-२०।।' ही त्यांची अवतारांची कल्पना आहे. आणि 'विवेके वहुत पैसावले।। म्हणौन

अवतारी बोलिलें। मनुचक्रवर्ती जाले । येणेंचि न्यायें ॥ १५–३–५ ॥' ह्या ओवीत त्यांनी मनुचक्रवर्तीला अवतार म्हटले आहे. यावरून समर्थांच्या धर्म-स्थापनेच्या कल्पनेला राजकीय किंवा राष्ट्रीय रंग आहे हे स्पष्ट आहे.—

—(पूर्वार्ध)

* * *

अनुक्रमणिका

कण्हेर

कितीतरी दिवसांनी
दारी कण्हेर फुलला
भोवतीचा कणकण
रंगगंधात भिजला

आता थांबतील येथे
थकलेले वाटसरू
आता फिरकेल येथे
वैशाखातही पाखरू

श्रांतासाठी व्हायचा हा
सखे नित्याचा विसावा
तुझ्या प्रतीक्षेत पण
तोही निर्माल्याचा ठेवा !

बाबा मोहोड

* * *

उखाणा !

आकाशाचा लवतो डोळा
हंसते अधरी वीज लाजरी
मनास जाते हळूच चाटून
भूतस्मृतींची जाणिव गहिरी !

कुठे उंच डाहाळीवरती
कोकिळ असतो छेडित ताना
अकस्मात आठवतो मजला
तू केलेला काल उखाणा

——कृष्णा चौधरी

* *

अनुक्रमणिका

एकनाथांचे रुक्मिणी-स्वयंवर

● लेखकः– प्रा. सुरेश म. डोळके ●

महदंबेपासून मोरोपंतापर्यंत अनेक मराठी कवींनी रुक्मिणीस्वयंवराच्या पुराण– कथेवर काव्यरचना केलेली असली, व त्यापैकी काहींनी आपल्या प्रतिभा-सामर्थ्यानें काव्यकलेचे ताजमहाल उभारले असले, तरी एकनाथासारखी व्यापक व विश्वात्मक दृष्टि यांपैकी एकाहि कवीच्या ठिकाणी नव्हती. इतर कवींच्या दृष्टीनं रुक्मिणीस्वयंवर ही प्रामुख्यानं एक काव्य– कथा आहे. श्रीकृष्ण हा तिचा नायक आहे, रुक्मिणी ही त्या कथेची नायिका आहे आणि त्या दोघांतला प्रणय-प्रसंग व श्रीकृष्णाने रुक्मी या खलनायकावर मिळविलेला विजय, हा या काव्यकथेचा व कवीच्या प्रतिभेचाहि वर्ण्यविषय आहे. इतिहास– पुराणांचे अधिष्ठान असलेली युवा– कुमारीची एक उत्कट प्रीतिकथा हीच इतर कवींची रुक्मिणीस्वयंवराकडे पाहण्याची प्रमुख दृष्टि. मूळातले कथानक घेऊन त्यावर आपल्या प्रतिभेचा साजशृंगार चढवायचा, श्रीकृष्ण व रुक्मिणी यांच्या देह-सौंदर्याची विलोभनीय वर्णनं करावयाची, एका स्वरूपसुंदर तरुणीच्या मदनबाधेच्या तीव्रतेचं आणि चारुतेचं शब्दशिल्प उभारायचं, शृंगार व वीर या रसांच्या आविष्कारांत प्रसंगविशेषीं भक्तीचाहि रंग मिसळून द्यावयाचा व कलात्मक दृष्ट्या कथाकाव्य किंवा महाकाव्य निर्माण करायचं, हेच इतर कवींचं कौशल्य.

नरींद्राने तर ' जग भोजें नाचवीन: आनंदाचां ' (रु० स्व० ४३) अशा साहित्यिक आत्मविश्वासाने प्रस्तुत कथेचे गायन केले आहे. ' अगत्य नाही जनरंजनाचें । लागे तुझें ध्यान निरंजनाचें ' (रु. ह. १–३४) असे सामराज आवर्जून सांगतो. पण, केवळ ' निरंजनाचें ध्यान ' लागल्यामुळे सामराजाने आपले ' रुक्मिणीहरण ' लिहिले आणि ' जनरंजनाचें अगत्य ' त्याला नव्हते, असे त्याच्या महाकाव्यावरून मुळीच दिसत नाही. सामराजाची रुक्मिणी ही मूळात भक्तिप्रवण नाही. तिचे श्रीकृष्णावरील प्रेम, सुदामाचे श्रीकृष्णाकडून प्रत्यागमन होईपर्यंत तरी, अगदी लौकिक स्वरूपाचे म्हणजे शृंगारिकच होतें. एका महाकाव्याची तरुण व सुंदर शृंगारनायिका, हीच रुक्मिणीकडे पाहण्याची सामराजाची प्रमुख दृष्टि होती. ' निरंजनाचे ध्यान ' नव्हे, तर कला– काव्य निर्माण करणे, हीच सामराजाची

भूमिका. विठ्ठलहि आपल्या रुक्मिणीस्वयंवराच्या सुरवातीलाच, 'पुंडलीक वरद प्रमुसाहे, रुक्मिणीरमण विठ्ठल पाहे' (रु. स्व. १–५) असं म्हणतो. पण गंमत अशी की, विठ्ठल आपल्या काव्यातील भक्तीचा भाव तिथंच विसरतो आणि 'छंद वंध यमकें अनुपम्यें। काव्यरीतिवचनें नमु रम्यें' (रु. स्व. १–५९), 'छंदें शुद्ध विचित्र बंधं यमके नानाभिमाने तुके' (रु. स्व. ५–५५), अशा छंद– बंधांच्या आणि चित्र– कूटांच्या चक्रव्यूहातच तो गुरफटला जातो.

एकनाथाचं मात्र असं नाही. त्यांनी रुक्मिणीस्वयंवराच्या संपूर्ण कथेला जीवशिवलग्नाच्या आध्यात्मिक रूपकाच्या कोंदणात बसविलं आहे. त्यांच्या दृष्टीनं श्रीकृष्ण हा या कथेचा केवळ लौकिक नायकच नाही, तर प्रत्यक्ष परमात्मा आहे; रुक्मिणी ही केवळ 'सकळ सौंदर्याची खाणी' अशी 'स्वरूप-रूपाची जननी'च नाही, तर परमात्म्याच्या मीलनासाठी तळमळणारा जीवात्मा आहे; रुक्मिणीचे श्रीकृष्णावरील प्रेम ही केवळ तारुण्यसुलभ प्रीतीभावनाच नाही, तर जीवात्म्याला परमात्म्याशी एकरूप होण्याकरिता लागलेली उत्कटता आहे व रुक्मिणीचे श्रीकृष्णाशी झालेले मीलन ?— सगुणभक्तीचं अद्वैतात पर्यवसान करणारा साक्षात्कार आहे तो. 'ये ग्रंथींचें निरूपण। जीव शिवां होतसे लग्न' असं आपल्या रुक्मिणीस्वयंवराचं प्रयोजन स्वतः एकनाथांनीच सांगितलेलं आहे. इतिहास– पुराणातल्या प्रीतिकथेच्या आधारावर आध्यात्मिक रूपक रचण्याचं कार्य, मराठी कवीत तरी, एकनाथांनीच केलेलं आहे. मराठी स्वयंवरकाव्यातलं हे एक अनन्यवैशिष्टच समजलं पाहिजे.

विष्णुपुराण, हरिवंश आणि भागवत यांतील रुक्मिणीविवाह

भागवत आणि हरिवंश यांच्या आधाराने आपण रुक्मिणीस्वयंवराची कथा रचली, असे एकनाथ प्रत्येक 'प्रसंगा'च्या शेवटी सांगतात. हरिवंश आणि भागवत यांच्याहि आधी ही कथा 'विष्णुपुराणा'त आलेली आहे. हरिवंश आणि भागवत या विष्णुपुराणाच्याच सुधारून वाढविलेल्या आवृत्त्या. विष्णुपुराणानंतर या दोन्हि ग्रंथात रुक्मिणीहरणाच्या मूळ कथेचा कसा विस्तार होत गेला, याचे दिग्दर्शन प्रा. न. र. फाटक यांनी आपल्या एकनाथविषयक ग्रंथात केले आहे. कालमाना-नुसार व दैवतगौरवानुसार पुराणातल्या कथेत उत्तरोत्तर कशी भर पडत असते, याची कल्पना येण्यासाठी पुढील विवेचनहि उपयुक्त ठरेल.

विष्णुपुराणात रुक्मिणीहरणाची मूळ कथा, अवघ्या बारा (काही प्रतीत पंधरा) श्लोकांच्या एका अध्यायात आली आहे (अंश ५, अ० २६)– विदर्भ-देशान्तर्गत कुण्डिनपुरात भीष्मक नावाचा एक राजा होता. त्याला रुक्मी नावाचा एक पुत्र व रुक्मिणी नावाची एक लावण्यवती कन्या होती. श्रीकृष्णाने

रुक्मिणीची व 'चारुहासिनी' रुक्मिणीने श्रीकृष्णाची अभिलाषा धरली. श्रीकृष्णाने भीष्मकाकडे रुक्मिणीची याचनाहि केली होती; पण रुक्मीने श्रीकृष्णाविषयीच्या द्वेषामुळे त्याला रुक्मिणी दिली नाही ('न ददौ याचते चैना रुक्मी द्वेषेण चक्रिणे'), भीष्मकाने जरासन्धाच्या प्रेरणेने रुक्मीशी सहमत होऊन रुक्मिणी शिशुपालाला देण्याचा निश्चय केला. श्रीकृष्णसुद्धा शिशुपालाचा विवाहसमारंभ पाहण्याकरिता बळभद्रादि यादवांच्या परिवारासह कुण्डिनपुरला गेला. ···' विवाहाच्या आदल्या दिवशी श्रीकृष्णाने रुक्मिणीचे हरण केले.···. रुक्मीला युद्धात पराभूत केल्यावर श्रीकृष्णाने, राक्षसविवाहाने प्राप्त झालेल्या ('राक्षसेन विवाहेन सम्प्राप्तां') रुक्मिणीचे योग्य प्रकारे (सम्यक्) पाणिग्रहण केले. असा विष्णुपुराणातील कथेचा आशय आहे.

विष्णुपुराणातल्या १२ श्लोकांच्या एका अध्यायाचा हरिवंशाने १२६ श्लोकांत व दोन अध्यायांत (अ. ५९,६०) विस्तार केला आहे. विष्णुपुराणा-प्रमाणेच हरिवंशानेहि भीष्मकाला एक कन्या. व एकच पुत्र असल्याचे सांगितले आहे. (रुक्मी तस्या भवत्पुत्रो रुक्मिणी च विशांपते', ५९–१४). श्रीकृष्णाने रुक्मिणीची व रुक्मिणीने श्रीकृष्णाची अभिलाषा धरली होती, असे विष्णुपुराणा-प्रमाणे हरिवंशहि सांगतो. पण विष्णुपुराणाने त्याचे कारण दिलेले नाही. हरिवंश मात्र "श्रवादेव' हे परस्परांच्या अभिलाषेचे कारण सांगतो. श्रीकृष्णाने रुक्मिणीची याचना केली होती पण रुक्मीने कृष्णद्वेषामुळे ती पूर्ण होऊ दिली नाही, असे हरिवंशातहि आहे. श्रीकृष्ण हा बलरामादि यादवांच्या परिवारासह रुक्मिणीच्या विवाहाला हजर राहिला असे विष्णुपुराणाप्रमाणे हरिवंशहि म्हणतो. पण श्रीकृष्णासारखे दैवत निमंत्रणाशिवाय एका राज्याच्या घरी विवाहसमारंभाला हजर राहते, हे लोकांच्या कृष्णविषयक आदराला धक्का देणारे आहे, असे हरिवंशाने 'पितृष्वसुः प्रियार्थं–' आतेचे प्रिय करण्याकरिता– असे त्याचे कारण दिलेले आहे. 'पितृष्वसुःप्रियार्थं' याचा रुक्मिणीहरण हाहि अर्थ होऊ शकतो. पण तरीहि, आतेचे मन श्रीकृष्णाला कसे कळले हा प्रश्न शिल्लक राहतोच. शिवाय, आतेच्या मनात रुक्मिणी श्रीकृष्णाला द्यावयाची होती असे विष्णुपुराणात कुठेहि सांगितलेले नाही, हा भाग वेगळाच. केवळ आतेच्या समाधानाकरिता श्रीकृष्णा-सारख्या एका राजाने दुसऱ्या राजाच्या घरी निमंत्रणाशिवाय विवाहसमारंभाला उपस्थित राहणे उचित आहे काय, असाहि प्रश्न विचारता येईल.

'श्वोभाविनि विवाहे तु तां कन्यां हृतवान्हरिः'– विवाहाच्या आदल्या दिवशी श्रीकृष्णाने रुक्मिणीचे हरण केले– एवढेच विष्णुपुराण सांगते. या रुक्मिणी-हरणाचा तपशील विष्णुपुराणाने सांगितलेला नाही. हरिवंशाने मात्र, श्रीकृष्णाला रुक्मिणीहरण अधिक सुलभतेने करता यावे म्हणून रुक्मिणीला, विवाहाच्या

आदल्या दिवशी, इंद्राणीचे पूजन करण्याकरिता नगराबाहेर पाठविण्याची युक्ति काढली व कृष्णबलरामादि यादवांची उतरण्याची व्यवस्थाहि नगराबाहेरच एका सुंदर मंदिरात करून दिली. रुक्मिणीला पाहताच 'ववृधे कामः कृष्णस्य प्रियदर्शिनाम्'... देवताकृत्य आटोपून देवालयातून बाहेर येत असलेल्या रुक्मिणीला श्रीकृष्णाने एकाएकी उचलून ('सहसा उन्मथ्य') आपल्या रथावर घेतले व रथ चालू केला. पुढे शिशुपालपक्षीय राजेलोकांना युद्धात जिंकल्यावर व रुक्मिणीच्या विनवणीवरून रुक्मीला अभय दिल्यावर श्रीकृष्णाने द्वारकेला येऊन रुक्मिणीचे यथाविधि पाणिग्रहण केले. ('रुक्मिण्याः केशवः पाणिं जग्राह विधिवत्प्रभुः', ३०–३४)

इथेहि काही प्रश्न मनात उभे राहतात. रुक्मिणीने श्रीकृष्णाशीच विवाह करण्याची आपली मनीषा सखींच्या मेळाव्यात पूर्वी बोलून दाखविली असली (हरिवंश, ५२–५१), तरी श्रीकृष्णाला ती कशी कळली? शिवाय, अगदी पहिल्यान्दाच दृष्टीस पडलेल्या तरुणीला, तिच्या पूर्वसंमतीशिवाय, एकाएकी उचलून स्वतःच्या रथावर घेणे व पळवून नेणे, हा प्रकार सुसंस्कृतपणाला कितपत शोभण्यासारखा आहे, हा प्रश्न वेगळाच. श्रीकृष्ण हा परमेश्वरावतार होता व त्याला अंतर्ज्ञानाने इतरांचे, व म्हणून व रुक्मिणीचे, मनोव्यापार कळत होते असे म्हणायचे असेल तर गोष्ट वेगळी. पण मग त्याला गावाबाहेर राहून रुक्मिणीचे हरण करण्याचे तरी काय कारण होते? विवाहमंडपातून राजरोसपणे त्याला रुक्मिणीचे 'पाणिग्रहण' सहज करता आले असते.

भागवताने मात्र विष्णुपुराण व हरिवंश यातील रुक्मिणीविवाहविषयक कथेत अनेक दृष्टींनी महत्त्वाची भर घातली आहे.

पुराणेषु च सर्वेषु श्रीमद्भागवतं परम् ।
यत्र प्रतिपदं कृष्णो गीयते बहुधर्षिभिः ॥

(पद्मपुराण, ६–१८९–३)

—ज्याच्या प्रत्येक पदात श्रीकृष्णाचेच नाना तऱ्हांनी गायन केलेले आहे अशा भागवताने, लोकांच्या श्रीकृष्ण–दैवतविषयक भावना अधिक उच्च व उदात्त व्हाव्या, श्रीकृष्णाच्या वागणुकीविषयी त्यांच्या मनात यत्किंचितहि शंका राहू नये, या धोरणानेच हा विस्तार केला असावा.

विष्णुपुराण व हरिवंश यात भीष्मकाला एक कन्या व एकच पुत्र असल्याचे सांगितले आहे. भागवतकार मात्र भीष्मकाला एक कन्या व पाच पुत्र होते असे सांगतात– ('तस्य पंचाभवन्पुत्राः कन्यैका च वरानना', (दशमस्कंद, ५२–२१). श्रीकृष्ण व रुक्मिणी या दोघांचेहि गुणानुवाद परस्परांच्या कानावर पडले व

परस्परांनी एकमेकांना वरण्याचा मनोमन निश्चय केला, असे भागवतकार म्हणतात. हरिवंशानेहि याचे 'श्रवादेव' हेच कारण सांगितले होते. पण भागवताने 'गृहागतैर्गीयमानास्तं मेने सदृशं पतिम्' व 'कृष्णश्च सदृशीं भार्यां समुद्वोढुं मनो दधे' असे त्याचे अधिक स्पष्टीकरण केले आहे.

श्रीकृष्णाने भीष्मकाकडे रुक्मिणीची याचना केली होती असे विष्णुपुराण व हरिवंश या दोनहि ग्रंथांत आहे. पण, एका मुलीची तिच्या पित्याकडे स्वतः होऊन मागणी घालणे हे श्रीकृष्णाला शोभण्यासारखे नाही असे मनात आल्यामुळेच की काय, भागवताने श्रीकृष्णाने केलेल्या या याचनेचा उल्लेख गाळून उलट रुक्मिणीनेच श्रीकृष्णाला निरोप पाठवून स्वतःला पळवून नेण्याची युक्ति सुचविली होती असे सांगितले आहे. रुक्मिणी– निरोपाच्या योजनेत भागवतकारांच्या प्रतिभेचा मोठा अभिनव रमणीय आविष्कार झालेला आहे यात शंका नाही. रुक्मिणीच्या श्रीकृष्णावर असलेल्या उत्कट प्रीतीची माहिती श्रीकृष्णाला कशी झाली ?–आणि ती झाल्याशिवाय श्रीकृष्णाचे रुक्मिणीवर प्रेम तरी कसे बसले??– अशा अनेक शंकांचं निवारण करण्याकरिताच रुक्मिणीने ब्राह्मणाकरवी श्रीकृष्णाला तोंडी निरोप पाठविला व स्वतःचे पाणिग्रहण करण्याची युक्ति त्याला सुचविली, अशी काव्यमय क्लृप्ति भागवतकारांनी शोधून काढली असावी. श्रीकृष्णाला निमंत्रण नसताना तो विवाहाला उपस्थित राहिला हा कृष्णाचा आगंतुकपणा व रुक्मिणी देवळाबाहेर येत असताना तिला (अनवधानाने) एकाएकी उचलून स्वतःच्या रथात घालून पळवून नेण्याचा कृष्णाचा रानटीपणा– या दोनहि दोषांचे, रुक्मिणीच्या निरोपाची योजना करून, भागवतकारांनी मोठ्या कौशल्याने निराकरण केले आहे. हरिवंशाने रुक्मिणीला इंद्राणीच्या देवळांत व तेहि चार घोड्यांच्या रथातून पाठविले होते; भागवतकारांनी मात्र तिला अंबिकेच्या (भवानी) देवळात पायी जायला लावले आहे. इंद्राणीच्या देवालयातून बाहेर येताच श्रीकृष्णाने रुक्मिणीचे एकाएकी हरण केले; असे हरिवंश सांगतो. भागवताने मात्र रुक्मिणी स्वतःच श्रीकृष्णाच्या रथाकडे येत होती व त्याच्या रथावर चढण्याची इच्छा करीत होती ('तां राजकन्यां रथमारुरुक्षतीं', ५३–५६) अशी त्याला कलाटणी दिली आहे. . . . शिशुपालपक्षीय राजांना युद्धात जिंकल्यावर व रुक्मीचे वपन करून त्याला जीवदान दिल्यावर श्रीकृष्णाने द्वारकेस येऊन रुक्मिणीशी विधिपूर्वक विवाह केला ('पुरमानीय विधिवदुपयेमे कुरूद्वह', ५४–५३) यात रुक्मीचे वपन हा श्रीकृष्णाचा जास्तीचा पराक्रम भागवतकारांनी वर्णिलेला आहे. श्रीकृष्णाच्या मनात रुक्मिणीला पळवून न्यावयाचे असल्यामुळे व त्याला त्याची पूर्व कल्पना असल्यामुळे श्रीकृष्णाने, रुक्मिणीकडे आकृष्ट होऊनहि, भीष्मकाकडे रुक्मिणीची याचना केली नाही, असेहि भागवताचे स्पटीकरण होऊ शकते.

एकनाथांच्या रुक्मिणीस्वयंवरात एकूण १८ 'प्रसंग' किंवा अध्याय आहेत. रुक्मिणीचे हरण होईपर्यंतच्या कथाभागावर श्रीमद्भागवताची छाप असून पुढील युद्धवर्णनाचा विस्तार 'हरिवंशा'तील वर्णनासारखा दिसतो. बलरामाने श्रीकृष्णाला व रुक्मिणीला उपदेश केल्याचा भाग वर्णन करताना नाथ फिरून भागवताकडे वळले आहेत. १३ ते १८ या सहा 'प्रसंगां'तील वर्णनाला मात्र मूळात आधार नाही. 'विधिवत्' व 'यथाविधि' एवढयाच मूळातल्या शब्दांचा आधार घेऊन नाथांनी त्यावर लग्नविधीच्या विस्तृत वर्णनाच्या सहा अध्यायांचा प्रपंच उभारला आहे.

एकनाथांचें रुक्मिणीस्वयंवर: एक आध्यात्मिक रूपक

रुक्मिणीहरणवार्ता। जुनाट होय सर्वथा
परी पाणिग्रहणव्यवस्था। नवी कथा कवित्वाची।। (रु. स्व. १८–६२)

असे एकनाथ म्हणतात. रुक्मिणीहरणाच्या जुन्या कथेवर शिवाने केलेल्या जीवाच्या पाणिग्रहणाची नवीनच कवित्व–कथा एकनाथांनी रचली आहे. एकनाथाच्या 'कवित्वा'चा स्थायीभाव त्यावरून ध्यानात येतो. रुक्मिणी हा जीव आणि कृष्ण हा शिव, जीवात्म्याला परमात्म्याशी ऐक्यभाव साधण्याची तळमळ असते. ही तळमळ सार्थकी लावावयाची असेल तर आत्म्याच्या उन्मेषावर लक्ष्य टेवून लोकाचाराच्या अनेक सीमा झुगाराव्या लागतात, कामक्रोधादि अंतर्गत विकारांवर व संसारातल्या विघ्नावर विजय मिळवावा लागतो आणि भक्तीच्या सोपानाने अद्वैताचा स्वर्ग गाठावा लागतो, अशा कल्पनेचे रूपक एकनाथांनी रुक्मिणीस्वयंवराच्या कथेवर बसविले आहे.

एकनाथांच्या रुक्मिणीस्वयंवरात अध्यात्माचाच प्रवाह सर्वत्र खळाळताना दिसतो. भीमक म्हणजे मूर्तिमन्त विवेक, त्याची पत्नी शुद्धमती म्हणजे देहधारिणी श्रद्धा. रुक्मिणीच्या गर्भवासाचे नऊ महिने म्हणजे भक्तीचे नऊ प्रकार. विवेक आणि श्रद्धा यांच्या पोटी जन्माला आली चिच्छक्ति– तिचंचन व रुक्मिणी. पाच विषयांच्या शेवटी जशी सुबुद्धि उपजावी, तशी पाच भावांच्या मागून रुक्मिणी जन्माला आली. 'स्वरूपरूपें अतिसुंदर। लावण्यगुणें गुणगंभीर' अशी रुक्मिणी भीमकाजवळ राजसभेत बसली असताना कीर्तिनामा ब्राह्मणाने श्रीकृष्णाच्या रूपगुणांचे वर्णन केले. तो म्हणतो–

पिळून इंद्रनीळकिळी। वोतली कृष्णतनु सांवळी।
पाउलें सुकुमार कोंवळीं। घोटीं निळीं दोहीं भागीं।।
सुनीळ नभाचिया कळिका। तैशा अंगुलिका देखा।
वरी नखें त्या चंद्ररेखा। चरणपीयूषा लुब्धल्या।।
(रु. स्व. १-२३, २४)

– इंद्रनीळाचें रत्नतेज पिळून सावळी कृष्णतनू ओतली होती. त्याच्या अंगुलि या जणु सुनील आकाशाला आलेल्या कळयाच होत्या. त्या अंगुलींना असलेली नखे ?– चंद्रलेखा होत्या त्या. कृष्णचरणातील अमृताच्या लोभानंच आकाश सोडून त्या कृष्णचरणाच्या दासी झाल्या होत्या.

कृष्णचरणातील भूषणांच्या ध्वनीनं वेदघोषालाहि उणेपणा आणला होता. त्याच्या पायातील नूपुरे 'सोऽहं' शब्दाचा गजर करून मुमुक्षूंच्या मनातील आळस झाडून टाकीत होती. त्याच्या गळचातील मोती ज्ञान आणि वैराग्य या शुक्ति-संपुटांमध्ये जन्माला आले होते. गळचातील वैजयंती निर्मळ आत्मशांतीचं निदर्शन करीत होती. पंचमहाभूते जशी एकमेकांहून भिन्न असतात तशी कृष्णाची बोटे भिन्न होती; पण तळहाताच्या अधिष्ठानात ती एकवटली होती. जीवशिव जसे एकाकार असतात तसे कृष्णाचे ओठ होते. कृष्णाच्या कानातील तेजस्वी कुंडलं म्हणजे पूर्व आणि उत्तर या दोन मीमांसा होत्या आणि उपनिषदर्थाच्या किरणांनी त्या झळकत होत्या, त्याच्या कंठातला कौस्तुभमणी ?– उपनिषदांच्या तेजाचं सार होतं ते. अहंपण उगाळून काढलेले सोहंभावाचे शुद्ध चंदन श्रीकृष्णाच्या कपाळावर विराजत होते. मदन हा सौंदर्याचा अधिदेव; स्वतःच्या सौंदर्याचा त्याला मोठा अभिमान. पण श्रीकृष्णाचं सौंदर्य पाहताच त्याला स्वतःच्या शरीराचा इतका वीट आला, की त्याने तात्काळ देहत्याग केला. . . . कृष्णाला पाहताच त्यानं स्वतःला जाळून घेतलं आणि तो अनंग झाला. . . .

जुन्या पिढीतील कुमारिका, चांगला पति मिळावा म्हणून एकनाथांच्या 'रुक्मिणीस्वयंवरा'चं पठण करीत असत. त्यांचं ते व्रत फळत असे की नाही कुणाला ठाऊक ! पण कीर्तिब्राह्मणानं श्रीकृष्णाच्या रूपगुणांचं वर्णन करताच श्रीकृष्ण हाच आपल्याला पति लाभावा असं रुक्मिणीला वाटलं. ती देहभाव विसरली. 'एक म्हणती धरा धरा। एक पल्लवें घालिती वारा। एक म्हणती हे सुंदरा। कृष्ण कीर्तीने झडपिली.'

'निंदेमाजी स्तुति होत'

विवेकी भीमकानं आणि श्रद्धायुक्त शुद्धमतीनं रुक्मिणी श्रीकृष्णाला द्यावी असं योजलं. पण विवेक आणि श्रद्धा यांच्या आड येतो विकल्प. रुक्मीला तो विचार मानवला नाही.

'एक म्हणती नंदाचा। एक म्हणती वसुदेवाचा
ठाव नाहीं बापाचा। अकुळी साचा श्रीकृष्ण ।।
मुळींच नाही जन्मपत्र। कवण जाणे कुळगोत्र
कृष्ण नव्हे जी स्वतंत्र। भक्तपरतंत्र सदांचा'।। (रु. स्व. २, ४३)-

असं म्हणून त्यानं कृष्णनिंदा आरंभिली आणि रुक्मिणी शिशुपाळाला द्यायचं ठरविलं.

रुक्मीने केलेल्या कृष्णनिंदेतहि एकनाथांनी अध्यात्माचा प्रवाह गुंफून त्यांतून श्रीकृष्णाचा गौरवच गायिला आहे. कृष्ण मूळातच अशरीरि. त्याच्याशी शरीर-संबंध कसला ? कृष्णाने कंसाला मारले, म्हणजे अहंपणाचा नाश केला. कृष्णाला जन्मपत्र किंवा कुळगोत्र नाही असे रुक्मी म्हणतो. जो मूळांतच अजन्मा आहे, त्याच्या आईबापाचा किंवा कुळगोत्राचा ठावठिकाणा कसा राहील ? कृष्ण चोरटाच असायचा; कारण तो भक्तांचे चित्त–हरण करतो. चारहि वाणींच्या जो पलिकडे आहे, त्याच्याशी वाङ्‌निश्चय कसा घडेल ?... रुक्मीने कृष्णनिंदा केली खरी, पण एकनाथांच्या वाग्देवतेने त्या निंदेलाहि स्तुतीचे रूप दिले. निंदेच्या पापाला एकनाथांची वागीश्वरी भ्याली, असेच म्हटले पाहिजे.

रुक्मिणी–पत्रिका

सद्‌बुद्धीच्या आड कामक्रोध यावा, विवेकाआड गर्वमद यावा किंवा स्वधर्मा-आड आळससिंधु यावा, त्याप्रमाणे विवेक– श्रद्धेच्या आड रुक्मीरूप विकल्प आला होता. ‘ वैराग्यामाजी विवेक ’ असा भीमक. पण, विवेकाने महामोहाला वश व्हावे त्याप्रमाणे भीमकहि पुत्राच्या मोहाला अनुकूल झाला होता.

रुक्मिणीनं खूप विचार केला. आशेच्या साजणींचं, दीनतृष्णेच्या ब्राह्मणींचं व सदासनांच्या सुवासिनींचं मला साह्य झाल्याशिवाय राह्यचं नाही असं ती म्हणाली. तिनं ‘ निजभावा’च्या सुदेव ब्राह्मणाला बोलाविलं, आणि

> कृष्णप्राप्तीचा सद्भावो । यालागीं तो सुदेवो
> कृष्णप्राप्तीसी धाडिला पहा हो । निजपत्रिका देवोनी ।।
> (रु. स्व. २-४९)

भागवतातल्या रुक्मिणीच्या तोंडी निरोपाला मराठी कवींनी (भागवत टीकाकार श्रीधरानं नव्हे) पहिल्यांदा **‘ पत्रिके ’**चं सुरूप दिलं. शुद्धसत्वाच्या कागदावर हृदयीच्या काजळानं बुद्धिबोधाची अक्षरं कोरून रुक्मिणीनं ती पत्रिका तयार केली आणि मनोवेगाच्या वारूवर ब्राह्मणाला बसवून श्रीकृष्णाला मूळ, पाठविलं.... ब्राह्मण ? छे: ! भीमकांचा मूर्तिमंत भावार्थ होता तो. त्या पत्रिकेतील सात श्लोक म्हणजे नाथांच्या दृष्टीनं मोक्षमार्गाला उपकारक असे उपाव, भाव, आर्ति, कीर्ति, विवेक, निश्चय, निजभक्ति, हे सात गुण होत.

भाविकाची भूमिका

‘ द्विजासी देखोन श्रीपती । भाव चित्तीं जाणिला ’ असे एकनाथांनी म्हटले आहे. पण, हे कसे घडले ? कारण, सुदेव येण्यापूर्वी नाथांच्या श्रीकृष्णाने रुक्मिणीचे

नावहि ऐकले नव्हते. हरिवंशाने ‘श्रवादेव’ असे त्याचे कारण तरी दिलेले आहे. एकनाथांनी तर तेहि दिलेले नाही. कथाकाव्याच्या कथानकातील हा दोष तरी म्हणावा लागेल किंवा श्रीकृष्णाला आत्मज्ञानाने हे पूर्वीच कळले होते, असे मनाचे समाधान तरी करून घ्यावे लागेल.

‘जे होतें कृष्णाचे पोटी । तीच द्विजीं सांगितली गोष्टी’ (३-५०) असेहि एकनाथ म्हणतात. यावरून, रुक्मिणीशी विवाह करणे श्रीकृष्णाच्या मनात पूर्वीपासूनच होते, असे एकनाथांनी सुचविले आहे; पण श्रीकृष्णाला रुक्मिणीचे हृदय पूर्वीच कसे कळले, याचा मात्र त्यांनी मुळीच खुलासा केलेला नाही. श्रीकृष्ण हा परमात्मा असल्यामुळे सर्वज्ञ होता, अशीच एकनाथांची श्रीकृष्णाविषयी भावना असावी. यावरून, एकनाथांच्या ठिकाणी चिकित्सिकतेचा अभाव होता किंवा दुसऱ्या शब्दात सांगायचं म्हणजे एकनाथांची भूमिका भाविकाची होती, असा निष्कर्ष काढावा लागतो. चिकित्सकतेच्या अभावामुळेच एकनाथांनी जरासंधाच्या तोंडी, त्याला न शोभणारे—

> येथें यश आलियाचें सुख । अथवा अपेशाचें दुःख
> अहंपणीं मानिती मूर्ख । कर्ता देख तो नव्हे ।।
> येथें कर्ता जो मी म्हणे । तो पडे सुखदुःखां नागवणें
> जन्ममरणांसी आवंतणें । दीधलें नेणें सर्वथा ।।
>
> (रु. स्व. १२-३६, ३७)

असले तत्वाज्ञान खुशाल कोंबून दिले आहे.

शृंगाराला अध्यात्माचा रंग

कृष्णानं रुक्मिणीपत्रिकेचं अधीरपणानं चुंबन घेतलं. पत्रिका वाचताच श्रीकृष्णाच्या डोळयांसमोर रुक्मिणी दिसायला लागली. तो बाहू पसरून तिला आलिंगन देण्यासाठी उठला. . . . रुक्मिणीच्या विरहामुळं कृष्णाचा डोळा लागेना; तो झोपेंतच उसणावू लागला. . . . इत्यादि वर्णनात मात्र एकनाथांनी प्रेमिकाच्या मनातल्या आर्त प्रीतिभावनेचा नाजुक व नाटचमय आविष्कार केला आहे. मानवी भावनेच्या आतुरतेचं एकनाथांनी इथं मोठं सुंदर व प्रतीकात्मक चित्रण केलं आहे. इथला श्रीकृष्ण, प्रीतिविषयाची प्राप्ति व्हावी म्हणून, रात्रभर तळमळणारा मानवी जीव वाटतो. पण त्यालाहि

> जया हृदयीं जैसा भावो । तयासी तैसा भेटे देवो
> भीमकी कृष्णमय पाहाहो । कृष्णदेवो तन्मय।। (रु. स्व. ४-६८)

असा अध्यात्माचा रंग द्यायला एकनाथ विसरले नाहीत. . . . रुक्मिणीचे स्तन भरदार होते, ते कृष्णस्पर्शासाठी आसुसलेले होते, हे शृंगारिक वर्णनहि एकनाथांनी-

एका अंगीं भिन्नपणीं । जीव शिव वाढिन्नले दोन्ही
तेणें झाली घनस्तनी । कुचकामिनी कुचभारें ।।
भीमकीकृष्णा आलिंगन । तेणें जीवाशिवां समाधान
यालागी दोनी उचंबळले जाण । कृष्णस्पर्शन वांछिती ।।
(रु. स्व. ७-४१, ४३)

अशा अध्यात्मात घोळून काढले आहे. रुक्मिणीच्या दाटलेल्या काचोळीच्या गाठीलाहि 'प्रकृतिपुरुषां पडली मिठी. . कृष्ण सोडील जगजेठी' (७-४७) असे अध्यात्माचे रूप द्यावयाला एकनाथ विसरत नाहीत.

गंगातीरीचीं चक्रवाकें । तेवीं कुचद्वय सुरेखें
हृदयीं घननीळ झळके । शोभा पदकें दाविजे ।। (रु. स्व. १५-५८)

या ओवींतहि, 'हृदयीं घननीळ झळके' या शब्दांनी वेगळाच रंग भरला आहे.

श्रीकृष्ण येताच रुक्मिणीला झालेल्या आनंदाचं 'आंगीची उतटली कांचोळी। मुद्रिका दाटली अंगोळी । सर्वांगें हरिखली वेल्हाळी । जीवें वोवाळी द्विजातें ।।' (५-८९) हे जे वर्णन एकनाथांनी केलं आहे, ते वाचताच 'आपुलेनि सींहाणेपणें । आंगिचे सात्विक लपवूं जाणे । पुण चोळी ताणताए जेणें गुणें । तो भावो लपवेना।।' (शि. व. १८९) असं रुक्मिणीचं वर्णन करणाऱ्या भास्करभट्टाची आठवण होते.

श्रीकृष्णाला रुक्मिणीनं वरमाला अर्पण केली. तो तिला रथांतून घेऊन चालला. पण, त्याला लगेच शिशुपाळादिकांशी युद्ध करावं लागलं. रुक्मीशीहि त्याने 'मेहुणेपणाचा विनोद' केला.

अध्यात्मनिष्ठ वीररसाचा आविष्कार

युद्धवर्णनात एकनाथांनी वीररसाचा आविष्कार केला आहे. युद्धाच्या धुमश्चक्रीतहि एकनाथ अध्यात्माला विसरले नाहीत. विरोधभक्तीनेसुद्धा जिवा-शिवाचे ऐक्य साधते, असे एकानाथांनी युद्धवर्णनात, अनेकदा सुचविले आहे. 'युद्धमिसें लाभ झाला । वीरां फावला निजमोक्ष.' युद्धात ज्यांना मरावे लागले त्यांना मोक्षाचा लाभ झाला. वीराला त्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणे मोक्ष देण्याकरिता भीमकी–विवाहाच्या निमित्तानं श्रीकृष्णानं समरांगणात मोक्षाचा निर्वाह केला होता.

'शिरें खेळती चेंडूफळी । रणकंदोळी मांडिली' (१०-३६). . . एक शिरकमल स्वर्गापर्यंत उडाले; पण स्वर्गभोग न आवडल्यामुळे ते पुन्हा कृष्णाकडे परतले. कृष्णाच्या दृष्टिक्षेपापुढे त्याला स्वर्गसुखसुद्धा तुच्छ वाटत होते. दुसरे एक शिरकमल ध्रुवमंडळापर्यंत उडाले. पण, अढळपद न मिळाल्यामुळे ते उतावीळपणाने श्रीकृष्णाकडेच परत आले व 'निजसुखासी पावलें.' एका शिरकमलाने सत्यलोकात

अनुक्रमणिका

जाऊन त्याचा धिक्कार केला व शेवटी कृष्णचरणीच झेप घेतली.... आणखी एक शिरकमल वैकुंठापर्यंत उडाले; पण ती एकदेशी गति न आवडून ते मुरडून श्रीकृष्णाकडे आले. 'कृष्णनाथाला सोडून आम्ही सलोकतेचा स्वीकार करू इच्छित नाही; आपल्याला वैकुंठहि नको' असे म्हणून त्याने हरिचरणावर डोके टेकले व तेथेच ते स्थिरावले....

... या वर्णनांत एकनाथांची कल्पकता तर दिसतेच, पण, या कल्पकतेला प्रेरक अशी त्यांची आध्यात्मिकता आहे. विरोधभक्तीनेसुद्धा मोक्ष गाठता येतो, या सूत्रात एकनाथांनी वरील प्रसंग गुंफलेले आहेत.

युद्धवर्णनात वीराबरोबरच बीभत्स (१२-२० ते २५), भयानक (१०-४७, १२-१०८), रौद्र (१२-६८; १२-११४) याहि रसांचा आविष्कार एकनाथांनी प्रसंगविशेषी केला आहे.

रुक्मिणी–विवाह

रुक्मीचा पराभव झाल्यावर 'आतां विधियुक्त कन्यादान। पाणिग्रहण करावें,' अशी भीमकाने श्रीकृष्णाची विनवणी केली. रुक्मिणी कृष्णाला अक्षता लावायला गेली. ती इतकी अंतर्बाह्य कृष्णमय झाली होती, की तिला कृष्ण ही विशिष्ट व्यक्ती दिसेचना. प्रत्येक दिशा तिला कृष्णमयच दिसायला लागली. तिनं चारहि बाजूंनी अक्षता घातल्या.... अशा रीतीनं ही 'जिवाजिवाची मिठी पडली.' इथं,

> मेहुणे म्हणती हा जगजेठी। जाणे बिरडयाची हातवटी
> अभ्यास केला यमुनेतटीं। दाटोदाटी गौळणींसी।। (रु. स्व. १६-७५)

हा, प्रसंगाला न शोभणारा उल्लेख एकनाथांनी करायला नको होता.

शेवटीं एकनाथ म्हणतात–

> 'ये ग्रथींचें निरूपण। जीवशिवां होतसे लग्न
> अर्थ पाहतां सावधान। समाधान सात्त्विकां।।' (रु. स्व. १८-७३)

अध्यात्माच्या प्रवाहावर कवित्वाचीं कमलपुष्पें

काव्यदृष्टीनं उत्कृष्ट असलेली अनेक स्थळं एकनाथांच्या रुक्मिणीस्वयंवरात आहेत. कृष्ण कुंडिनपुरला आला तेव्हा लोकांच्या डोळयांचे भ्रमर कृष्णमुखाच्या कमळावरच खिळून राहिले.... आपली मुलगी लक्ष्मी ही रुक्मिणीचा अवतार घेऊन कृष्णाला वरमाला घालते तेव्हा तिच्या लग्नाचा सोहळा आपण जवळून पहावा असं वाटून समुद्रानं रुक्मिणीच्या अंगावरील पांढऱ्या शुभ्र वस्त्राचं रूप घेतलं होतं.... वीज मावळायला विसरली आणि पीतांबराच्या रूपानं कृष्णाच्या कमरेला लपेटून राहिली.... चंद्र आणि रुक्मिणी यांचं बहीणभावांचं नातं. पण,

आपल्या भावाला विचाऱ्याला ग्रहण लागतं, त्याला नेहमी पूर्णत्वानं राहता येत नाही, म्हणून रुक्मिणीनं त्याला आपल्या मुखाचा आसरा दिला होता आणि त्यामुळं तो अधिक सतेज दिसत होता. . . . गगनाला शून्यत्वाचा कंटाळा आला होता म्हणून कृष्णाची भेट घेण्यासाठी रुक्मिणीच्या केसांच्या रूपानं ते साकार झालं होतं. . . . इत्यादि कल्पना, किंवा

भीमकी पाहे कृष्णवदन । नयनीं गुंतले नयन
दोहींचा एक जाला प्राण । पाणिग्रहण जीवाशिवां ।।

(रु. स्व. ७-६७)

उचलोनियां वेगेंसीं । हृदयीं धरी हृषीकेशी
येरें मिठी घातली कंठेंसीं । भावार्थेसीं मिसळला ।।

(रु. स्व. १४-१२१)

अशा ओव्यात साकार झालेली अभिव्यक्ति, रमणीय नाही असे कोण म्हणेल?—

आणि तरीहि, एकनाथांच्या रुक्मिणीस्वयंवरात कविप्रतिभेवर कलेची फुलं फुललेली नाहीत, तर अध्यात्माच्या प्रवाहावर कवित्वाची कमलपुष्पं उमललेली आहेत, असंच म्हटलं पाहिजे.

★ ★ ★

नावात काय आहे ?

नावात काय आहे !
म्हणून तर कन्या
मातेनेंहि ठेवलेले नाव सोडून
पतिघरचे नाव धारण करते.

नावात काय नाही ?
म्हणून तर कन्या
मातेनेंहि ठेवलेले नाव सोडून
पतिघरचे नाव धारण करते.

किंचित् कवि —प्रा. श्री. गो. काशीकर

अनुक्रमणिका

अनामिकाची चिंतनिका

एक वैचारिक आत्मकथा] [भाग २ रा

१

माझ्या जीवनरथाचे एक चाक, महारथी कर्णाच्या रथाच्या चाकाप्रमाणे ऐन आणीबाणीच्या प्रसंगी, भुईत रुतून बसले आहे. आणि, महारथी कर्णाने आपले प्रतिस्पर्धी, अर्जुन व श्रीकृष्ण, यांना,– "रथचक्र उद्धरूं दे, श्रुतिशास्त्रज्ञा, महारथा, कुलजा"—असे वारंवार विनविले असतांनाहि, धर्मयुद्धनीतीशी पूर्ण सुसंगत अशा त्याच्या या विनवणीकडे बेमुर्वतपणे दुर्लक्ष करून, परमेश्वराचा अवतार मानल्या गेलेल्या श्रीकृष्णाच्या आदेशानुसार, अर्जुनाने त्याच्यावर आपल्या बाणांचा वर्षाव चालूच ठेवला.– अगदी थेट तसाच प्रकार माझ्याहि बाबतीत घडून येत आहे.

जीवनाच्या संग्रामात आजवर मी माझ्या सामर्थ्यानुसार आणि धर्मयुद्ध-नीतीच्या कोणत्याहि नियमाचा बुद्ध्या भंग न करता लढत आलो आहे. पण आता माझ्या जीवनरथाचे एक चाक एकाएकी भुईत रुतून बसल्यामुळे जीवनातील माझ्या सर्व उघड व गुप्त प्रतिस्पर्ध्यांना मी विनम्रपणे विनवीत आहे की,

● लेखक:– पुरुषोत्तम यशवंत देशपांडे ●

'बाबांनो, जरा थांबा. भुईत रुतलेले माझ्या रथाचे हे एक चाक मला वर काढू द्या आणि मग माझ्याशी वाटेल तेवढे युद्ध करा.' पण माझ्या विनम्र आणि सर्वथैव सुयोग्य अशा या विनवणीकडे कोणीच लक्ष देत नाहीत. माझ्या सर्व प्रतिस्पर्ध्यांचा माझ्यावर होणारा बाणांचा वर्षाव अद्याप अविरत चालूच आहे. आणि महारथी कर्णाप्रमाणे, अधिकाधिक घायाळ होऊन या धर्मयुद्धविरोधी संग्रामात माझी लवकरच आहुति पडणार, असा रंग दिसत आहे.—

● ● ●

अनुक्रमणिका

आपल्या जन्मापासून आपल्याला कळूं लागेपावेतो आपल्या मनावर केले जाणारे अथवां सहजगत्या होणारे संस्कार किती बलशाली असतात, याची मला चांगलीच जाणीव झालेली आहे. हे वाईट की चांगले, अथवा कितपत वाईट आणि कितपत चांगले, हे काटेकोरपणे ठरविणे, मोठमोठ्या पंडितांनाहि अशक्य होते. एक गोष्ट मात्र निश्चित असल्यासारखी दिसते. ती ही की, मानव आणि इतर प्राणी यांच्या निराळेपणाचे व्यवच्छेदक गमक जर कोणते असेल, तर ते इतर प्राण्यांची अत्यंत परिमित अशी संस्कारक्षमता आणि मानवांची जवळजवळ अमर्याद अशी संस्कारक्षमता, हेच होय.––

देशादेशांतील निरनिराळे मानवी समाज निरनिराळ्या प्रकारे संस्कारित झालेले आहेत. या निरनिराळ्या प्रकारच्या संस्कार–साकल्यांना 'संस्कृति' असे नाव देऊन, भारतीय संस्कृति, चीनी संस्कृति, ग्रीक–रोमन संस्कृति, इजिप-शिअन संस्कृति, इस्लामी संस्कृति, युरोपीय संस्कृति, इत्यादि संस्कृतींचे निरनिराळे प्रकार आहेत, असेहि सांगण्यात येते. समाजासमाजांतील व देशदेशा-तील कमी–अधिक तीव्र स्वरूपाचे संघर्ष हे संस्कृतिभेदामुळेच उदयास येत असतात, असेहि कांही विद्वानांचे मत आहे. आणि आजच्या घडीला, लोकशाही संस्कृतीचा पुरस्कार करणारा राष्ट्र–समूह एकीकडे आणि कम्युनिस्ट अथवा सर्वाधिकारशाही संकृतीचा पुरस्कार करणारा राष्ट्र–समूह दुसरीकडे–असा जो जगत्–व्यापी संघर्ष आकारास आला आहे त्याचा जर आणखी एका जागतिक महायुद्धाच्या रूपानें भडका उडाला, तर सारे जग व सारी मानवी संस्कृति भस्म-सात होऊन जाईल, असे मोठमोठे शास्त्रज्ञ व विचारवंत जगाला अट्टाहासाने ओरडून सांगत आहेत.––

या भयानक जागतिक संघर्षाला विसाव्या शतकातील पहिल्या जागतिक महायुद्धापासून, म्हणजे सन १९१४ पासून, प्रारंभ झाला, असे बहुतांश विद्वानांचे मत आहे. जागतिक संघर्षाच्या या ऐन प्रारंभकालीच आमच्या पिढीचे यौवन आकारास येऊ लागले होते. जागतिक संघर्षाचा आरंभ आणि आमचा यौवनारंभ एकाच वेळी घडून यावा, हा एक विलक्षण योगायोगच मानला पाहिजे ! हा योगायोग आमच्या पिढीतील अनेकांच्या हाडीमासी भिनला गेला असल्यास नवल काय ?–

–निदान माझ्या बाबतीत तरी या विलक्षण योगायोगाने माझ्या मनावर फारच सखोल परिणाम केला. इतका की, या जागतिक संघर्षाच्या गाभ्यातच माझी यौवन–कलिका विकसित झाली, असे म्हटल्यास ती मुळीच अतिशयोक्ति होणार नाही.––

आणि या विलक्षण योगायोगाच्या जोडीला, माझ्यावर बालपणापासून केल्या गेलेल्या वा झालेल्या विशिष्ट संस्कारांचीहि भर पडली. किंबहुना, हे संस्कार आधी आणि नंतर त्यावर या जागतिक संघर्षात्मक अशा विलक्षण योगायोगाचा जबर आघात, असाच प्रकार माझ्या बाबतीत घडून आला.—

शेत चांगले नागरून, वखरून, त्याला खतपाणी देऊन तयार करावे आणि वर्षा-ऋतूच्या आरंभी, पावसाच्या सरीमुळे जमीनीत अवश्य तेवढा ओलावा येताच, तीत इष्ट ते बी पेरले जावे, म्हणजे ते शेत योग्य वेळी धनधान्याने जसे समृद्ध झालेले दिसते,— तसेच आमच्या पिढीतील अनेक व्यक्तींचे झाले. भारतीय संस्कारांनी आमच्या मानसक्षेत्रांची भूमि चांगली नांगरली व वखरली गेली; तिला या पुरातन, परंपरागत संस्कारात मुरलेल्या आमच्या वाडवडिलांनी, आपापल्या वकूबानुसार खतपाणी दिले; आमच्या ऐन यौवनारंभकाली आकाशात जागतिक महायुद्धाचे, पाण्याने सरसरलेले काळे कभिन्न मेघ गोळा झाले; आमच्या मानसक्षेत्रांची भूमि, या मेघातून घळघळलेल्या पावसांच्या सरींनीं, पाहिजे तशी ओलींचिब झाली; आणि मग तींत जागतिक संघर्षाचे बी पेरले गेले—

कुठे जागतिक संघर्ष आणि जागतिक महायुद्ध, आणि कुठे एका अगदी सामान्य व यःकश्चित भारतीय युवकाचे उमलते यौवन?— कांही संबंध ? ?

२

रामायण आणि महाभारत ह्या प्रतिभाशाली महाकाव्यांनी आम्हा भारती-यांचे बाल–मानसकोष जेवढे संस्कारित केले गेले, पोसले गेले व प्रभावित झाले आहेत, तेवढे दुसऱ्या कोणत्याहि ग्रंथांनी, विचारांनी वा आचारांनी प्रभावित झालेले नाहीत.

युद्ध म्हणताच ज्याच्या मनासमोर रामायणातील राम–रावण युद्धाची व महाभारतातील कौरव–पांडव युद्धाची चित्रे तरळू लागत नाहीत, असा भारतीय माणूस विरळाच. युद्धाची वा युद्धसदृश घटनांची चर्चा सुरू होताच, तीत रामाचा पक्ष कोणता व रावणाचा पक्ष कोणता, अथवा पांडवांचा पक्ष कोणता व कौरवांचा कोणता— या प्रश्नाला अस्सल भारतीयाच्या अंतःकरणात केंद्रीय स्थान प्राप्त झालेच पाहिजे. आणि रामाचा वा पांडवांचा पक्ष हा सत्पक्ष व न्यायाचा पक्ष आणि रावणाचा वा कौरवांचा पक्ष हा असत्पक्ष व अन्यायाचा पक्ष, असे समीकरणहि निर्विवादपणे गृहित धरले गेलेच पाहिजे. एवढेच नव्हे, तर या युद्धात, वा वाग्युद्धात, सत्पक्षाचा व न्याय्य पक्षाचा जय हा ठरलेलाच आहे— 'सत्यमेव जयते'—

अनुक्रमणिका

अशी श्रद्धाहि आत, आमच्या रोमारोमांत मुसमुसलीच पाहिजे. आम्हा भारतीयांच्या विचारप्रक्रियेचे हे संस्कारजन्य विधिलिखित आहे. भारतीय संस्कृतीच्या हजारो वर्षांच्या अखंडित परंपरेने आम्हाला दिलेले हे वैचारिक वरदान आहे.

हजारो, लाखो, नव्हे, कोटयवधि भारतीयांच्या बावतीत हे वरदान अथवा विधिलिखित आजहि पूर्वीइतकेच प्रभावी आहे. आधुनिक विज्ञानयुगाने वा यंत्रयुगाने भारतावाहेरील जगावर जो काही नवा वैचारिक वा व्यावहारिक प्रभाव पाडला असेल तो असो. पण भारतात मात्र आधुनिक विज्ञानाची आणि विज्ञान-निर्मित यंत्रांची, वस्तूंची वा शस्त्रास्त्रांची चर्चा निघाली, तर सत्य व असत्य, न्याय व अन्याय, ह्या द्वंद्वांच्या संघर्षमय व अभेद्य चौकटीतच या आधुनिक विचारकिमयेचे व वस्तुकिमयेचे मंथन व मूल्यमापन केले जाते. जे असत्य वा अन्याय्य ते, इतर दृष्टीने कितीहि प्रभावी वा प्रगतिशील ठरलेले असो, भारतीय दृष्टीने ते त्याज्यच ठरविले जाईल. भारतावर हजारो वर्षे अखंडित प्रभुत्व गाजविणाऱ्या या वैचारिक व संस्कारजन्य विधिलिखितापुढे अद्याप पावेतो तरी कुणाचीहि मात्रा चाललेली दिसून येत नाही. भौतिक दृष्टया अलीकडील शेकडो वर्षे भारताची सारखी पिछेहाटच होत असलेली दिसून येते. तरीपण अगदी सामान्य भारतीयांचे अंतरंग जरा खरचटून पाहताच, त्यांतून वरील विधिलिखिताने रंगलेले रक्तच बाहेर उसळून आलेले दिसेल.–

माझेहि रक्त याच विधिलिखिताने रंगलेले होते. रामायण–महाभारताचे बाळकडु मलाहि पाजण्यात आलेले होते. ते माझ्याहि रक्तात कायमचे भिनलें गेले होते. पण माझ्या सुदैवाने म्हणा, दुर्दैवाने म्हणा, या रक्तात, मला कळू लागल्यापासून, थोडी विकृति निर्माण झाली. रामाने सुग्रीवाच्या सांगण्यावरून, एका झाडाआड लपून, वालीवर बाण सोडला व त्याचा वध केला, ही घटना रामाच्या लौकिकाशी व त्याच्या आदर्श विभूतिमत्वाशी मला विसंगत वाटली. माझ्या वडीलांना याबाबत मी विचारले असता, माझ्या शंकेचे ते समाधान करू शकले नाही. त्याचप्रमाणे, कर्णाच्या रथाचे एक चाक ऐन आणीबाणीच्या प्रसंगी भूमीत रुतून बसले असता व त्याने, ' रथचक्र उद्धरूं दे श्रुतिशास्त्रज्ञा, महारथा कुलजा' अशी श्रीकृष्णार्जुनाला विनवणी केली असताहि, श्रीकृष्णार्जुनांनी ती दुर्लक्षून कर्णावर बाणाचा वर्षाव चालू ठेवला व त्याला गतप्राण केले,– ही घटनाहि मला अन्याय्य व धर्मयुद्धनीतीशी विसंगत वाटली. प्रभु रामचंद्र व भगवान् श्रीकृष्ण यांच्या ज्या भव्योदात्त मूर्ति माझ्या बालमनावर कोरल्या गेल्या होत्या, त्या ह्या शंकांनी किंचित्शा भंगून जाऊ लागल्या.–

पुढे पुढे तर मला कर्णाच्या व्यक्तित्त्वाचे इतके काही आकर्षण वाटू लागले

की, महाभारतातील सर्वात धीरोदात्त व्यक्तिमत्व कोणाचे, असे मला विचारले असता, मी तात्काळ उत्तर देई, 'महारथी कर्णाचे'!

भारतीय संस्कारसाकल्याचे जे विशाल कवच माझ्या बालमनाभोवती निर्माण केले गेले होते त्याला या माझ्या शंकेखोरपणामुळे एक लहानशी चीर पडली. माझे मन या चीरेतून बाहेरचे काही दिसते का, हे पाहण्यासाठी धडपडू लागले. भारतीय संस्कारसाकल्याच्या पलीकडील क्षितिजे संशोधिण्याची ओढ माझ्या मनाला लागली.–

● ● ●

अनादि परंपरेच्या प्रवाहाबरोबर वाहत आलेले कौटुंबिक व सामाजिक संस्कार मानवाच्या मानसकोषाभोवती अंतिम मर्यादेची एक रेषा काढून ठेवतात. ही रेषा ओलांडणे म्हणजे संकटात उडी घेणे होय, असे मानले जाते. या अंतिम रेषेने आखून दिलेल्या मर्यादेच्या आत तुम्हाला वाटेल ते करण्याचे स्वातंत्र्य असते. पण, ही सीमा–रेषा उल्लंघून पलीकडे जाण्याचे धाडस जो करील तो '**एकाकी** होईल, वाळीत टाकला जाईल आणि मग त्याला कोणीहि वाली उरणार नाही. एकाकी, एकटा, ना कुटुंब ना समाज, अशी त्याची गत होऊन जाईल.–

प्रभु रामचंद्राच्या वनवासाच्या काळात सीतेला कांचनमृग दिसला. तिला तो हवासा वाटला. त्याची शिकार करण्यास रामाला तिने प्रवृत्त केले. कारण तिला त्या कांचनमृगाच्या हिरण्मय चर्माची कंचुली, एका अनिवार आवेगामुळे एकाएकी हवीशी वाटू लागली होती. रामाने तिला सांगितले 'अग, हा तुझा भ्रम आहे. तो कांचनमृग खरा नाही. प्रकृतीनं कांचनाचा मृग निर्माणच केला नाही." पण सीतेला ते पटले नाही. कारण तिच्या डोळ्यांना तो कांचनमृग प्रत्यक्ष दिसत होता. प्रत्यक्षावर अविश्वास ठेवणे तिला, अचानक हव्यासाच्या आवेगामुळे, अशक्य झाले. तिने आपला हट्ट चालूच ठेवला. रामाचा नाइलाज झाला. सीतेच्या रक्षणाची जबाबदारी लक्ष्मणावर सोपवून राम धनुष्य घेऊन कांचनमृगाची शिकार करण्यास निघून गेला. काही वेळाने एक किंकाळी ऐकू आली. सीतेला वाटले राम संकटात सापडला. तिने लक्ष्मणाला रामाच्या साहाय्यार्थ धावून जाण्यास सांगितले. लक्ष्मणाला रामाच्या शौर्याची पूर्ण कल्पना असल्यामुळे, ती किंकाळी रामाची नसून तो एक आभास आहे, असे त्याने सीतेला वारंवार सांगितले. पण सीतेचे काही केल्या समाधान होईना. तिला पुनःपुन्हा ती किंकाळी ऐकू आल्यामुळे तिचे चित्त अधिकच व्यथित झाले. तिने लक्ष्मणावर वाग्बाणांचा वर्षाव सुरू केला. लक्ष्मणाच्या वर्मावरहि प्रहार करण्यास तिने मागेपुढे पाहिले नाही. अखेरीस मोठ्या नाइलाजाने सीतेला सोडून रामाच्या शोधार्थ जाण्यास तो तयार झाला.

पण एका अटीवर. त्याने पर्णकुटीच्या सभोवताली एक रेषा काढली व काय वाटेल ते झाले तरी त्या रषेचे उल्लंघन आपण करणार नाही, असे अभिवचन देण्यास सीता तयार असली तरच रामाच्या शोधार्थ आपण जाऊ, असे त्याने सीतेला निक्षून सांगितले. सीतेने ते सान्य केले आणि म्हणून तिला सोडून तो रामाच्या शोधार्थ निघून गेला.

ती '**लक्ष्मणाची रेषा**' आम्हा भारतीयांच्या सांस्कृतिक विधिलिखिताची प्रतीक बनली. कांचनमृगाने निर्माण केलेल्या भ्रमाच्या आहारी जाऊन सीतेने त्या मर्याद–रेषेचे उल्लंघन करताच, राम–सीता–जीवनातील भयानक संकटपरंपरेला प्रारंभ झाला. एवढेच नव्हे, तर सीतेचे कपटाने हरण करणाऱ्या रावणाचा वध झाल्यानंतरहि ही संकटपरंपरा संपुष्टात येऊ शकली नाही. तिच्या शुद्ध चारित्र्या बावत संशयाचे ढग जनमनात वावरत आहेत असे दिसून येताच रामाला लोकाराधने- साठी पाषाण हृदय बनून, लक्ष्मणाच्याच हाताने सीतेची वनवासात रवानगी करावी लागली. आणि शेवटी, अग्निदिव्यातून यशस्वीरीतीने बाहेर आल्यावरहि सीतेला भूमातेच्या कुशीतच कायमचे गडप होऊन जावे लागले.– –'**लक्ष्मणाच्या रेषे**'चे उल्लंघन करणाऱ्या सीतेची ही करुण कहाणी भारताच्या घराघरात व झोपडीझोपडीत अश्रुपूर्ण नयनांनी अद्यापहि सांगितली जाते.–

३

रामायण आणि महाभारत यांतील कथांनी व प्रमेयांनी भारतीयांच्या जीवनाला एक सीमा–रेषा घालून दिलेली आहे. तीच '**लक्ष्मणाची रेषा**' म्हणून ओळखली जाते. या रेषेचे उल्लंघन करणे म्हणजे कधीहि न संपणाऱ्या संकटपरंपरेला आमंत्रण देणे होय. रामाने लपूनछपून केलेला वालीचा वध आणि कृष्णार्जुनाने, कर्ण असहाय स्थितीत सांपडला असता त्याचा केलेला वध, योग्य की अयोग्य, नैतिक की अनैतिक, न्याय्य की अन्याय्य, अशी शंका मनांत येणे आणि तिचे निरसन कोणीहि करूं शकला नाही म्हणून त्या घटनांबावत प्रभु रामचंद्र व भगवान् श्रीकृष्ण यांच्याविषयी जरा अश्रद्ध वृत्ति धारण करणे, यांत आपण काही गैर करीत आहोत, असे मला त्यावेळी मुळीच वाटले नाही. उलट, आपण स्वतंत्र बुद्धीचे आहोत, याचा मला अभिमानच वाटूं लागला. आणि म्हणून '**लक्ष्मणाच्या रेषेचे**' आपण उल्लंघन करीत आहोत अशी कल्पनाहि माझ्या मनाला त्यावेळी शिवली नाही. पण अज्ञानाने जरी अग्नीला स्पर्श केला तरी अंग भाजल्याशिवाय जसे राहत नाही, तसेच 'लक्ष्मणाची रेषा' अज्ञानाने वा भ्रमाने जरी उल्लंघिली गेली तरी अनंत संकट परंपरेचे विधिलिखित त्यामुळे टाळले जाऊं शकत नाही.

अनुक्रमणिका

माझ्या जीवनरथाचे एक चाक, महारथी कर्णाच्या रथाच्या चाकाप्रमाणे, ऐन आणीबाणीच्या वेळी, भुईत रुतून बसले आहे. आणि महारथी कर्णाच्या आयुष्याची जी गत झाली तीच माझ्याहि आयुष्याची होणार, हे मला स्पष्ट दिसू लागले आहे. आणि तरीहि कर्णाच्या व्यक्तिमत्वाबाबत मला बालपणापासूनच जे आकर्षण वाटू लागले त्यात रेसभरहि फरक पडलेला नाही.—

● ● ●

कुंतीचे कुमारवयात सूर्यावर प्रेम जडले. तिच्या प्रीतीची उत्कटता पाहून सूर्य प्रसन्न झाला. त्याने मानवरूप धारण करून गुप्तपणे कुंतीची प्रीति सफलित केली. आणि मग तो अंतर्धान पावला.— पण कुंतीला लवकरच कळून आले की, आपण अविवाहित आहोत आणि कुमारिकेच्या अवस्थेतच आपल्याला गर्भ राहिलेला आहे. ती घाबरली. रानावनात वेड्यासारखी हिंडू लागली. रानातच ती बाळंत झाली. पण अविवाहित स्थितीत मूल उघडपणे जवळ ठेवणे तिला भयावह वाटले. तिने ते मूल एका टोपलीत घातले; पानाफुलांनी ते झाकून टाकले आणि मग ती टोपली तिने गंगेच्या प्रवाहात सोडून दिली. वाहता वाहता ती एका सूतपत्नीला गवसली. तिला मूलबाळ नव्हते. देवानेच आपल्याला मूल दिले, असे मानून तिने ते मूल वाढविले. तोच ‘सूतपुत्र’ पुढे ‘महारथी कर्ण’ म्हणून ओळखला जाऊ लागला.

सूतपुत्र म्हणून त्याला धनुर्विद्या शिकविण्यास त्या काळी कोणी तयार होईना. कारण ती ब्राह्मणांची व क्षत्रियांचीच मिरास होती. कर्णाला कळले की, जगज्जेता परशुराम हा केवळ ब्राह्मणपुत्रांनाच धनुर्विद्या शिकवितो. म्हणून ब्राह्मणपुत्राचा वेष धारण करून जगत्‌जेत्या परशुरामाकडे तो गेला व धनुर्विद्या शिकू लागला. धनुर्विद्येत विलक्षण वेगाने तो निष्णात होत आहे हे पाहून परशुरामाला मोठा अचंबा वाटू लागला. आणि अधिक प्रसन्न होऊन त्याने कर्णाला बहुतांश विद्या शिकविली. पण सरतेशेवटी कर्णाच्या दुर्दैवाने त्याच्या गुप्तवेषाचा घडा फोडलाच. आणि तोहि अगदी विलक्षण रीतीने.

एके दिवशी परशुराम कर्णाच्या मांडीवर डोके ठेवून निजला. त्याला गाढ झोप लागली. इतक्यात एक भुंग्यासारखा प्राणी कर्णाच्या मांडीखाली आला व त्याला चावू लागला. त्याच्या मांडीतून रक्त वाहू लागले. पण मांडी हलवावी तर गुरुजींची झोप मोडेल, ते रागावतील व आपल्याला शाप देतील ही भीति; व न हलवावी तर भुंगा मांडी किती पोखरेल व किती रक्तस्राव होईल याचा काहीं नेम नाही.— अशा पेचात तो सापडला. मांडीला अनावर वेदना होत होत्या, तरीपण गुरुजींची मर्जी सांभाळणे अधिक महत्वाचे मानून, त्याने त्या सर्व वेदना निमुटपणे सहन केल्या. मांडीतून घवघव रक्त वाहत होते तरी डोळ्यांतून अश्रूंचा

एक थेंबहि त्याने गळू दिला नाही. रक्त आणि अश्रू यांच्यावर मात करणारे धैर्य हेंच शौर्याचे खरे अधिष्ठान होय.–

बऱ्याच वेळाने गुरुजी जागे झाले. डोळे उघडून पाहतात तें, कर्णाच्या मांडीखालून रक्ताचा पूर लोटलेला. आणि तरीहि कर्ण ते सारे धैर्याने सहन करीत आहे ! कोणताहि सहृदय गुरु असता तर शिष्याची ही विलक्षण गुरुभक्ति पाहून तो प्रसन्नच झाला असता आणि कर्णाला एखादा वर मिळाला असता. पण वर मिळण्याऐवजी दुर्दैवी कर्णाला शाप मिळाला.

परशुरामाने विचारले, "तू कोण आहेस बोल ?– तू ब्राह्मणपुत्र खास नाहीस. कारण ब्राह्मणपुत्रांत एवढी विलक्षण सहनशक्ति सापडणे अशक्य. बोल तू कोण आहेस ?"

कर्णाला सत्य सांगणे भागच पडले. आपल्याला फसवून कर्णाने आपली विद्या घेतली हे पाहून परशुरामाने त्याला शाप दिला की, 'ऐन आणीबाणीच्या वेळी तुझ्या रथाचे चाक भुईत अडकून पडेल आणि त्यामुळे मी दिलेली विद्या युद्धात तुला यशस्वी करूं शकणार नाही.'

एवढ्यावरच कर्णाची विधिगति थांबली नाही. भारतीय महायुद्ध टाळता येणे अशक्य आहे, असे श्रीकृष्णाला आपल्या असफल शिष्टाईनंतर दिसून येताच, पांडवांचा विजय निश्चित करण्याच्या हेतूने त्याने एक डाव रचला. कौरवाच्या सैन्याचे भीष्म–द्रोणादि अतुलनीय योद्धे सेनापत्य करणार, हे ठरलेलेच होते. पण त्याचे श्रीकृष्णाला एवढे भय वाटत नव्हते. कारण शरीराने जरी ते कौरवपक्षाचे झाले होते, तरी मनाने ते पांडवांचेच पक्षपाती होते, हे श्रीकृष्णाला माहित होते. पण कर्णाचे तसे नव्हते. महारथी कर्ण हा अर्जुनाचा कट्टा द्वेष्टा होता. या द्वेष–भावनेवरच कौरवपक्षाची उभारणी झाली होती. म्हणून श्रीकृष्णाला खरी भीति केवळ महारथी कर्णाचीच वाटत होती. कर्णाचा पराभव अर्जुनाला देखील करता येणे शक्य नाही, हे श्रीकृष्ण जाणून होता. आणि त्याला हेहि माहीत होते की, कर्ण हा सूतपुत्र नसून सूर्यपुत्र आहे. सूर्याने आपल्या प्रीतिपुत्राला कवच–कुंडलासहित जन्माला घातले, हेहि त्याला माहित होते; आणि कर्णाच्या अंगावर ही कवच– कुंडले जोवर आहेत तोवर तो अवध्य आहे, याची जाणीव श्रीकृष्णाला होती. म्हणून कर्णाची ही कवचकुंडले हरण करण्यासाठी श्रीकृष्णाने एक डाव रचला.

कर्णाची शौर्याबद्दल जशी ख्याति होती तशीच त्याची औदार्याबद्दलहि ख्याति होती. शौर्य आणि औदार्य यांच्या अखंड व अभेद्य साहचर्याशिवाय माणसाला खरी वीरता प्राप्तच होऊ शकत नाही. औदार्यशून्य शौर्य, हे शुद्ध रानटी क्रौर्य असते. औदार्यपूर्ण शौर्य, हेच मानवी वीरतेचे निश्चयात्मक असे

गमक असते. या दृष्टीने विचार करता, कर्णासारखा वीर पुरुष समग्र महाभारतात, नव्हे, समग्र मानवी इतिहासात, दुसरा कोणताहि आढळणार नाही.

औदार्यामुळेच शौर्याला तेज चढत असते. ज्याला आपल्या शौर्याबद्दल आत्यंतिक आत्मविश्वास वाटत असतो तोच हीनदीनांची वा अन्य कोणाचीहि वाटेल ती याचना लीलेने पुरी करण्यास यत्किंचित्हि डगमगत नाही. कारण याचकाला आपले सर्वस्व देऊन टाकण्याचा प्रसंग आला, तरी आपल्या शौर्याच्या बळावर ते सर्व पुन्हा प्राप्त करून घेण्याची धमक शूर पुरुषात असते. आणि म्हणूनच तो जात्याच उदार असतो. औदार्य, असामान्य व अमर्याद औदार्य, ही अस्सल शौर्याची अविभक्त व अंगभूत अशी दुसरी बाजू असते. वीरतेच्या नाण्यावर एका बाजूला शौर्याचा ठसा असतो व दुसऱ्या बाजूला औदार्याचा.

अति कुशाग्रबुद्धीच्या श्रीकृष्णाला या सर्व गोष्टींची पुरेपूर माहिती होती. म्हणून त्याने एका हीनदीन व अत्यंत दरिद्री ब्राह्मणाचे सोंग घेतले व त्या वेषात तो कर्णाकडे गेला. ब्राह्मणाला तो मागेल ते दान देणे, ही त्याकाळी अत्यंत पुण्यशील अशी गोष्ट मानली जात होती. कर्ण आधीच उदार आणि त्यात त्याच्या समोर एका दरिद्री ब्राह्मणाची याचना– अशा स्थितीत कर्णाच्या जातिवंत औदार्याला ऊत आला असल्यास नवल काय ? पण हा ब्राह्मण हीनदीन व दरिद्री दिसत असला तरी सामान्य ब्राह्मण नव्हता व त्याची याचनाहि धनधान्यासारख्या सामान्य वस्तूबाबत नव्हती, याची बिचाऱ्या कर्णाला काय कल्पना ? शौर्य आणि औदार्य यांनी युक्त असलेल्या वीरतेला कपट कधीहि दिसूच शकत नाही.

" कोण तू ? " कर्णाने त्याला विचारले.

" मी एक गरीब ब्राह्मण आहे "– श्रीकृष्णाने उत्तर दिले.

" काय पाहिजे तुला ? "

" मला काय पाहिजे ?" एक दीर्घ सुस्कारा सोडून श्रीकृष्ण म्हणाला. " मला जे पाहिजे ते तुम्ही देखील मला देऊ शकत नाही, हे मला माहीत आहे आणि तुम्ही तरी ते मला काय म्हणून द्यावे ? आणि तरीहि एका विचित्र व्रताची सांगता करण्याकरता मला तुमच्याकडे धाव घ्यावी लागली, तुमच्या अतुल औदार्याच्या धवल कीर्तीने मी हे साहस केले, पण जाऊ द्या.– "

पुन्हा एक दीर्घ सुस्कारा श्रीकृष्णाने सोडला. कर्णाला तो आपल्या वर्मावरच घाव आहे असे वाटले.

" कर्णाकडे आलेला कोणताहि याचक कधीहि विन्मुख होऊन परत जात नसतो. बोल तुला काय पाहिजे. ? "

आणि हे शब्द ऐकताच ब्राह्मणरूपी श्रीकृष्णाने कवच– कुंडलाची याचना केली. एका क्षणाचाहि विलंब न करता कर्णाने आपले खड्ग उपसले व आपली कवच–कुण्डले सपासप छाटून टाकून ती ब्राह्मणाच्या पदरात टाकली ! –

● ● ●

' सूर्यपुत्र ' म्हणजे देवपुत्र असताहि कौमार्यावस्थेत कुंतीच्या पोटी जन्माला आला म्हणून कर्ण बेवारशी झाला व ' सूतपुत्र ' म्हणून व्यावहारी जगात ओळखले जाण्याचा प्रसंग त्याच्यावर आला. यात कर्णाचा काय दोष?– सूतपुत्र म्हणून धनुर्विद्या शिकण्यास समाजाने त्याला अपात्र ठरविले; म्हणून ब्राह्मणपुत्राचे सोंग घेतले व आपल्या रक्ताची गुरुदक्षिणा देऊन आपल्या गुरूला प्रसन्न करण्याचे दिव्य त्याने केले व अशा रीतीने त्याने धनुर्विद्या संपादन केली; आणि तरीहि शापित होऊनच ती विद्या त्याच्या पदरी पडली. यात कर्णाचा काय दोष ? आणि शेवटी, आपल्या अभिजात शूरतेला व वीरतेला साजेसा औदार्याचा वाणा अकलंकित राहावा म्हणून त्याने आपल्याच हाताने, आपले शरीर अवध्य ठेवणारी निसर्गदत्त अशी आपली कवचकुंडले कापून काढली व ती एका ब्राह्मण याचकाच्या पदरात टाकली, यात तरी त्याचा काय दोष ?– जगात देव असता, सत्य असते व न्याय असता, तर आपल्या गुरुजीचा निद्राभंग होऊ नये म्हणून आपल्या रक्ताचे दान करणाऱ्या कर्णाला परशुरामाने शाप देण्याऐवजी वरच दिला असता; आणि आणीबाणीचे महायुद्ध जवळ येऊन ठेपले असताहि, आपले शरीर अवघ्य ठेवणाऱ्या कवच–कुंडलांचेहि लीलेने दान करणाऱ्या उदार कर्णाला श्रीकृष्णाने आपल्या पोटाशीच घेतले असते !

● ● ●

रामायण– महाभारत आणि गीता यांचे संस्कार बालपणापासून माझ्या नसनसांत मुरले गेले असताहि आणि त्यांच्या अभिमानाने माझा मानसपिंड पोसला गेला असताहि, महारथी कर्णाला झालेल्या अन्यायाचे शल्य माझ्या अंतःकरणाला सतत बोचत राहिले. आणि या शल्यामुळे मला वाटू लागले, की विशाल व भव्योदात्त अशा भारतीय संस्कृतीची दिव्य कवच कुंडले कर्णाच्या कवच–कुंडला-बरोबरच कापली गेली. या भयानक विचार–तरंगाने माझ्या मनात कायमचे ठाण मांडले !

या विचार– तरंगामुळे माझ्या जीवनाला जी दिशा मिळाली, त्या दिशेने एकाकी प्रवास करता करता, अखेरीस मी आज या दशेला आलो आहे. माझ्या जीवनरथाचे एक चाक महारथी कर्णाच्या रथाच्या चाकाप्रमाणे, ऐन आणीबाणीच्या वेळी भुईत रुतून बसले आहे. आणि ते चाक वर काढण्यात मी गुंतलो असता माझ्यावर चौफेर बाणांचा वर्षाव सुरू आहे.

भारतीय संस्कृतीने घालून दिलेली **'लक्ष्मणाची रेषा'** ओलांडण्याचे मी साहस केले. पण ही रेषा ओलांडणाऱ्या व त्याचे प्रायश्चित्त म्हणून अग्निदिव्य करून दाखविणाऱ्या सीतामाईला देखील अखेरीस या जगाला 'रामराम' ठोकावा लागला व भूमातेच्या कुशीचाच आश्रय घ्यावा लागला. मी तर एक यःकश्चित मानव. 'लक्ष्मणाची रेषा' ओलांडण्याचे साहस करून अनंत व अखंड संकटपरंपरा मी माझ्या जीवनावर ओढवून घेतली. सांस्कृतिक विधिलिखिताच्या मर्यादित राहणाऱ्या व्यक्तींनाच उज्ज्वल भवितव्याची आशा करण्याचा अधिकार प्राप्त होऊ शकतो. 'लक्ष्मणाची रेषा' उल्लंघन करणाऱ्याच्या पदरी संकटपरंपरेच्या अखंड श्रेणीपरता दुसरे काय पडणार ?— (क्रमशः)

* * *

अपरात्रीच्या जांभईमधे....

अपरात्रीच्या जांभईमधे
सेकंदाचा फिरटा काटा
सुटुन तबकडीमधून बनतो
राडाराचा फिरता फाटा . . .

अपरात्रीच्या जांभईपुढे
घड्याळ पसरे जगड्व्याळ मुख
मिनिटांच्या नालबंद टापा
दौडत हाणिति ठोकर ठक् ठक् . . .

अपरात्रीच्या जांभईतुनी
या खिडकीची सीमा सरते
इटुकल्याच बिस्तरी दिव्याचे
खोलीभर हे ऊन्ह पसरते

अपरात्रीच्या जांभइतिल मी—
विराट् सावलिस माझ्या भीतो
अन् मच्छरदाणीच्या एका—
भोकातील कीटाणू बनतो . . .

—रा. अ. काळेले

अनुक्रमणिका

मृत्युंजया

बुडती घागर
बुडबुड बुडली
यमुनाजळी
बेभान जाहली . . .

बिंदूबिंदू गळा बिलगता
मानससिंधू कृतार्थ झाला
ब्रह्मानंदरता डोलू लागता
मुरलीचा सुर कानी आला . . .

वळेच घुमला
दरद दिवाण्या
खुळ्या मिरेला
बाधला . . . बाधला . . .

चिरंतनाचा छंद लागला
चराचरातच कृष्ण गवसला ! . . .

हलाहलाच्या
प्याल्यामधल्या
तिच्या प्रतिमा
तिलाच हसल्या . . .

लाज कुणाकुणाची . . . जनामनाची . . .
ती तर दासी घननीळाची
गिरिधरावरी तिचा हवाला
मृत्युंजयेला देव पावला

जालिम प्याला
सुधारूप झाला . . .

—श्याम सोनारे

संघवार्ता

प्रा. श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ याजकडून—

साधारण सभा—

वि. सा. संघाची साधारण सभा रविवार दि. ९-१०-६० रोजी दुपारी ४-३० वाजता श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षतेखाली होऊन तीत पुढील कार्यवाही करण्यात आली.

१. १९५९-६० चा आयव्ययाचा ताळेबंद तक्ता मंजूर करण्यात आला.

२. वि. सा. संघाच्या घटनेतील कलम २, कलम ४ (आ), कलम १० (ऊ) व कलम १९ (अ) यामध्ये 'मध्यप्रदेश' शब्दाऐवजी 'विदर्भ' शब्द घालण्यात आला.

३. वि. सा. संघाच्या घटनेतील कलम १० (अ) मध्ये 'एप्रिल ३०' ऐवजीं 'जुलै ३१' असे शब्द घालण्यात आले.

४. मिरज येथे तयार करण्यात आलेल्या मराठी साहित्य महामंडळाच्या आराखड्याला सर्वानुमते स्वीकृति देण्यात आली व महामंडळाच्या स्थापनेला मान्यता देण्यात आली.

केंद्रीय कार्यकारी मंडळाची सभा—

वि. सा. संघाच्या केंद्रीय कार्यकारी मंडळाची सभा रविवार दि. ९-१०-६० रोजी सकाळी ८-३० वाजता संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षतेखाली होऊन तीत पुढील प्रमाणे मुख्य कार्यवाही करण्यात आली.

१. सहामाही कार्यवृत्त व अर्थवृत्त स्वीकृत करण्यात आले.

२. विदर्भ साहित्य संघाचे वार्षिक अधिवेशन यंदा वणी येथे घेण्यास मान्यता देण्यात आली व संमेलनाध्यक्ष पदासाठी पुढील तीन नावे सुचविण्यात आली. १ कविभूषण प्रा. ब. ग. उर्फ अण्णासाहेब खापर्डे, २. प्रा. डॉ. ग. त्र्यं. देशपांडे, ३. श्री. कवि गु. ह. देशपांडे. वणी येथील स्वागत मंडळ यातून एकाची निवड करील.

३. महात्मा ज्योतिबा फुले यांचे तैलचित्राच्या देणगीचा स्वीकार करून ते संघमंदिरात लावण्यात यावे असे ठरले.

श्रीशारदोत्सव–

दरवर्षीप्रमाणे यंदाहि दि. २७ आक्टोबर ते दि. ४ नोव्हेंबर पर्यंत शारदोत्सव साजरा झाला.

मंगळवार दि. २७-९-६० रोजी सायंकाळी ६ वाजता संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे हस्ते पुस्तकरूपी शारदेचे पूजन झाल्यावर श्री. गाडगीळ शास्त्री यांनी सरस्वतीसूक्त म्हटले. त्यानंतर म. म. डॉ. वा. वि. मिराशी यांनी विदर्भातील लेखकांच्या पुस्तकप्रदर्शनाचे उद्‌घाटन केले. नंतर डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली प्रा. श्री. भा. वर्णेकर यांचे "आधुनिक संस्कृत साहित्य" या विषयावर भाषण झाले.

बुधवार दि. २७-९-६० रोजी सायं. ६-३० वाजता श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली हिंदीचे श्रेष्ठ कादंबरीकार श्री. अ. गो. शेवडे यांचा पुष्पहार घालून आणि श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे आणि पं. हृषीकेशजी शर्मा यांनी श्री. शेवडे यांच्या हिंदी साहित्यातील कार्याचा परिचय करून दिला. यानंतर आधुनिक 'हिंदी कादंबरी' या विषयावर श्री. अ. गो. शेवडे यांनी हिंदी भाषेतून सुश्राव्य व्याख्यान दिले.

शनिवार दि. १-१०-६० रोजी सायं. ६-३० वाजता श्री. पु. य. देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली श्री. प्रा. व्ही. नागराजन् आणि मद्रासच्या "हिंदू" दैनिकाचे सहसंपादक श्री. व्ही. के. नरसिंहन् यांची 'तामीळ साहित्य' या विषयावर भाषणे झाली.

त्याच दिवशी रात्री ९ वाजता रविनगर येथील महिला कलाकारांनी वृंद-वादनाचा कार्यक्रम सादर केल्यावर सौ. विमलबाई देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली महिला कविसंमेलन झाले. या कार्यक्रमाचे संयोजन– सौ. उषाताई लिमये यांनी उत्कृष्टपणे पार पाडले. या संमलेनात खालील कवयित्रींनी भाग घेतला–

सौ. विमलाबाई देशपांडे सौ. प्रमिला भागवत सौ. शांताबाई दंडिगे सौ. उषाताई लिमये, कु. दुर्गा कानगो, डॉ. पद्मावतीबाई येरगावकर, सौ. तारा भिडे, सौ. अनुराधा परांडे आदि.

रविवार दि. २-१०-६० रोजी सायं. ६-३० वाजता "मराठी साहित्यातील नवप्रवाह" या विषयावर प्रा. भा. श्री. परांजपे आणि प्रा. श्री. मा. कुळकर्णी यांची भाषणे झाली.

सोमवार दि. ३-१०-६० रोजी सायं. ६-३० वाजता प्रा. आर. सी. गुहा

अनुक्रमणिका

यांचे श्री. शं. वा. शास्त्री याचे अध्यक्षतेखाली "बंगाली साहित्याची वाटचाल" या विषयावर इंग्रजी भाषेत सुश्राव्य व्याख्यान झाले.

मंगळवार दि. ४-१०-६० रोजी सायं. ६-३० वाजता प्रा. वा. कृ. चोरघडे यांचे अध्यक्षतेखाली श्री. मोहनलालजी भट्ट, मंत्री राष्ट्रभाषा प्रचार समिति वर्धा, यांचे 'आधुनिक गुजराती साहित्याची वाटचाल' या विषयावर माहितीपूर्ण व्याख्यान झाले.

रात्रौ ९ वाजता विविधभाषी कविसंमेलनाचा कार्यक्रम झाला. या कवि-संमेलनात श्री. श्रीकान्त देसाई, श्री. प्रभाकर उघडे, श्री. वामन पाठक आणि आणि प्रा. श्री. गो. काशीकर यांनी भाग घेतला.

कै. न्या. मू. म. गो. रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धा, विदर्भ विभाग--

मागील वर्षाप्रमाणे या वर्षी दि. १६, १७ आणि १८ सप्टेंबर १९६० रोजी विदर्भ साहित्य संघाचे वतीने विदर्भ विभागासाठी कै. न्या. मू. म. गो. रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धा आयोजित करण्यात आली. या वादस्पर्धेत एकूण १७ महाविद्यालयांनी आपले संघ पाठविले होते.

दि. १८-९-६० रोजी सायं. ७ वाजता स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला. बक्षीस समारंभ श्री. बाळासाहेब ढवळे उपाध्यक्ष वि. सा. संघ यांचे हस्ते करण्यात आला. या स्पर्धेसाठी ठेवण्यात आलेली फिरती 'रौप्यढाल' नागपूर महाविद्यालयाच्या श्री. मनोहर शेळके आणि कु. माया साठे या विद्यार्थ्यांनी मिळविली. वादस्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणारे श्री. बी. टी. देशमुख विदर्भ महाविद्यालय, अमरावती यांना १०० रु. चे बक्षिस देण्यात आले, व श्री. व्ही. डब्ल्यु. बापट, एस्. बी. सिटी कॉलेज, नागपूर यांचा दुसरा क्रमांक आल्याबद्दल रु. ७५ चे बक्षिस देण्यात आले.

या वादस्पर्धेचे वेळी तीनहि दिवस परीक्षक म्हणून श्री. मो. अ. बंबावाले, उपसंचालक शिक्षण विभाग नागपूर, सौ. सुशीलाबाई मोहनी आणि ॲडव्होकेट श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी काम केल्याबद्दल विदर्भ साहित्य संघ त्यांचा अत्यंत आभारी आहे. नागपूर आकाशवाणीने दि. १८-९-६० रोजी रात्रौ ९ वाजता वादस्पर्धेचा अहवाल ध्वनिक्षेपित केला. याबद्दल विदर्भ साहित्य संघ नागपूर आकाशवाणीचा अत्यंत आभारी आहे.

अनुक्रमणिका

सत्कार व भेटी–

दि. ४ सप्टेंबर १९६० रोजी दुपारी ४ वाजता केंद्रीय सरकारचे रेल्वे मंत्री माननीय श्री. बाबू जगजीवनरामजी यांनी विदर्भ साहित्य संघाला भेट दिली. यावेळी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी त्यांना संघमंदिर आणि धनवटे रंग मंदिर दाखविले. यानंतर पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले. यावेळी अल्पोप-हाराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. उत्तरादाखल भाषण करतांना माननीय श्री. बाबू जगजीवनराम यांनी असे उद्गार काढले की, " साहित्यिकांनी बंधुत्व व मानवतावादाला प्रोत्साहन द्यावे आणि संतवाङ्मयाचे संशोधन करावे, असे मला वाटते. ज्ञानेश्वर व तुकाराम यांनी जो आध्यात्माचा ठेवा दिला आहे तो आपण चांगला जतन करून वाढीला लावला पाहिजे. हे कार्य विदर्भ साहित्य संघ करील अशी माझी अपेक्षा आहे." या कार्यक्रमाला वि. सा. संघाचे कार्यकारी सभासद आणि इतर निमंत्रित पाहुणे उपस्थित होते.

शनिवार दि. १७-९-६० रोजी वि. सा. संघाला सुप्रसिद्ध साहित्यिक आणि महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्री. ना. गो. चाफेकर यांनी भेट दिली. यावेळी संघमंदिर आणि रंगमंदिर पाहून त्यांनी संघाच्या कार्याविषयी समाधान व्यक्त केले. संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी त्यांचे पुष्पहार घालून स्वागत केले.

बुधवार दि. २१-९-६० रोजी औरंगाबाद येथील सरकारी कॉलेजचे प्राचार्य डॉ. माधव गोपाळ देशमुख यांनी अनौपचारिकरीत्या विदर्भ साहित्य संघाला भेट दिली. यावेळी चिटणीस श्री. य. गो. मालोदे यांनी त्यांना रंगमंदिर दाखविले. रंगमंदिर पाहून 'सामान्य जनतेच्या पैशातून उभारले गेलेले हे रंगमंदिर भारतातील सर्व प्रथम होय' असे त्यांनी उद्गार काढले.

शनिवार दि. १ ऑक्टोबर ६० रोजी सायं. ६ वाजता 'हिंदु' (मद्रास) दैनिकाचे सहसंपादक श्री. व्ही. के. नरसिंहन् यांनी वि. सा. संघाला भेट दिली.

रविवार दि. ९-१०-६० रोजी यवतमाळ येथील अमोलकचंद महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. ना. बा. पराडकर यांनी वि. सा. संघाला भेट दिली. यावेळी रंगमंदिर पाहून त्यांनी आनंद व्यक्त केला. यावेळी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले.

सुप्रसिद्ध कवि आणि वनस्पतीशास्त्रज्ञ प्रा. श्री. बा. रानडे यांनी दिनांक १३–१०–६० ला वि. सा. संघाला भेट दिली. संघमंदिर आणि रंगमंदिर पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले.

देणगी–

वि. सा. संघाच्या ग्रंथालयासाठी श्री. बाळासाहेब डवळे, उपाध्यक्ष वि. सा. संघ यांनी फिरती लाकडी आलमारी देणगी दिल्याबद्दल वि. सा. संघ त्यांचा आभारी आहे

वि. सा. संघातर्फे मदत–

टी. बी. आफ्टर केअर सेंटर, नागपूर या संस्थेच्या मदतीसाठी वि. सा. संघाने रु. ५० देणगी म्हणून दिले.

नवीन आजीव सभासद–

श्री. गोविंददास रतनलाल भाटीया, खामगाव, ५० रु.

शाखावृत्त

गोंडवण शाखा–चंद्रपूर (चांदा)

दि. २८ ऑगस्ट ६० रोजी गोंडवणशाखा चंद्रपूर येथील नवनिर्वाचित सदस्यांची बैठक शाखाध्यक्ष श्री. भ. सो. खणके यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सुरुवातीला वि. सा. संघाचे एक चिटणीस सा. भू. तु. ना. काटकर यांचे मार्गदर्शपर भाषण झाल्यावर गोंडवण शाखेचे खालीलप्रमाणे पदाधिकारी निवडण्यात आले.

उपाध्यक्ष– डॉ. तु. वि. पत्तीवार,

कोषाध्यक्ष– श्री. सौ. ग. उपाख्य बाबासाहेब धारणे

सरचिटणीस– श्री. पु. ह. धनकर

सांकृतिक कार्यक्रम समितीचे आमंत्रक– श्री. व. मु. मार्लीवार.

सदस्य– (१) श्री. व. सी. पतरंगे, (२) श्री. द. ब. झाडे.

दि. २० सप्टेंबर १९६० रोजी वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी गोंडवण शाखेला भेट दिली. या प्रसंगी "भारती" कार्यालयात आयोजित केलेल्या सभेत त्यांचे मार्गदर्शनपर भाषण झाले. याचवेळी सा. भू. तु. ना. काटकर यांचे अध्यक्षतेखाली विद्यार्थी समाजकल्याण केंद्राने प्रकाशित केलेले श्री. नं. रा. निमजे लिखित 'पाटलाचा पोर' या नाटकाचे प्रकाशन श्री. ना. रा. शेंडे यांचे हस्ते करण्यात आले.

अनुक्रमणिका

यवतमाळ शाखा–

वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री, ना. रा. शेंडे यांनी दि. ६-९-६० रोजी संघाच्या यवतमाळ शाखेला भेट दिली. त्याप्रसंगी शाखेचे अध्यक्ष डॉ. गो. वा. पंडित, उपाध्यक्ष श्री. शरच्चंद्र टोंगो, सरचिटणीस प्रा. राम डोके तसेच श्री. प्रताप वेहेरे, प्रा. पेशवे, श्री. शास्त्री आदि मंडळी उपस्थित होती. यावेळी श्री. ना. रा. शेंडे यांनी संस्थेच्या कामकाजासंबंधी चर्चा केली. यवतमाळसारख्या शहरात संस्थेचे एक कार्यालय व एखादे खुले रंगमंदिर अवश्य असावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

दि. ११-९-६० रोजी शाखेतर्फे साहित्यिकांच्या सहलीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. 'खटेश्वर' या निसर्गरम्य स्थळी संघशाखेचे प्रायः सर्व सभासद व काही निमंत्रित मंडळी उपस्थित होती. यावेळी सिव्हिल जज्ज श्री. प्रताप वेहेरे व प्रा. राम डोके ह्यांनी करून दाखविलेले 'ब्लॅक मॅजिक' आणि कु. सुधा महाजन व प्रा. देशपांडे ह्यांनी गायिलेली भावगीते ह्यामुळे सहलीच्या कार्यक्रमात विशेष बहार आली.

सिव्हिल जज्ज श्री. प्रतापराव वेहेरे ह्यांना निरोप–

शाखेच्या कार्यकारिणीचे व सांस्कृतिक कार्यक्रम समितीचे उत्साही सदस्य सिव्हिल जज्ज श्री. प्रतापराव वेहेरे ह्यांची चांदूर येथे बदली झाल्यामुळे त्यांना निरोप देण्याचा समारंभ दि. २४-९-६० ला करण्यात आला.

वि. सा. संघाच्या केंद्रीय कार्यालयाचे सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर यांची शाखेला भेट–

वि. सा. संघाचे सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर ह्यांनी 'यवतमाळ शाखेला दि. २५-९-६० रोजी भेट दिली. ह्याप्रसंगी शाखाध्यक्ष डॉ. गो. वा. पंडित, प्रा. राम डोके, प्राचार्य ना. वा. पराडकर, श्री. टोंगो, प्रा. दीनानाथ पांडे आदि पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या कामकाजासंबंधी उद्बोधक चर्चा झाली.

शाखेने सांस्कृतिक कार्यक्रम समितीतर्फे येत्या जानेवारी महिन्यात मराठी नाटयप्रयोग घेण्यासंबंधी निर्णय घेतला.

वणी शाखा–

वि. सा. संघाचे चिटणीस श्री. य. गो. मालोदे यांनी दि. २८ ऑगस्ट १९६० रोजी वणी शाखेला भेट दिली. यावेळी वणी शाखेतर्फे २३ वे वार्षिक साहित्य संमेलन घेण्याबाबत प्राथमिक विचार विनिमय करण्यात आला.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे आगामी अधिवेशन वणी येथे घेण्याचा विचार करण्यासाठी वणी शाखेचे सभासद आणि अन्य प्रतिष्ठित नागरिक यांची सभा दि. ४ सप्टेंबर १९६० रोजी सकाळी ९-३० वाजता श्रीकृष्ण भवनात भरली. ह्या सभेचे अध्यक्षस्थान श्री. धु. गो. उर्फ बाबासाहेब देशमुख यांनी मंडित केले होते. ह्या सभेसाठी वि. सा. संघाचे सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर हेहि उपस्थित होते. यावेळी शाखेचे सरचिटणीस श्री. के. ना. काटपाताळ यांनी प्रास्ताविक भाषण केल्यावर प्रा. श्री. गो. काशीकर यांनी संमेलनाच्या स्वरूपाबाबत माहिती दिली. नंतर वणी येथे साहित्य संमेलन घेण्यात यावे, असा ठराव मांडण्यात आला व तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला. संमेलनाची कार्यवाही करण्यासाठी ६० सभासदांची एक अस्थायी समिति स्थापन करण्यात आली असून संमेलन घेण्यासंबंधीचे विनंतीपत्र रीतसरपणे विदर्भ साहित्य संघाकडे पाठविण्यात आले आहे.

अमरावती शाखा–

मंगळवार दि. ११-१०-६० रोजी सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर यांनी अमरावती शाखेला भेट दिली व अमरावती शाखेचे कार्य वाढविण्याचे दृष्टीने कविभूषण प्रा. अण्णासाहेब खापर्डे, शाखा सरचिटणीस प्रा. वैद्य व प्रा. कृ. व्यं. पेशकार आदि कार्यकर्त्यांशी चर्चा केली.

मलकापूर येथे शाखास्थापनेचे प्रयत्न–

मलकापूर येथे वि. सा. संघाची शाखा स्थापन करण्याचे दृष्टीने सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर यांनी सोमवार दि, १०-१०-६० रोजी मलकापूरला भेट दिली; व त्या ठिकाणी डॉ. जोशी, श्री. शेंडे मुख्याध्यापक, श्री. संचीति, श्री. फडणीस, श्री. दामले, श्री. रानडे, श्री. टेंभुर्णे, श्री. उऱ्हेकर मुख्याध्यापक, श्री. बक्षी आदि प्रमुख नागरिकांशी चर्चा केली. रात्री ९ वाजता आदर्श महाविद्यालयात प्रमुख नागरिकांची सभा घेण्यात आली व मलकापूर येथे वि. सा. संघाची शाखा स्थापन करण्याचा प्रयत्न करण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला.

भंडारा शाखा–

शनिवार दि. १०-९-६० रोजी सौ. चारुमति भागवत याचे भंडारा शाखेच्या विद्यमाने "स्त्री– जीवनाचा आदर्श" या विषयावर सुश्राव्य व्याख्यान झाले.

भेट:– महाराष्ट्र राज्याचे शहर विकास मंत्री माननीय श्री. डी. झेड्. पळसपगार यांनी दि. ११-९-६० रोजी शाखेला भेट दिली.

★ ★ ★

वाङ्मय–वार्ता

– विदर्भातील ख्यातनाम महानुभावीय संशोधक डॉ. य. खु. देशपांडे यांनी लिहिलेले 'महानुभावीय मराठी वाङ्मय', श्री. वा. ना. देशपांडे यांनी संपादित केलेले 'स्मृतिस्थळ' व डॉ. वि. भि. कोलते यांनी संपादिलेले 'श्रीगोविंदप्रभु-चरित्र'– या ग्रंथांची द्वितीयावृत्ति नुकतीच प्रकाशित झाली आहे.

– नागपूर येथील 'श्री विवेकसिंधु प्रकाशन समिती'ने 'आद्यकवि मुकुंदराजकृत 'श्री विवेकसिंधु व श्रीपरमामृत' हा ग्रंथ नुकताच प्रकाशित केला आहे. प्रस्तुत ग्रंथाचे संपादन श्री. रा. वि. बोबडे यांनी शके ११२२ च्या हस्तलिखितावरून केले असून प्रा. सुरेश म. डोळके यांनी त्याला संशोधनात्मक प्रस्तावना लिहिली आहे.

– स्वस्तिक मंडळातर्फे दि. १५-७-६० रोजी प्रा. या. मु. पाठक व दि. २१ १-६० रोजी प्रा. डॉ. मा. गो. देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. पाठक हे वरूड येथील महाविद्यालयाचे व प्रा. देशमुख हे औरंगाबाद येथील ज्ञानविज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य झाल्याबद्दल हे सत्कार करण्यात आले. दोनहि प्रसंगी प्रा. भ. श्री. पंडित, प्रा. सुरेश म. डोळके, श्री. रा. पु. सगदेव, श्री. ज. रा. जोशी व श्री. बाबुराव कात्यायन,यांची भाषणे झाली. प्रा. पंडित अध्यक्षस्थानी होते. स्वस्तिक मंडळ हे सांस्कृतिक कार्य करणारे नागपुरातील एक मित्र– मंडळ आहे.

– श्री. कृष्ण मुकुंद उजळंबकर यांनी लिहिलेल्या 'पराग' या कादंबरीचा प्रकाशन समारंभ गणेशोत्सवाच्या मुहूर्तावर पार पडला. या प्रसंगी प्रा. भ. श्री. पंडित, प्रा. सुरेश म. डोळके, प्रा. श्री. मा. कुळकर्णी प्रभृति साहित्यिकांची भाषणे झाली. प्रस्तुत कादंबरी 'प्रभा प्रकाशन' करिता श्री. के. मा. राजवैद्य यांनी प्रकाशित केली आहे.

– विदर्भ संशोधन मंडळातर्फे 'A Volume of Studies in Indology' vol. I (डॉ. वा. वि. मिराशी), संशोधनांज्जलि (दे. गो. लांडगे), विदर्भातील ऐतिहासिक लेखसंग्रह (य. खु. देशपांडे व दे. गो. लांडगे) व संशोधन मंडळ वार्षिक (इ. स. १९६०) या ग्रंथांचा प्रकाशन समारंभ, कमिशनर डॉ. शेख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या प्रसंगी डॉ. वि. भि. कोलते, प्रा. सुरेश म. डोळके व प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांचीं ग्रंथांना अनुलक्षून भाषणे झाली.

— नागपूर येथील श्री. ज. रा. जोशी यांनी लिहिलेल्या आणि नागपूर विद्यापीठाने सुवर्णपदक देऊन गौरविलेल्या डॉ. तु. ज. केदार यांच्या चरित्राच्या तूर्त २५ प्रती भारत सरकारच्या सांस्कृतिक समितीने भारताबाहेरील देशात वास्तव्य करून राहिलेल्या मराठी भाषी लोकांकरिता एक वाचनीय ग्रंथ म्हणून खरेदी केल्या आहेत. आणखीहि प्रती सदरहु समिति लौकरच खरेदी करणार आहे.

— प्रा. सुरेश म. डोळके यांनी संपादिलेले व प्रस्ताविलेले 'मराठी साहित्य दर्शन: माडखोलकर' व प्रा. डॉ. अ. ना. देशपांडे यांनी संपादिलेले व प्रस्ताविलेले 'चिपळूणकर दर्शन' ही पुस्तके अनुक्रमे 'अनाथ विद्यार्थी गृह' व 'मॉडर्न बुक डेपो' या पुण्याच्या प्रकाशनसंस्थांनी प्रकाशित केली आहेत.

— विदर्भातील प्रसिद्ध कादंबरीकार श्री. पु. य. देशपांडे यांच्या 'सदापुली' या गाजलेल्या कादंबरीची दुसरी आवृत्ति 'देशमुख आणि कंपनी' या पुण्याच्या प्रकाशनसंस्थेने नुकतीच प्रकाशित केली आहे.

● ● ●

टीप:— 'वाङ्मय वार्ता' या नावाचे हे सदर या अंकापासून सुरू होत आहे. पुढील प्रत्येक अंकात हे सदर चालू राहील.

हे सदर सुरू करण्याचा हेतु हा की, विदर्भातील वाङ्मय विषयक हालचालींची नोंद नियमितपणे होत राहावी. विदर्भ साहित्य संघाशी संबंधित अशा वाङ्मय विषयक हालचालींची वार्ता 'संघवार्ता' या सदरात येतच असते. पण संघाशी प्रत्यक्षपणे संबंधित नसलेल्या हालचालीहि 'वाङ्मय वार्ता' या सदरात देऊन समग्र विदर्भातील वाङ्मय-विषयक माहिती 'युगवाणी'च्या वाचकांना होत राहावी व तिची नोंद करून दखल घेतली जावी, हे संघाचे व युगवाणीचे कर्तव्य आहे, असे आम्ही मानतो. तरी सर्वांस अशी नम्र व कळकळीची विनंती आहे की त्यांनी हे सदर निर्दोष व परिपूर्ण व्हावे, यासाठी आम्हाला माहिती पुरवून सहकार्य द्यावे.— **संपादक**

* * *

अनुक्रमणिका

थेंब

चार उन्हाचे थेंब सोनेरी
कोवळिकेतून जिथें फुलतात
पटून जिव्हाळा जन्मांतरीचा
तिथे माझें प्राण हिंल्लोलतात

पंख हवेचे कातर सुखाचे
तिथे अनावर झेपावतात
होऊन विन्मुख दृष्टिसन्मुख
तिथेच नेत्र हपापतात

ज्ञानाज्ञानाचे निखळून सांधे
स्पर्श उरात भरती अलोट
प्रचंड आवेग घेत पुनवेचा
समुद्रतरंग विस्तारतात

तिथेच माजते लाटाकाठाची
प्राणजाचक क्षितीजरेषा
अबोल गर्जत थिजल्या वाळूची
माझ्याच मनात फसती भाषा

क्षार क्षणांचे पाय रुपेरी
जिथे मनास हारवतात
लुटून उदार विदारकत्व
थेंब व्यथेचे मिरवतात

—रवीन्द्र बोरगावकर

पालवी

गुणाकर देशपांडे

असा पेटला उन्हाळा
आग लागे अंतराळा
माझ्या प्राणांचा फुलोर
कसा निष्फळ वाळला
फुले पाहणारी दीठ
कोळजून अंधारली
गंध देणारी सारीच
अवघ्राणे हारपली
कशी मापावी आता मी
आकाशाची लांबी रुंदी
माझ्या भोवती अंड्याच्या
कवचाची तटबंदी.

गुहेमधील मानवा
गर्भाशयाचा अंधार
रंग उषेचे तांबडे
लाल जळता अंगार.
तिथे गुहेत अनादि
सूर बोल अंकुरती
आणि मानवाच्या पोटी
मर्त्य अमर जन्मती.

तसे उगवेल कधी
ज्ञानबीज तुझ्या रूपे
आणि लागतील हातां
गूढांची अवघ्या मापे
विनाशाच्या कोलाहली
तेव्हा गवसेल सूर
वाळवंटी वाहणारी
सरस्वती सुप्त धार
ओघ तोच शमवील
तृषा युगांची मानवी
माझ्या प्राणांना फुटेल
पुन्हा कोवळी पालवी.

★ ★ ★

हवे ! हवे मज !!

यशवंत पारखी

सागरतळचा अनल हवा
सूर्यकरांतुन शीतलता अन्
अन् क्षितिजाचा मज वाक हवा
चंद्रकरांतुन हवी उष्णता
गगनाचा विस्तार हवा मज
काळामधला अंश लघुतम
धरतीचा मृद्‌गंध हवा
व्यापामधला व्याप हवा

गजराजाचा झोक हवा
इंद्रधनूच्या सूत्रांमधुनी
मज विश्वाचा अधिकार हवा
उडुरत्नांची गुंफुनी माला
शेषाचे सिंहासन हिसकुन
गळयात घालुनि, करात एका
धरतीचा शिरी भार हवा
धूमकेतुचा गुच्छ हवा

अनुक्रमणिका

तरफेचा मज तोल हवा
अन् ध्वनी, तेजाचा वेग हवा
रबरामधला ताण हवा
अन् पाऱ्याचा अभिमान हवा

शाम ढंगाचा अश्व हवा
करि चपलेचा चाबूक हवा
मंजरिचा मकरंद हवा
मज जगावेगळा छंद हवा

राज्य नको ऐश्वर्य नको मज
क्षितिजाचा अधिकार हवा
स्वप्नांचा अभास हवा
अन् धुंदीचा क्षणकाल हवा.

* * *

खंत

श्रीपाद गंगाधर कावळे

कल्पनांच्या पंखासवे
भरारते माझे मन
दिसू लागती मला
नवी क्षितिजे महान्––

माझ्या दृष्टीचे पारवे
स्वैर हिंडूनिया येती
भविष्याचे हितगूज
मला येउन सांगती––


युगे चालून आलेला
काळ टिपून घेतो
मागे टाकून काळाला
पुढें निघूनिया जातो––

एव्हढे असून आज
मला वाटे माझी खंत
माझ्या अश्रूमाजी दिसे
माझ्या व्यथा तरंगत

* * *


अनुक्रमणिका

डावीकडून-- प्रा. भा. ल. भांबूरकर, न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ति, श्री. भाऊसाहेब माडखोलकर, श्री. बाळासाहेब ढवळे, श्री. पु. य. देशपांडे, श्री. य. गो. मालोदे, श्री. गो. स. देहाडराय, श्री. ना. रा. शेंडे, ना. बाबू जगजीवनरामजी आदि मंडळी.



वि. सा. संघास ना. बाबू जगजीवनरामजी रेल्वे मंत्री, यांनी दि. ४-९-६० रोजी भेट दिली त्यावेळी घेण्यात आलेले छायाचित्र.

कै. न्या. रानडे वाद-स्पर्धेतील विजेते



विदर्भ साहित्य संघातर्फे आयोजित करण्यात आलेल्या आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धेत नागपूर महाविद्यालयाने यावर्षी 'रौप्य ढाल' जिंकली. त्या महाविद्यालयातील श्री. मनोहर शेळके व कु. माया साठे यांना ती विजयाची ढाल बक्षीस देण्यात आली त्यावेळचे छायाचित्र.

हे मासिक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे, यांनी वि. सा. संघाकरिता प्रदीप मुद्रणालय, धरमपेठ, नागपूर येथे मुद्रित करून संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीतावर्डी, नागपूर. १ येथे प्रकाशित केले.

अनुक्रमणिका